पालि

# आलोको

इयत्ता अकरावी



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास - २११६/(प्र.क्र.४३/१६)एसडी - ४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक २०.६.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# पालि आलोको

## इयत्ता - अकरावी



२०१९

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११००४

C4S2V2

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१९

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**प्रमुख समन्वयक**

श्रीमती प्राची रवींद्र साठे

**पालि भाषा तज्ज्ञ समिती**

डॉ. विमलकिर्ती, नागपूर (अध्यक्ष)
श्री. माधव मेश्राम, अंबाजोगाई (सदस्य)
श्री. अशोक पैठणे, अमरावती (सदस्य)
डॉ. संतोष भोसले, औरंगाबाद (सदस्य)
श्री. पंजाब प्रधान, उल्हासनगर (सदस्य)
डॉ. मोहन वानखडे, नागपूर (सदस्य)
श्री. किर्तीराज लोणारे, अंबाजोगाई (सदस्य)
श्री. सोपान  पठाडे, यवतमाळ (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य सचिव)
श्रीमती संध्या विनय उपासनी, (प्र. सदस्य सचिव)

**पालि भाषा अभ्यास गट सदस्य**

डॉ. योजना भगत
डॉ. विश्वनाथ चौरपगार
श्रीमती तृप्तीराणी तायडे
श्री. रामकृष्ण तागडे
श्रीमती विणा नकाते
श्रीमती निरुपमा भोरे
श्री. पुरुषोत्तम सिरसाठ
श्री. दिलीप सोनोने
श्री. प्रभुदास तायडे
श्री. विश्वजीत रगडे
डॉ. मनीष आनंद
डॉ. बालाजी गव्हाळे

**संयोजन**

**श्रीमती सविता अनिल वायळ**
विशेषाधिकारी, मराठी.
**श्रीमती संध्या विनय उपासनी**
प्र. विशेषाधिकारी, मराठी.

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई - २५.

**चित्रकार** : श्री. यशवंत देशमुख
**मुखपृष्ठ** : श्री. विवेकानंद पाटील
**अक्षरजुळणी** : बलदेव कंप्युटर्स, मुंबई - ४०० ०२८.
**निर्मिती** : श्री. सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
श्री. राजेंद्र पांडलोसकर, सहाय्यक निर्मिती अधिकारी
**कागद** : ७० जी. एस. एम. क्रीमवोव्ह
**मुद्रणादेश** : N/PB/2019-20/0.15
**मुद्रक** : S GRAPHIX (INDIA) PVT. LTD. , THANE

# "भारतस्स संविधान"

## उद्देसिका

**मयं, भारतस्स लोक,** भारतस्स एको **बाहुभूमिकं**
**सङ्गणिकावादी धम्मनिरपेक्ख लोकसाही गणरज्ज** रचयतिस्स
च तस्स सब्बे नागरिकानं;
**बाहुजञ्ञ, वित्तिय, च राजनेत्तिक आय;**
**वितक्क अभिवेत्ति, विस्सास, सद्धा**
**च उपासना एस्स विमुत्ति;**
**दज्जस च सन्धीस्स समानत्त;**
**एकंस पापेतु कत्वानं ददातिस्स च**
**तं सब्बेस्मिं पुग्गलस्स पतिट्ठा**
**च रट्ठस्स समग्गी च सामग्गीयं**
**एस्स आन दातु बन्धूता**
पवड्ढितुं कितस्स सङ्कप्पपुब्बकं सम्मासङ्कप्प कत्वानं;
**अम्हाकं संविधान सभास्मिं**
अज्ज दिवांङ्क सव्वीसति कत्तिक, एकूनवीसति एकूनपञ्ञासति दिने
इत्थं अयं **संविधान अधिकत च अधिनियत**
कत्वान **सयं पत समप्पयाम.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता।
जय हे, जय हे, जय हे,
जय, जय, जय, जय हे।।

## पटिञ्ञा

भारतो मम देसो ।
सब्बे च भारतीया मम बान्धवा ।
अत्थि देसविसये मे पेमं ।
मम देसस्स या समिद्धता,
या च विविधताय मण्डिता परम्परा, तस्साहं मानि ।
एतं दायज्जं उपसम्पादेतुं अहं दळहपरक्कमो भविस्सामि ।
अहं मातापितुन्नं च आचरियानं च पाचरियानं च
वयो–अनुप्पत्तानं सक्करिस्सामि ।
सब्बे जने अहं सोरताय पटिपज्जिस्सामि ।
अहं देसविसये देसबान्धवविसये च दळहभत्तिं
पटिजानामि ।
यं तेसं कल्याणं तं एव होतु मे कल्याणं,
या तेसं समिद्धि सा मे समिद्धि
यं तेसं सुखं तं मे सुखं।

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुम्हा सर्वांचे इयत्ता अकरावीच्या वर्गात स्वागत आहे. 'पालि आलोको' हे इयत्ता अकरावीचे पालि पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आनंद होत आहे.

या पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगात डोकावल्यानंतर तुमच्या लक्षात येईल की, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या संविधानिक मूल्यांची जाणीव आपल्यामध्ये व्हावी यादृष्टीने पाठ्यघटकांची निवड करण्यात आलेली आहे. या पाठ्यपुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक पाठ्यघटकावरील स्वाध्यायांचे स्वरूप आणि त्यामधील विविधता. यामुळे पाठ्यघटकांचे अंतरंग समजून घेण्यास विशेष मदत होऊ शकते. विद्यार्थ्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि सृजनशीलता विकसित करण्याच्या उद्देशाने स्वाध्यायातील कृतींची रचना करण्यात आलेली आहे. याच दृष्टीने गद्य-पद्य पाठांची निवड करण्यात आलेली असून त्यातील रंजकता व सुलभता यावर भर देण्यात आलेला आहे. पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करताना विद्यार्थ्याला अभ्यासाचे ओझे वाटणार नाही, पाठांतराचे दडपणही राहणार नाही, अशा प्रकारची या पाठ्यपुस्तकाची रचना करण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कृतिपत्रिकेच्या माध्यमातून होणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना भाषेच्या अध्ययनाची आवड निर्माण होईल तसेच विद्यार्थ्यांची अध्ययन प्रक्रिया प्रज्ञाशीलतेने युक्त होऊन ज्ञानरचनात्मक पद्धतीने गतिमान होण्यास मदत होईल. तसेच पाठ्यपुस्तकात दिलेल्या चित्रांमधून तत्कालिन पोशाख, आभूषणे, राहणीमान, जीवनपद्धती इत्यादी बाबतची माहिती सहजतेनं होईल.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, राष्ट्रप्रेम निर्माण व्हावे, ते सदाचारी व्हावेत हा हेतू डोळ्यासमोर ठेऊनच पाठ्यघटकांची निवड करण्यात आलेली आहे. भिक्खू-भिक्खूनी संघाची संपूर्ण कार्यप्रणाली लोकशाही स्वरूपाची होती. वेगवेगळ्या कुळातून, जातीतून, धर्मातून, प्रांतातून आलेले लोक संघात प्रव्रज्जित झाल्यानंतर ते आपले सर्व भेद विसरून त्यांची केवळ 'शाक्यपुत्रीय श्रमण-श्रमणी म्हणून ओळख असायची, यामधून आपल्याला राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश मिळतो. 'चरियापिटक' या घटकातून कठिणातील कठीण कार्य करण्याचे, आपत्तीला तोंड देण्याचे, सुख-दु:खात समभावाने राहण्याचे विचार दिसून येतात. सर्वच पाठ्यघटक असे आहेत की, जे आपल्याला सुसंस्कृत आचरण करण्यास प्रेरित करतात.

पाठ्यघटकांसंबंधी माहिती मिळविण्यासाठी ॲपच्या माध्यमातून क्यू.आर. कोडद्वारे उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल. त्याचा तुम्हांला अभ्यासासाठी निश्चितपणे उपयोग होईल.

प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार करण्याच्या कामी पालि भाषा तज्ज्ञ समिती, पालि भाषा अभ्यासगट सदस्य या सर्वांनी परिश्रम घेऊन पाठ्यपुस्तक तयार केले आहे. पालि भाषेचे शिक्षक व तज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले. समीक्षकांच्या सूचना व अभिप्राय यांचा विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे.

भाषेच्या विकासाबरोबरच विद्यार्थ्यांची नैतिकता, विचारक्षमता, अभिव्यक्ती कौशल्य, परोपकार भावना, स्वमत प्रकटीकरण आणि राष्ट्रीय मूल्ये यांच्या विकासासाठी 'पालि आलोको' हे पुस्तक उपयुक्त ठरू शकेल. तसेच विद्यार्थी, पालक, शिक्षक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.


डॉ. सुनिल मगर
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे


पुणे
दिनांक :- २० जून २०१९
भारतीय सौर : ३० ज्येष्ठ १९४१

## भाषाविषयक क्षमता : पालि

इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांमध्ये पालि भाषाविषयक खालील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.

| क्षेत्र | | क्षमता |
|---|---|---|
| **श्रवण** | • | पालि भाषा साहित्यातील भावार्थ समजून घेता येणे. |
| | • | पालि भाषा विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती ऐकून त्यांतील स्वराघात, आरोह-अवरोह या वैशिष्ट्यांची जाण होणे. |
| | • | पालि भाषेतील औपचारिक व अनौपचारिक संवाद व संभाषण ऐकून चिकित्सक विचारासह त्यात सहभागी होता येणे. |
| | • | परिसरात बोलल्या जाणाऱ्या विविध बोलीभाषा ऐकून त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार तुलना करता येणे. |
| **भाषण** | • | पालि भाषेतील उच्चार वैशिष्ट्यांना अनुसरून तिपिटकातील गाथांचे पठन आणि संभाषण करता येणे. |
| | • | पालि भाषेतील अध्ययन कृतींना विषयाला अनुसरून अनुभव कथन करता येणे. |
| | • | पालि भाषेत एकमेकांशी संभाषण करता येणे. |
| **वाचन** | • | योग्य गतीने व विरामचिन्हांची दखल घेऊन प्रकट वाचन करता येणे. |
| | • | पालि साहित्यातील तिपिटक व अनुपिटक साहित्यप्रकारांचे वाचन करून त्याचा आस्वाद घेणे. |
| | • | संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या 'ई' साहित्याचे वाचन करून त्या माहितीचा स्वयं अध्ययनासाठी उपयोग करता येणे. |
| **लेखन** | • | लेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे. |
| | • | भाषा नियमांना अनुसरून संवाद, वर्णन, लघुपरिच्छेद लिहिता येणे. |
| | • | माध्यम भाषेतील भाषा नियमाला अनुसरून अनुवाद करता येणे. |
| **अध्ययन कौशल्य** | • | कोणत्याही संदर्भासाठी शब्दकोश पाहता येणे. |
| | • | पालि भाषेत शब्दजाळे निर्माण करण्याचा प्रयत्न करणे. |
| | • | पालि भाषेत कथापूर्ती करता येणे. |
| | • | पालि भाषेत अनुवाद करता येणे. |
| | • | संगणकावर उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक साहित्याचा वापर अभ्यासासाठी करता येणे. |
| भाषाभ्यास | • | इयत्ता दहावीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी करणे. |
| | • | पालि भाषेत सरळ संवाद करणे. |
| | • | एक ते पन्नास (१-५०) अंक (क्रम) जाणून घेणे. |

## शिक्षकांसाठी

'पालि आलोको' इयत्ता अकरावीचे हे पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनासाठी आपणास देताना आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील कौशल्य, नैतिक मूल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या मनावर सुसंस्कार रुजवता येतील अशा पाठ्यघटकांचा यामध्ये समावेश केलेला आहे. पाठ्यघटकांमधील आशय विद्यार्थ्यांना सहजतेने स्पष्ट व्हावा यादृष्टीने आशयानुरूप पाठ्यघटकांमध्ये चित्रांचा समावेश करण्यात आलेला आहे. शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या पाठ्यपुस्तकातील कृतीबरोबरच इतर विविध कृती व उपक्रम योजून ते विद्यार्थ्यांकडून करून घ्यावेत.

गद्य-पद्य पाठ निवडतांना काही चिरंतन मूल्ये आणि तत्त्वांचा विचार करण्यात आलेला आहे. पाठ्यघटकांची माहिती व्हावी म्हणून पाठ्यघटकाआधी त्याची सारांशरूपात प्रस्तावना देण्यात आलेली आहे. ही प्रस्तावना त्या पाठ्य घटकाचे सार आहे. शिक्षकांनी ही प्रस्तावना अधिक स्पष्ट करतांना, पाठ्यघटकांशी संबंधित पालि साहित्यातील इतर संदर्भांचा सुद्धा अध्ययन-अध्यापतात समावेश व्हावा, यादृष्टीने काही पालि संदर्भ ग्रंथांची यादी पाठ्यपुस्तकात देण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांना लेखन-वाचन कौशल्य विकासासाठी पाठ्यपुस्तकातील घटकनिहाय कृती व त्यांचे नमुने दिलेले आहेत. विद्यार्थ्यांना पालि भाषा शिकण्याकरिता, शिकवण्याकरिता या कृती घटकांचा विशेष उपयोग होऊ शकतो. या वैविध्यपूर्ण कृतींमधून विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्य विकसित होणार आहेत. इयत्ता अकरावीतील लेखन घटकांची मांडणी करतांना विद्यार्थ्यांना तो सहजतेने समजेल याची दक्षता घेण्यात आलेली आहे. शिक्षकांनी प्रत्येक पाठ्यघटक विद्यार्थ्यांना समजून सांगतांना तो त्याला चांगल्या प्रकारे आकलन होईल यादृष्टीने स्वकौशल्य विकसित केल्यास विद्यार्थ्यांमध्ये पालि भाषा शिकण्याची आवड निर्माण होईल.

या पाठ्यघटकांमध्ये व्याकरण घटकांची व कृतींची मांडणी सहज, सुलभ व सोप्या पद्धतीने केली आहे. कृतिपत्रिकेमध्ये या व्याकरण घटकांवर आधारित कृतींचा समावेश केला आहे. शिक्षकांनी स्वत: या व्याकरण घटकांच्या सरावासाठी विविध कृती योजाव्यात व विद्यार्थ्यांकडून तसा सराव करून घ्यावा.

पालि भाषेचा जर आपल्याला अभ्यास करायचा असेल तर तो तीन अंगांनी करता येतो, तो म्हणजे - परियति, पटिपत्ति व पटिवेदन. परियति म्हणजे ऐकून, वाचून, शब्दाचा अर्थ समजून घेणे, पटिपत्ति म्हणजे त्यावर चर्चा करणे, विचार-विमर्ष करणे आणि पटिवेदन म्हणजे त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेणे. पालिमधील शब्दांचे असे तिन्ही अंगांनी जोपर्यंत अनुभूती येत नाही. तोपर्यंत पालि शब्दांचे संपूर्ण ज्ञान होत नाही.

पालि भाषेच्या अध्ययनाच्या दृष्टीने दुसरी महत्त्वाची बाब ही की, इतर भाषांचा अभ्यास हा गद्य, पद्य, नाटक, कथा-कथन इत्यादीपुरताच मर्यादित असतो परंतु पालि भाषेचा अभ्यास आपण वेगवेगळ्या प्रकारांनी करू शकतो. पालि भाषा ही आपल्याला नऊ अंगांनी शिकता येते. जिला 'नवाङ्गसत्थुसासन' असे सुद्धा म्हणतात. म्हणून पालि शिकण्याकरिता वेगवेगळी दालने उपलब्ध आहेत. या सर्वांचा उपयोग आपल्याला अध्यापनामध्ये निश्चित रूपाने होऊ शकतो.

पालि भाषा शिकतांना-शिकवितांना सर्वप्रथम ती भाषा काय आहे, ती आपल्याला कशा पद्धतीने समजून घेता येईल, ती बोलचालची भाषा कशी होईल? यादृष्टीने पालि भाषेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. यामध्ये शिक्षकाचे अध्ययन-अध्यापन निश्चित रूपाने दिशादर्शक ठरू शकते. कारण प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत बौद्ध संस्कृती, तत्त्वज्ञान, इतिहास, जीवन मूल्ये समजून घेण्याच्या दृष्टिने पालि भाषेचे फार महत्त्व आहे. पालि भाषेच्या या महत्त्वामुळेच आज हा विषय राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला आहे. म्हणून असे म्हणता येईल की, आधुनिक भारतात पालि भाषेच्या अध्ययनाचे क्षेत्र निश्चितच व्यापक होत आहे. यामध्ये शिक्षक म्हणून आपले योगदान या विषयाला क्रमप्राप्त आहे. म्हणून शिक्षकांनी स्वताच्या सृजनशीलतेने, कल्पकतेने या पाठ्यघटकांचे अध्यापन करून विद्यार्थ्यांना पालि विषयाच्या अध्ययनासाठी प्रेरित करणे गरजेचे आहे. त्यातून विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता, विचारक्षमता व कृतीशीलता यांना ही गती प्राप्त होईल. शिक्षक हा केवळ पाठ्यघटकच शिकवित नसतो तर विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगीण गुणांची वाढ कशी करता येईल? त्यांच्यामधील न्यूनगंड कसा काढता येईल? त्याला समाजाभिमुख कसे करता येईल? हे मूल्य सुद्धा पाठ्यघटकाच्या अनुषंगाने शिकवणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांच्या चुकाच न दाखवता त्यांच्यामधील ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्याची स्तुती करणे ही गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्येक कृती चांगल्याप्रकारे करण्याची प्रेरणा मिळते.

मानवी मूल्यांची जपवणूक व संवर्धन करण्याची फार मोठी जबाबदारी शिक्षक म्हणून आपल्या सर्वांवर आहे, कारण या मूल्यांचे बीजारोपण जर आपण विद्यार्थ्यांवर योग्यपणे केले तर उद्याची सशक्त पीढी आपल्या हातून घडणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करुन अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे सर्वांगिण व्यक्तिमत्त्व अधिक कुशल पद्धतीने विकसित होण्यास मदत होईल व शिक्षकांना सुद्धा एक निकोप, सुदृढ व सम्यक विद्यार्थी घडविण्याचे समाधान प्राप्त होईल.

'पालि आलोको' इयत्ता अकरावीचे हे पाठ्यपुस्तक तुम्हाला निश्चितच आवडेल, अशी अपेक्षा आहे.

# पाठानुक्कमो



| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठक्रमांक |
| --- | --- | --- |
| | **गज्जो विभागो** | |
| १) | सकनिरूत्ति अनुजानना | १ |
| २) | पुत्तसुत्तं | ४ |
| ३) | सत्तभरिया | ७ |
| ४) | बिजानं च खेत्तानं च कसिकम्मानञ्च वण्णना | १० |
| ५) | असोकस्स गिरनार सिलालेखा | १६ |
| ६) | लोकसुत्तं | १९ |
| ७) | चूळसेट्ठि जातकं | २२ |
| ८) | पजाहितदक्ख महारञ्ञो सयाजीरावो | २५ |
| | **पज्जो विभागो** | |
| १) | पुराभेदसुत्तं | २९ |
| २) | सुमनसुत्तं | ३२ |
| ३) | इन्दियसंवरसील | ३६ |
| ४) | मङ्गलसुत्तं | ४० |
| ५) | अङ्गुलिमाल भिक्खू | ४५ |
| ६) | सिविराजचरियं | ४९ |
| ७) | रोहिणी | ५३ |
| ८) | पकिण्णानि सुभासितानि | ५७ |
| | **थुलवाचन** | |
| १) | राजोवादजातकं | ६२ |
| २) | वासेट्ठसुत्तं | ६६ |
| | **परिसिट्ठ** | |
| १) | **व्याकरण (वेय्याकरण)** | ७० |
| २) | **सुलभ पालि** (सुलभो पालि) | ८४ |
| ३) | **निबंध** (निबन्धो) | ९० |
| ४) | **अपठित उतारे** (अपठितो) | ९० |
| ५) | **कथापूर्ती** (कथापुत्ती) | १०० |
| ६) | **पालि भाषेचे महत्त्व** | १०१ |
| | **तिपिटक ग्रंथ परिचय** | १०४ |

# १. सकनिरुत्ति अनुजानना

**प्रस्तावना**

तिपिटक साहित्यातील विनय पिटकाच्या 'चुल्लवग्ग' या ग्रंथातून हा पाठ घेतला आहे.

या पाठामध्ये येमेळ व तेकुल यांनी 'छन्दस' भाषेत उपदेशाची परवानगी मागितली. त्यावर तथागत बुद्धांनी धम्माच्या भाषेबद्दल भिक्खूंना स्पष्ट निर्देश दिला आहे, की ''भिक्खूंनो, मी तुम्हांला धम्मोपदेशाच्या प्रवचनासाठी आपल्या जनभाषा, लिपी व तिचे जतन करण्याची अनुज्ञा देत आहे.'' जगात एक आदर्श समाज घडविणे आणि समाजापुढे भिक्खूंच्या / नागरिकांच्या रूपात एक नितीमान पुरुष निर्माण करणे हा या पाठाचा उद्देश आहे.



तेन खो पन समयेन येमेळ तेकुला नाम भिक्खू द्वे भातिका होति। ब्राह्मणजातिका कल्याणवाक्करणा। ते येव भगवा तेनुपसङ्कमिंसु, उपसङ्कमित्वा भगवन्तं अभिवादेत्वा एकमन्तं निसीदिंसु । एकमन्तं निसिन्ना खो ते भिक्खू भगवन्तं एतदवोचु – ''एतरही, भन्ते, भिक्खू नानानामा नानागोता नानाजच्चा नानाकुला पब्बजिता। ते सकाय निरुत्तिया बुद्धवचनं दुसेन्ति। हन्द मयं भन्ते बुद्धवचन छन्दसो आरोपेमा'' ति। विगरहि बुद्धो भगवा– कथं हि नाम तुम्हे मोघपुरिसा, एवं वक्खयं – 'हन्द मयं भन्ते बुद्धवचन छन्दसो आरोपेमा' ति । नेतं मोघपुरिसा अप्पसन्नानं वा पासादाय पसन्नान वा भिय्योभावाय । अथ ख्वेतं मोघपुरिसा, अप्पसन्नानं चेव अप्पसादाय पसन्नानं च एकच्चानं अञ्ञयत्ताया'' ति । अथ खो भगवा ते भिक्खू अनेकपरियायेन विगरहित्वा दुब्भरताय दुप्पोसताय महिच्छताय असन्तुट्ठिताय सङ्गणिकाय कोसज्जस्स अवण्णं भासित्वा, अनेकपरियायेन सुभरताय सुपोसताय अप्पिच्छस्स सन्तुट्ठस्स सल्लेखस्स धुतस्स पासादिकस्स अपचयस्स विरियारम्भस्स वण्णं भासित्वा, भिक्खूनं, तदनुच्छविकं तदनुलोमिकं धम्मि कथं कत्वा भिक्खू, आमन्तेसि – ''न भिक्खवे बुद्धवचन छन्दसो ओरोपेतब्ब । यो आरोपेय्य, आपत्ति दुक्कटस्स। अनुजानमि, भिक्खवे, सकाय निरुत्तिया बुद्धवचनं परियापुणितु'' ति।

**(विनयपिटक – चुल्लवग्ग)**

## शब्दार्थ

**अनुजानना (क्रिया.)**– अनुमती देणे

**नाना (अ.)**– विविध

**सकाय (वि.)**– आपल्या स्वकीय

**मयं (सर्व.)**– आम्ही

**छन्दसो (ना.)**– वैदिक भाषा

**वक्खय (क्रिया.)** – सांगेल

**आरोपेमा (क्रिया.)**– दोषारोपण करणे

**नेतं – (ना.)** डोळे (आंधळ्याप्रमाणे)

**पासादाय – (वि.)** मनाची स्वच्छता

**ख्वेतं – (वि.)** प्रसिद्ध

**महिच्छत्ताय – (स्त्री.)** अत्याधिक लोभ

**सङ्गणिकाय – (स्त्री.)** सामाजिक

**सुपोसताय – (पु.)** सुपुरुषता

**सल्लेख – (पु.)** कठोर तपस्या

**अपचय – (पु.)** जन्म मरणाचा निरोध

**परियापुनितु – (क्रिया.)** योग्य प्रकारे अध्ययन करणे.

**एतरहि (क्रि.वि.)**– आता

**जच्चा (पु.)**– जन्म

**निरुत्तिया (स्त्री.)**– बोलून, व्याकरण

**हन्द (अव्यय)**– माझ्या बोलण्याकडे लक्ष द्या.

**विगरहि (क्रिया.)**– निंदा करणे

**एव (अव्यय)**– ही

**आरोपेमा (कृदन्त)**– ज्याच्यावर दोषारोण लावले गेले आहे.

**अप्पसन्नान** – अप्रसन्न

**पसन्नान** – प्रसन्न करणे

**भिय्योभावाय (वि.)**– आपल्या योग्यतेप्रमाणे

**दुप्पोसताय (ए.)**– वाईट स्वभावाचा

**असन्तुट्ठिताय** – असंतोष

**कोसज्ज (नपु.)**– आळस

**अचिच्छस्स** – अल्पेच्छता

**धुतस्स – (पु.)** अवधूतपणा (धूर्त)

**विरियारम्भस्स** – प्रयत्नारंभ, आरंभ/प्रयत्नांची सुरुवात.

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) येमेळ व तेकुळ भिक्खू होण्यापूर्वी कोण होते?

२) येमेळ तेकुल यांची भाषा कोणती होती?

३) येमेळ भिक्खूने भगवन्ताला काय सांगितले?

४) तथागत बुद्धांनी भिक्खूंना कोणती अनुमती दिली?

**२. खालील वाक्यांचे सत्य / असत्य लिहा.**

१) ते सकाय निरूत्तिया बुद्धवचनं दुसेन्ति ।

२) हन्द मयं भन्ते बुद्धवचनं छन्दसो आरोपेमा'' ति।

३) भिक्खवे, बुद्धवचनं छन्दसो आरोपेतब्बं।

### ३. रूपे ओळखा

१) निसीदिंसु

२) अञ्ञयत्ताया''ति

३) आमन्तेसि

४) अनुजानामि

५) अभिवादेत्वा

६) भासित्वा

### ४. योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.

१) तेन, खो पन समयेन येमेळ, तेकुला नाम भिक्खू द्वे ........... होन्ति। (मातुका/भातिका)

२) ते येन भगवा तेनुपसङ्कमिंसु, उपसङ्कमित्वा भगवन्तं ......... एकमन्तं निसीदिंसु। (अभिवादेत्वा/अभिवादनं)

३) ते सकाय निरूत्तिया .........दूसेन्ति। (भिक्खूवचनं/बुद्धवचनं)

४) विगरहि ............भगवा। (बुद्धो/ बुद्धं)

५) बुद्धवचनं ...........आरोपेमा''ति। (छन्दसो/छन्दस)

६) नेतं ....... अप्पसन्नानं वा पासादाय पसन्नानं वा भिय्योभावाय। (मोघपुरिसा/अमोघपुरिसा)

### ५. संधी करा.

१) तेन + उपसङ्कमि

२) एतद + अवोचु

### ६. जोड्या लावा.

| अ | ब |
|---|---|
| १) येमेळ | १) भगवन्तं |
| २) भिक्खू | २) पसन्नानं |
| ३) अप्पसादाय | ३) तेकुळा |

☆☆☆

# २. पुत्तसुत्तं


**प्रस्तावना**

प्रस्तुत पाठ सुत्तपिटकाच्या खुद्दकनिकायातील 'इतिवुत्तक' या ग्रंथामधील आहे. जगात किती प्रकारचे पुत्र विद्यमान आहेत. या विषयीचे वर्णन या पाठात केलेले आहे. अतिजात, अनुजात, अवजात असे तीन प्रकारचे पुत्र आहेत. आई-वडील व मुलांनी बुद्ध, धम्म आणि संघाला शरण जावे. जीवहिंसा, चोरी, व्यभिचार, असत्य भाषण, आणि नशायुक्त सेवनापासून विरक्त राहावे. देशाचा आदर्श विद्यार्थी, आदर्श नागरिक व योग्य संस्कार घडवून राष्ट्रनिर्मिती करणे तसेच दुराचारी व सदाचारी विषयीचे वर्णन या पाठात करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांमध्ये सदाचरण रुजवण्यासाठी काया, वाचा व मनाने कुशल कर्म करण्याच्या दृष्टीने उपरोक्त सुत्ताचे विशेष महत्त्व आहे.

---

तयो मे, भिक्खवे, पुत्ता सन्तो संविज्जमाना लोकस्मिं । कतमे तयो? **अतिजातो, अनुजातो, अवजातो**' ति ।



कथं च, भिक्खवे, पुत्तो **अतिजातो** होति? इध, भिक्खवे, पुत्तस्स मातापितरो होन्ति न बुद्धं सरणं गता, न धम्मं सरणं गता, न सङ्घं सरणं गता, पाणातिपाता अप्पटिविरता, अदिन्नादाना अप्पटिविरता, कामेसुमिच्छाचारा अप्पटिविरता, मुसावादा अप्पटिविरता, सुरामेरयमज्जपमादट्ठाना अप्पटिविरता, दुस्सीला पापधम्मा; पुत्तो च नेसं होति बुद्धं सरणं गतो, धम्मं सरणं गतो संङ्घ सरणं गतो, पाणातिपाता पटिविरतो, अदिन्नादाना पटिविरतो, कामेसुमिच्छाचारा पटिविररतो, मुसावादा पटिविरतो, सुरामेरयमज्जपमादट्ठाना पटिविरतो सीलवा कल्याणधम्मो । एवं खो, भिक्खवे, पुत्तो अतिजातो होति।



कथं च, भिक्खवे, पुत्तो **अनुजातो** होति? इध, भिक्खवे, पुत्तरस्स मातापितरो होन्ति बुद्धं सरणं गता, धम्मं सरणं गता, सङ्घं सरणं गता, पाणातिपाता पटिविरता, सुरामेरयमज्जपमादट्ठाना पटिविरता, सीलवन्तो

कल्याणधम्मा; पुत्तो पि नेसं होति बुद्धं सरणं गतो, धम्मं सरणं गतो, सङ्घं सरणं गतो, पाणातिपाता पटिविरतो, अदिन्नादाना पिटविरतो, कामेसुमिच्छाचारा पटिविरतो, मुसावादा पटिविरतो, सुरामेरयमज्जपमादट्ठाना पटिविरतो, सीलवा कल्याणधम्मो । एवं खो, भिक्खवे, पुत्तो अनुजातो होति।



'कथं च, भिक्खवे, पुत्तो **अवजातो** होति? इध भिक्खवे, पुत्तस्स मातापितरो होन्ति बुद्धं सरणं गता, धम्मं सरणं गता, सङ्घ सरणं गता, पाणातिपाता पटिविरता, मुसावादा पटिविरता, सुरामेयमज्जपमादट्ठाना पटिविरता, सीलवन्तो कल्याणधम्मा; पुत्तो च नेसं होति न बुद्धं सरणं गतो, न धम्मं सरणं गतो न सङ्घं सरणं गतो, पाणातिपाता अप्पटिविरतो, अदिन्नादाना अप्पटिविरतो, कामेसुमिच्छाचारा अप्पटिविरतो, मुसावादा अप्पटिविरतो सुरामेरयमज्जपमादट्ठाना अप्पटिविरतो, दुस्सीलो पापधम्मो। एवं खो, भिक्खवे, पुत्तो अवजातो होति। इमे खो, भिक्खवे, तयो पुत्ता सन्तो संविज्जमाना लोकस्मिं''ति। एतमत्थं भगवा अवोच । तत्थेतं इति वुच्चति –

''अतिजातं अनुजातं, पुत्तमिच्छन्ति पण्डिता ।
अवजातं न इच्छन्ति, यो होति कुलगन्धनो ।।
एते खो पुत्ता लोकस्मिं, ये च भवन्ति उपासका ।
सद्धा सीलेन सम्पन्ना, वदञ्ञू वीतमच्छरा ।
चन्दो अब्भघना मुत्तो, परिसासु विरोचरे'' ति।।

**(इतिवुत्तकं,खुद्दकनिकाय)**

## शब्दार्थ

**सन्ता (वि.)** – लोकांमध्ये, जगात

**दुस्सीला (वि.)** – दुराचरण करणारा

**पटिविरत (कृ.)** – विरक्त, अलिप्त राहणे

**अदिन्नादाना (वि.)** – चोरी (न दिलेली वस्तू घेणे)

**मुसावादा (पु.)** – खोटे बोलणे

**लोकस्मिं (पु.)** – जगात (लोकांमध्ये)

**अब्भघना (नपु.)** – घनदाट ढग

**विरोचरे (क्रि.)** – सुशोभित होणे.

**अनुजातो(वि.)**– सदाचारी आई–वडिलांचा सदाचारी पुत्र

**अप्पटिविरता (वि.)** – विरक्त राहत नाही, अलिप्त राहत नाही.

**पापधम्मा (वि.)** – पापी, पाप करणारा

**पाणातिपाता (पु.)** – जीवहिंसा

**कामेसुमिच्छाचार (कृ.)** – व्यभिचार

**सुरामेरयमज्ज (नपु.)** – दारू

**सद्धा (स्त्रि.)** – श्रद्धा, विश्वास

**परिसासु (स्त्रि.)** – परिषद, सभा

**अतिजातो (वि.)**– दुराचारी आई–वडिलांचा सदाचारी पुत्र

**अवजातो (वि.)** – दुराचारी आई–वडिलांचा दुराचारी पुत्र (निच, दुष्ट प्रवृत्तीचा पुत्र)

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) जगात किती प्रकारचे पुत्र विद्यमान आहेत?

२) जगात विद्यमान असलेल्या पुत्रांची नावे काय आहेत?

३) पुत्राचे आई-वडील कोणाला शरण गेले होते?

४) पुत्राचे आई-वडील काय सेवन केल्याने अनाचारी व पापी बनतात?

५) अतिजात पुत्र कसा होतो?

६) अवजात पुत्र कसा होतो?

७) अनुजात पुत्र कसा होतो?

८) बुद्‌धिमान पुरुष कोणत्या पुत्राची कामना करतो?

९) कोण ढगापासून मुक्त झालेल्या चंद्रमाप्रमाणे सभेमध्ये शोभून दिसतो?

१०) उदार व कंजूशीरहित कोणता उपासक असतो?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) पुत्तस्स मातापितरो बुद्धं न सरणं गता।

२) पुत्तस्स मातापितरो बुद्धं, धम्मं, संघं सरणं गता।

३) भिक्खवे, तयो पुत्ता सन्तो सविज्जमाना लोकस्मिं।

**३. सूचनेनुसार कृती करा.**

**(१) योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.**

अ) तयो मे भिक्खवे, पुत्ता सन्तो संविज्जमाना ................ । (लोकति, लोकस्मिं)

ब) एवं खो भिक्खवे, पुत्तो अतिजातो ................ । (होति, होन्ति)

क) इध भिक्खवे, पुत्तस्स मातापितरो ................ । (होन्ति, होति)

ड) ................ भगवा अवोच । (एतअत्थं, एतमत्थं)

**(२) रूपे ओळखा.**

होति होन्ति

इच्छन्ति भवन्ति

वुच्चन्ति

**(३) संधी करा**


तत्थेव एतमत्थं

पुत्तस्स पुत्तो'पि

**(४) समास ओळखा**

मातापितरो

**(५) जाळरेखाचित्र पूर्ण करा**




☆☆☆

# ३. सत्तभरिया

**प्रस्तावना**

प्रस्तुत पाठ अंगुत्तर निकायातून घेतला असून यात स्त्रियांच्या स्वभावाचे सात प्रकार सांगितले आहेत. हे सात प्रकार पुरुषांमध्ये देखील आहेत.

स्त्रिने चांगले वर्तन करून आपल्या कुटुंबियामध्ये प्रिय होऊन आप्तांना कसे सुखी करावे. पत्नीला वेगवेगळ्या प्रकारची उपमा देऊन कोणत्या प्रकारची पत्नी होणे चांगले आहे.

व्यक्तीची कौटुंबिक जबाबदारी, कर्तव्य, अधिकार तसेच राष्ट्र निर्मितीसाठी आदर्श स्त्री-पुरुष निर्माण करणे हा या पाठाचा उद्देश आहे.

अथ खो भगवा पुब्बण्हं समयं निवासेत्वा पत्तचीवरमादाय येन अनाथापिण्डिकस्स गहपतिस्स निवेसनं तेनुपसङ्कमि; उपसङ्कमित्वा पञ्ञते आसने निसीदि। तेन खो पन समयेन अनाथपिण्डिकस्स गहपतिस्स निवेसने मनुस्सा उच्चासद्दा महासद्दा होन्ति। अथ खो अनाथपिण्डिको गहपति येन भगवा तेनुपसङ्कमि; उपसङ्कमित्वा भगवन्तं अभिवादेत्वा एकमन्तं निसीदि । एकमन्तं निसिन्नं खो अनाथपिण्डिकं गहपति भगवा एतदवोच –



"किं नु ते, गहपति, निवेसने मनुस्सा उच्चासद्दा महासद्दा केवट्टा मञ्ञे मच्छ विलोपे" ति?

"अयं, भन्ते, सुजाता घरसुण्हा अड्ढकुला आनीता। सा नेव सस्सुं आदियति, न ससुरं आदियति, न सामिकं आदियति, भगवन्त पि न सक्करोति न गरूं करोति न मानेति न पुजेती" ति।

अथ खो भगवा सुजातं घरसुण्हं आमन्तेसि – "एहि सुजाते" ति! "एवं, भन्ते" ति खो सुजाता घरसुण्हा भगवतो पटिसुत्वा येन भगवा तेनुपसङ्कमि, उपसङ्कमित्वा भगवन्तं अभिवादेत्वा एकमन्तं निसीदी। एकमन्तं निसिन्नं खो सुजातं घरसुण्हं भगवा एतदवोच –

"सत्त खो इमा, सुजाते, पुरिसस्सभरियायो । कतमासत्त?

वधकसमा, चोरीसमा, अय्यसमा, मातासमा,
भगिनी समा, सखीसमा, दासीसमा ।
"या चीध भरिया वधका' ति वुच्चति,
'चोरीच अय्या' तिच या पवुच्चति ।।
दुस्सीलरूपा फरूसा अनादरा,
कायस्स भेदा निरयं वजन्ति ता ।।
"या चीध माता 'भगिनी सखी ति च,

‘‘दासी च भरिया’ ति च सा पवुच्चति।।

सीले ठितत्ता चिररत्तसंवुत्ता ।

कायस्स भेदा सुगतिं वजन्ति ता’ ति ।।

इमा खो, सुजाते, सत्त पुरिसस्स भरियायो । तासं त्व कतमा’ ति? ‘‘अज्जतग्गे मं, भन्ते, भगवा सखीसमं सामिकस्स भरियं धारेतूं’’ ति ।

**(आवश्यक फेरफार करून अंगुत्तर निकाय – अव्याकतवग्गो – १०)**

## शब्दार्थ

**गहपति (पु.)** – गृहपती, घरचा मालक, व्यापारी

**निवेसनं (न.पुं.)** – घर, गृह

**सद्द (पु.)** – आवाज, शब्द

**कुल (न.पुं)** – परिवार, कुळ

**गरूं (विं.)** – सन्मान

**सखीसमा (पुं.)** – मित्रासारखी

**दासी (स्त्री.)** – दासी, सेविका

**एकमन्तं (क्रि. वि.)** – एका बाजूला, एकीकडे

**उच्चा (वि.क्रि.)** – उंच

**अड्ढ – (वि.)** – धनाढ्य, फार श्रीमंत

**आदियति (क्रि.)** – आदर करणे

**अय्य (पुं.)** – आर्य, स्वामी

**फरूस (वि.)** – कठोर, कटु बोलणे.

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) तथागत बुद्ध कोठे गेले?

२) कोणाच्या घरामधून मोठमोठ्याने आवाज ऐकू येत होता?

३) अनाथपिण्डिक गहपतीने कोणाला अभिवादन केले?

४) तथागत बुद्ध अनाथपिण्डिक गहपतीला काय म्हणाले?

५) अनाथपिंण्डिकाने तथागताला काय सांगितले?

६) सुजाता अनाथपिण्डिक गहपतीची कोण होती?

७) सुजाता कोणाचा आदर करत नसे?

८) तथागत बुद्धाने कोणाला आमंत्रित केले?

९) तथागत बुद्धाने सुजाताला कोणता उपदेश केला?

१०) तथागतांच्या उपदेशानंतर कोणत्या प्रकारची पत्नी बनणार असे सुजाता म्हणाली?

**२. सत्य / असत्य लिहा.**

१) केवट्टा मञ्ञे मच्छविलोपे ‘ति।

२) अथ खो भगवा सुजातं घरसुण्हं आमन्तेसि– ‘‘एहिसुजाते’’ति।

३) पञ्च खो इमा, सुजाते, पुरिसस्सभरियायो।

४) भगवन्तं अभिवादेत्वा एकमन्तं निसीदिं।

५) सीले ठितत्ता अचिररत्तसंवुत्ता।

६) भगवा सखीसमं सामिकस्स भरियं धरेतूं''ति।

## ३. सूचनेनुसार कृती करा.

१) निवास । (पुर्वकालवाचक अव्यय बनवा)

२) होन्ति । (काळ ओळखा)

३) अभिवादेत्वा। (अव्यय ओळखा)

४) आदियति। (काळ ओळखा)

## ४. संधी करा

अ) तेन + उपसङ्कमि


ब) एतद + अवोच

## ५. रिकाम्या जागा भरा.

१) गहपति भगवा..........।

२) अयं भन्ते ......... घरसुण्हा अङ्कुला आनिता।

## ६ जाळरेखाचित्र पूर्ण करा.




☆☆☆

# ४. बिजानं च खेत्तानं च कसिकम्मानञ्च वण्णना

**प्रस्तावना**

भारतामध्ये आज आपण विविध प्रकारची सुधारित शेती करत आहोत. तसेच प्राचीन काळी देखील भारतात विविध प्रकारची शेती केली जात होती. ह्या शेतीविषयीचे वर्णन पालि 'तिपिटक ग्रंथा'तील दीघनिकायाच्या अंतर्गत येणाऱ्या 'चुल्लवग्ग' या ग्रंथात आलेले आहे. प्राचीन काळापासून भारत (जम्बुदीप) कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जात होता. आरोग्यदायी शेती त्या काळात कशी करत होते, पोषणमान व राहणीमान तसेच आरोग्य सुधारणा इत्यादीचे वर्णन प्रस्तुत पाठात आले आहे. (जसे-मूलबीजं, खन्धबीजं, फळुबीजं, अग्गबीजं, आणि बीजबीजंमेव इत्यादी) निसर्गात अनेक औषधी वनस्पती असून त्याची माहिती, ओळख व जतन व्हावे हा या पाठाचा उद्देश आहे.

तिपिटके नानपकारानं बिजानं च खेत्तानं च कसिकम्मानञ्च वण्णना आगता । तदानिपि लोके, धञ्ञानं अभिनिप्फादीतुं बीजानि च खेत्तानि च कसिकम्मानि च पधानानि अहेसुं । दीघनिकाये नानपकारानं बिजानं वण्णना आगता । अङ्गुत्तरनिकाये खेत्तानं वण्णना वित्थारिता । चुल्लवग्गे कसिकम्मानं वण्णना निद्दिट्ठा। तेसं संक्खितवण्णना इमिना नयेन ञातब्बा। तत्थ पञ्चविधानि बीजानि होन्ति। कतमानि पञ्च? सेय्यथीदं-**मूलबीजं खन्धबीजं फळुबीजं अग्गबीजं बीजबीजं**मेव पञ्चमं। मूलमेव बीजं मूलबीजं, मूलं बीजं एतस्सातिपि मूलबीजं । सेसेसुपि एसेव नयो। **फळुबीजं** ति पब्बबीजं । तत्थ मूलबीजं नाम हलिद्दि, सिङ्गिवेरं, वचा, वचत्तं, अतिविसा, कटुकरोहिणी, उसीरं, भद्दमुत्तकन्ति एवमादि। **खन्धबीजं** नाम अस्सत्थो, निग्रोधो, पिलक्खो, उदुम्बरो, कच्छको, कपित्थनोति एवमादि। फळुबीजं नाम उच्छु, नळो, वेळूति एवमादि । **अग्गबीजं** नाम अज्जकं, फणिज्जकं, हिरिवेरन्ति एवमादि । **बीजबीजं** नाम पुब्बण्णं अपरण्णन्ति एवमादि । सब्बञ्हेतं रुक्खतो वियोजितं विरुहनसमत्थमेव ''बीजगामो'' ति वुच्चति।

खेत्तस्स अङ्गानं वण्णना इमिना नयेन ञातब्बा। अट्ठङ्गसमन्नागते, खेत्ते बीजं वुत्तं न महप्फलं होति न महस्सादं न फातिसेय्यं । सचे इध, खेत्तं उन्नामनिन्नामि च होति, पासाणसक्खरिकञ्च होति, ऊसरञ्च होति, न च गम्भीरसितं होति, न आयसम्पन्नं होति, न अपायसम्पन्नं होति, न मातिकासम्पन्नं होति, न मरियादसम्पन्नं होति । एवं अट्ठङ्गसमन्नागते, खेत्ते बीजं वुत्तं न महप्फलं होति न महस्सादं न फातिसेय्यं । अट्ठङ्गसमन्नागते, खेत्ते बीजं वुत्तं महप्फलं होति महस्सादं फातिसेय्यं । सचे इध, खेत्तं अनुन्नामानिन्नामि च होति, अपासाणसक्खरिकञ्च होति, अनूसरञ्च होति, गम्भीरसितं होति, आयसम्पन्नं होति, अपायसम्पन्नं होति, मातिकासम्पन्नं होति, मरियादसम्पन्नं होति। एवं अट्ठङ्गसमन्नागते, खेत्ते बीजं वुत्तं महप्फलं होति महस्सादं फातिसेय्यं।

कसिकम्मानं वण्णना इमिना नयेन ञातब्बा। पठमं खेत्तं कसापेतब्बं । कसापेत्वा वपापेतब्बं । वपापेत्वा उदकं अभिनेतब्बं । उदकं अभिनेत्वा उदकं निन्नेतब्बं। उदकं निन्नेत्वा निद्धापेतब्बं । निद्धापेत्वा लवापेतब्बं। लवापेत्वा उब्बाहापेतब्बं । उब्बाहापेत्वा पुञ्जं कारापेतब्बं । पुञ्जं कारापेत्वा मद्दापेतब्बं । मद्दापेत्वा पलालानि उद्धरापेतब्बानि। पलालानि उद्धरापेत्वा भुसिका उद्धरापेतब्बा । भुसिकं उद्धरापेत्वा ओपुनापेतब्बं। ओपुनापेत्वा अतिहरापेतब्बं। अतिहरापेत्वा आयतिम्पि वस्सं एवमेव कातब्बं, आयतिम्पि वस्सं एवमेव कातब्बं'' ति। एवं बीजानं च खेत्तानं च कसिकम्मानं च वण्णना इमिना नयेन जानितब्बा । तेसं वित्थारकथा पिटकन्थेसु, अट्ठकथासु पि दिस्सति ।

**(दीघनिकाय अट्ठकथा, अङ्गुत्तरनिकाय, चुल्लवग्ग)**

### १. मूलबीजं



हलिद्दि - हळद



सिङ्गिवेरं - आले



वचा, वचत्तं -
वेखंडाच्या जातीचे मूळ



भद्दमुत्तकं - नागरमोथा

### २. खन्धबीजं



पिलक्खो -
गन्धउंबर



उदुम्बरो -उंबर



कपित्थ - कवठ



अस्सत्थो-पिंपळ



निग्रोध - वड


### ३. फळुबीजं



उच्छु - ऊस



नळो - वेत



वेळू - बांबू

### ४. अग्गबीजं



हिरिवेर - बारमाही गवत



अज्जकं - तुळस

### ५. बीजबीजं





अपरण्णं-पुब्बण्णं - तृणधान्य आणि कडधान्य

| शब्द | रूप | अर्थ |
|---|---|---|
| **मूलबीजं** | नाम, नपुंसकलिंग | मूळरूपी बीज अर्थात अशा वनस्पती की ज्यांची उत्पत्ती मुळांपासून होते. |
| हलिद्दि | नाम, स्त्रीलिंग | हळद |
| सिङ्गिवेरं | नाम, नपुंसकलिंग | आले |
| वचा | नाम, स्त्रीलिंग | वेखंडाच्या जातीचे मूळ |
| वचत्तं | नाम | एका प्रकारच्या वेखंडाच्या जातीचे मूळ |
| कटुकरोहिणी | (कटुक) विशेषण, (रोहिणी) नाम, स्त्रीलिंग | बालकडू |
| उसीरं | नाम, नपुंसकलिंग | वाळा |
| भद्दमुत्तकं | नाम | नागरमोथा |
| **खन्धबीजं** | (खन्ध) नाम, पुल्लिंग (बीजं) नाम, नपुंसकलिंग | फांदीरूपी बीज अर्थात अशा वनस्पती की ज्यांची उत्पत्ती फांद्यांपासून होते. |
| अस्सत्थो | नाम, पुल्लिंग | पिंपळ, अश्वत्थ |
| निग्रोधो | नाम, पुल्लिंग | वड, वटवृक्ष |
| पिलक्खो | नाम, पुल्लिंग | बस्सरी, गन्धउंबर |
| उदुम्बरो | नाम, पुल्लिंग | उंबर |
| कच्छको | नाम, पुल्लिंग | एका प्रकारचा अंजीर वृक्ष |
| कपित्थ | नाम, पुल्लिंग | कवठ |
| **फळुबीजं** | विशेषण | डोळारूपी बीज अर्थात अशा वनस्पती की ज्यांची उत्पत्ती त्यांच्या डोळ्यांपासून होते. |
| उच्छु | नाम, पुल्लिंग | ऊस |
| नळो | नाम, पुल्लिंग | वेत |
| वेळू | नाम, पुल्लिंग | बांबू |
| **अग्गबीजं** | (अग्ग) विशेषण<br>(बीजं) नाम, नपुंसकलिंग | शेंडारूपी बीज अर्थात अशा वनस्पती की ज्यांची उत्पत्ती त्यांच्या शेंड्यापासून होते. |
| अज्जकं | नाम | तुळस |
| फणिज्जकं | नाम | तुळशीचा एका प्रकार |
| हिरिवेर | नपुंसकलिंग | बारमाही गवत |
| **बीजबीजं** | नाम, नपुंसकलिंग | बियारूपी बीज अर्थात अशा वनस्पती की ज्यांची उत्पत्ती बियांपासून होते. |

| | | |
|---|---|---|
| अपरण्णं, पुब्बण्णं | नाम, पुल्लिंग | तृणधान्य आणि कडधान्य |
| महस्सादं | (अस्सादं) नाम, पुल्लिंग | स्वादयुक्त |
| फातिसेय्यं | विध्यर्थ | स्वास्थ्यप्रद |
| उन्नामनिन्नामि | विशेषण | वरखाली |
| पासाणसक्खरिकं | विशेषण, पासाण (पुल्लिंग), सक्खरिकं (स्त्रिलिंग) | (पासाण) दगड, (सक्खरिकं) खरीचा दगड, खडबडीत |
| उसरं | विशेषण | क्षारयुक्त |
| गम्भीरसितं | विशेषण | खोबणी, नांगराने केलेला फाळ |
| आयसम्पन्नं | कर्मणी भूतकाळवाचक धातुसाधित विशेषण | पाणी येण्याचा मार्ग |
| अपायसम्पन्नं | कर्मणी भूतकाळवाचक धातुसाधित विशेषण | पाणी काढण्याचा मार्ग |
| मातिकासम्पन्नं | कर्मणी भूतकाळवाचक धातुसाधित विशेषण | पाणी जाण्यासाठी नाली |
| मरियादसम्पन्नं | कर्मणी भूतकालवाचक धातुसाधित विशेषण | परिसीमा |
| कसापेतब्बं | कर्मणी विध्यर्थक धातुसाधित विशेषण | नांगरले पाहिजे |
| वपापेतब्बं | कर्मणी विध्यर्थक धातुसाधित विशेषण | पेरणी केली पाहिजे |
| उदकं | नाम, नपुंसकलिंग | पाणी |
| अभिनेतब्बं | कर्मणी विध्यर्थक धातुसाधित विशेषण | पाणी भरले पाहिजे |
| उदकं निन्नेतब्बं | कर्मणी विध्यर्थक धातुसाधित विशेषण | पाणी भरून काढले पाहिजे |
| निद्धापेतब्बं | कर्मणी विध्यर्थक धातुसाधित विशेषण | काढले पाहिजे |
| लवापेतब्बं | कर्मणी विध्यर्थक धातुसाधित विशेषण | कापले पाहिजे |
| मद्दापेतब्बं | कर्मणी विध्यर्थक धातुसाधित विशेषण | रगडले पाहिजे |
| अतिहरापेतब्बं | कर्मणी विध्यर्थक धातुसाधित विशेषण | पाखडून एकत्र केले पाहिजे |
| आयतिम्पि वस्सं | (वस्सं) नाम, पुल्लिंग | पुढच्या पावसाळ्यात |

## स्वाध्याय

### १. एका वाक्यात माध्यम भाषेत उत्तरे लिहा.

१) 'मूलबीज' म्हणजे काय?

२) फळुबीजांचे उदाहरण लिहा.

३) शेतीचे किती गुण सांगितले आहेत?

४) शेतीचे वर्णन वरील उताऱ्यामध्ये कशामध्ये आले आहे?

५) मूलबीजांचे प्रकार लिहा.

६) खन्धबीजांचे प्रकार लिहा.

७) अग्गबीजांचे प्रकार लिहा.

८) खाद्ययुक्त स्वास्थ्यप्रद पीक येण्यासाठी बियांची पेरणी कशा प्रकारच्या शेतीमध्ये करावी?

९) शेतीकामाचे वर्णन करा.

१०) किती प्रकारच्या बियांचे वर्णन वरील उताऱ्यामध्ये आले आहे?

### २. सत्य / असत्य लिहा.

१) मूलबीज उच्छु नळो, वेळू ।

२) खन्धबीजं नाम पुब्बळा अपरण्णं।

३) खेत्ते बीज वुत्तं न महप्फलं होति।

४) सचे खेत्तं न उन्नामतिन्नामि च होति ।

५) पठमं खेत्तं कसापेतब्ब।

६) कसापेत्वा अभिनेतब्बं ।

### ३. सूचनेनुसार कृती करा.

१) .......... खेत्ते बीजं वुत्तं न महप्फलं होति न महस्सादं न फातिसेय्य । (रिकाम्या जागा भरा)

२) सचे इध, खेत्त ..... च होति अपासाणसक्खरिकग्घ होति । (वाक्य पूर्ण करा.)

३) कटुकरोहिणी (माध्यमभाषेत अर्थ लिहा.)

४) दीघनिकाये, नानापकारानं <u>बीजानं</u> वण्णना आगता। (अधोरेखित शब्दाचे रूप ओळखा)

५) कसापेत्वा <u>वपापेतब्बं</u>। (अधोरेखित शब्दाचे रूप ओळखा)

### ४. योग्य जोड्या लावा

| 'अ' गट | | 'ब'गट | |
|---|---|---|---|
| अ) | पठमं खेत्तं | १) | पासाणसक्खरिकञ्च होति। |
| ब) | कसापेत्वा | २) | कातब्बं''ति |
| क) | उच्छु | ३) | खन्धबीज |
| ड) | एवमेव | ४) | नळो |
| इ) | अन्नामनिन्नामि च होति | ५) | वपापेतब्बं |

### ५. माध्यम भाषेत उत्तरे लिहा.


१) पाठात आलेल्या बिजांची माहिती लिहा.

२) शेतीच्या गुणांची माहिती पाठाच्या आधारे स्पष्ट करा.


३) पाठात आलेल्या शेतीकामाचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

६. **जाळरेखाचित्र पूर्ण करा.**


१)





२)





३)




४)




५)




☆☆☆

# ५. असोकस्स गिरनार सिलालेखा

**प्रस्तावना**

देवांना प्रिय प्रियदर्शी राजा अशोकाने ठिकठिकाणी शिलालेख, गुहालेख व स्तंभलेख लिहिलेले आहेत. त्यांपैकीच गुजरात प्रांतातील गिरनार येथील सहाव्या व बाराव्या क्रमांकाचे शिलालेख यात आलेले आहेत.

या शिलालेखात देवांना प्रिय प्रियदर्शी राजा सर्वसामान्यांचे हित हेच माझे हित आहे. तसेच कोणीही आपलाच संप्रदाय, जात, धर्म श्रेष्ठ आहे असे न मानता सर्वांनी समता व बंधुता तसेच शोषणरहित शिकवण आत्मसात करावी हे या शिलालेखात सांगितले आहे.



देवानंप्पियदस्सि राजा एवं आह-अतिकन्ते अन्तरे। भूतपूब्बे सब्बं अत्थकम्मं पटिवेदका वा तं मया एवं कता। सब्बकाले भुञ्जमानम्हि मे ओरोचिता, मे गब्भागारम्हि वच्छम्हि वा विनितोम्हि च उय्यानेसु च सब्बत्थ, अथ पटिवेदका ठिता मे जनस्स। पटिवेदेथ इति सब्बत्थ च जनस्स अत्थं करोमि ये च किञ्चि मुखतो। आणापेय्यामि, सयं दापकं सावकानं वा ये वा पुनं महामत्तेसु। आयाचिको आरोपितं भवति, ताय अत्थाय विवादो निज्झापनं वा सन्तु परिसाय। अन्तरे पटिवेदेथ मं सब्बकाले ।

एवं मया आणापिता नत्थि हि मे तोसो। उट्ठानाय अथ संतिरणाय एवं कत्तब्बंहि एता मे सब्बलोकहिताय। तस्स पुनापि एवं मुले उट्ठानं च अथ संतिरणाय च नत्थि हि कम्मतरं। सब्बं लोकहिताय यं किञ्चि परक्कमामि अहं, किञ्चि भूतानं अणनं गच्छेय्यामि । इध च नाना सुखावायामितुं, परतो सग्गं आराधयीतुं ते एताय अत्थाय। अयं धम्मलिपिं लिखापिता, कित्ति चिरं तिट्ठेय्य, इति तथा च पुत्ता पोत्ता पपोत्ता च। अनुचरन्तुं सब्बलोकहिताय, दुक्करं तु इदं, अञ्ञथा अग्गेन परक्कमेन।

देवानंप्पियो पियदस्सि राजा सब्बपासण्डानं च पब्बजितानं च घरावासानं पुजयति दानेन च विविधाय च पूजाय पुजयति । न तु तथा दानं च पूजा च देवानंप्पियो मञ्ञति यथा कित्तिं, सारवड्ढना इति । अथ सबपासण्डानं सारं वड्ढतु बहुविधा। तस्स तु सञ्ञा इदं मूलं यो वचीगुत्तो। कित्तिं अत्तपासंडपूजा च परपासण्डे गरहा भवतु अप्पकारणेन पि, लहुका सन्तु। तं तं पकरणे पूजयतु तु एवं परपासंडाय, तेन पि कारणेन एवं करोन्तो अत्तपासंडा च वड्ढति परपासंडा च उपकरोति।

तदा अञ्ञथा करोन्तो अत्तपासंडे छड्डेति परपासंडे चापि अपकरोति। यो हि कोचि अत्तपासंडे पूजयति परपासंडे वा गरहाति। सब्बे अत्तपासण्डाय भातिका कित्ती अत्तपासण्डाय दिपेय्यमि, इति सो पुन तदा करोन्तो (सो) अत्तपासण्डाय बाळहत्तरं उपहनाति तदा समवायामो एवं साधु। कित्तीं अञ्ञमञ्ञंस्स, धम्मं सुणाथ च सुसारचं एवं देवानंप्पियस्स इच्छा। कित्तीं सब्बपासण्डानं बहुस्सुता च अत्थु, कल्याणगमा च अत्थु। ये च तत्थ पसन्ना तेहि वत्तब्बं। देवानंप्पियेन तथा दानं वा पूजं च मञ्ञति कित्तिसारं वड्ढ ति। अथ सब्बपासण्डाय बहुकाय च एताय। अथ व्यापता धम्ममहामत्ता च इत्थिदक्खमहामत्ता च वच्छभूमका च अञ्ञे च निकाया अयं एतस्स फला अत्तपासण्डा वड्ढति चापि ते धम्मस्स दिपना।

**संदर्भ – (अशोकाचे गिरनार शिलालेख मूळ धम्मलिपी मधील रूपांतरीत पालि – ६ वे व १२ वे)**

## शब्दार्थ

**देवानंप्पियो – (पु.)** देवांना प्रिय असणारा

**भुञ्जमानस – (क्रि.)** जेवत असतांना

**उय्यानेसु – (नपु.)** उद्यानात, बागेत

**महामन्तेसु – (पु.)** महामंत्री

**सब्बलोकहितं –** सर्व लोकांचे हित जोपासणारा

**पप्पोत्त – (पु.)** पणतु

**विविधाय – (अ.)** निरनिराळे

**मञ्ञते – (क्रि.)** मानणे

**बहुस्सुता –(वि.)** बहुश्रुत

**अञ्ञमञ्ञस – (वि.)** एकमेकांना

**अतिकन्तं – (पु.)** अनंत काळ, खूप कालावधी

**आरोधनम्हि – (क्रि.)** घोड्यावर स्वार होणे

**सब्बत्थं –** सर्वत्र

**आणापितं– (क्रि.)** आज्ञा देणे

**पराक्कमामि –** मी पराक्रम करतो

**पासंडानि – (स्त्री.)** संप्रदाय

**दानेन – (क्रि.)** दान, दाना द्वारे

**पकरणेन –** प्रकरणाने

**हिताय – (अ.)** हितासाठी

**निकाया – (क्रि.)** निकाय, गट

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ‘देवानंप्पियो पियदस्सि रञ्ञो’ चा मराठी अर्थ सांगा.

२) (वृत्तदात्याने) माहिती देणाराने कोणाविषयी माहिती दिली?

३) धम्मप्रिय अशोकराजाचे कर्तव्य कोणते आहे?

४) हा शिलालेख कोणाच्या हितासाठी लिहीला आहे?

५) धम्मप्रिय अशोक कोणाचा सन्मान करतात?

६) धम्मप्रिय अशोक राजा कशाची इच्छा व्यक्त करतात?

७) हा शिलालेख कोठे लिहिला आहे?

## २. खालील वाक्य सत्य/असत्य लिहा.

१) सारं वड्ढतु न बहुविधा।

२) पुजयतु तु एवं पारपासण्डाय तेन पि कारणेन।

३) तदा समवायमो एवं असाधु।

४) देवानंप्पियदस्सि राजा एवं आहं।

५) कत्तब्बंहि एता मे न सब्बलोकहितं।

६) नत्थि हि कम्मतरं सब्बं लोकहितेन।

## ३. सूचनेप्रमाणे कृती करा.

### अ) रूपे ओळखा

करोति

आणापयामि

भवति

आराधयतुं

एताय

पुजयति

### ब) संधी सोडवा

अन +अन्तंर

न + अत्थि

किं + इति

सब्ब +अत्थं

दान + ऐन

### क) माध्यम भाषेत अर्थ लिहा.

पासण्डानि

सब्बत्थ

बहुस्सुता

पप्पोत्त

### ड) योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.

१) देवानंप्पियो पियदस्सि ............ एवं आहं। (राजा/राजाय)

२) नत्थि हि मे तोसो .......... अथ संतीरणाय। (उठानाय/उठनं)


३) ते एताय अत्थाय अयं .......... लेखापिता। (धम्मलिपिं/धम्मलिपीं)

४) यो हि कोचि अत्तपासंडे............ पारपासंडे वा गरहाति। (पूजयन्ति/पुजयति)

## ४. जोड्या लावा.

| अ गट | | ब गट | |
|---|---|---|---|
| १) | देवानंप्पियदस्सि | अ) | आणापिता |
| २) | सब्बत्थ च जनस्स | ब) | राजा एवं आह। |
| ३) | एवं मया | क) | अत्थं करोमि। |

## ५. रेखाजाळे पूर्ण करा.




☆☆☆

# ६. लोकसुत्तं

**प्रस्तावना**

प्रस्तुत पाठ्यघटक खुद्दकनिकायातील 'उदान' ह्या ग्रंथातून घेतलेला आहे. यामध्ये तथागत बुद्धत्व प्राप्त करून उरूवेलामध्ये विहार करीत असतांना विमुक्तीसुखाचा अनुभव करीत होते. तेव्हा तो आठवडा संपल्यानंतर तथागताने त्या समाधीतून उठून बुद्धचक्षुने जगाचे अवलोकन केले. हे पाहत असतांना तथागतांनी जगातील लोकांना राग, लोभ, द्वेष, मोह, माया, मत्सर इ. विकारांच्या अग्नीत जळतांना पाहिले. हे पाहत असतांना तथागताच्या तोंडून खालील उदान निघाले.

उपरोक्त पाठ्यघटकातून हे स्पष्टपणे आढळून येते की, माणसाला विकारापासून मुक्ती कशी मिळवता येईल व निसर्गदत्त स्वभावाचे संरक्षण करणे याविषयीचा उपदेश या पाठात आहे.

एवं मे सुतं एकं समयं भगवा उरुवेलायं विहरति नेरञ्जराय तीरे बोधिरुक्खमूले पठमाभिसम्बुद्धो । तेन खो पन समयेन भगवा, सत्ताहं एकपल्लङ्केन निसिन्नो होति विमुत्तिसुखपटिसंवेदी।

अथ खो भगवा, तस्स सत्ताहस्स अच्चयेन तम्हा समाधिम्हा वुट्ठहित्वा बुद्धचक्खुना लोकं वोलोकेसि। अद्दसा खो भगवा बुद्धचक्खुना वोलोकेन्तो सत्ते अनेकेहि सन्तापेहि सन्तप्पमाने, अनेकेहि च परिळाहेहि परिडय्हमाने –रागजेहिपि, दोसजेहिपि, मोहजेहिपि ।

अथ खो भगवा एतमत्थं विदित्वा तायं वेलायं इमं उदानं उदानेसि –

''अयं लोको सन्तापजातो, फस्सपरेतो रोगं वदति अत्ततो।

येन येन हि मञ्ञति, ततो तं होति अञ्ञथा।।

''अञ्ञथाभावी भवसत्तो लोको, भवपरेतो भवमेवाभिनन्दति।

**यदभिनन्दति तं भयं, यस्स भायति तं दुक्खं।**

**भवविप्पहानाय खो पानंद ब्रह्मचरियं वुस्सति''।।**



'ये हि केचि समणा वा ब्राह्मणा वा भवेन भवस्स विप्पमोक्खमाहंसु, सब्बे ते अविप्पमुत्ता भवस्मा' ति वदामि। 'ये वा पन केचि समणा वा ब्राह्मणा वा विभवेन भवस्स निस्सरणमाहंसु, सब्बे ते अनिस्सटा भवस्मा' ति वदामि।

''उपधिञ्हि पटिच्च दुक्खमिदं सम्भोति, सब्बुपादानक्खया नत्थि दुक्खस्स सम्भवो। लोकमिमं पस्स; पुथू अविज्जाय परेता भूता भूतरता अपरिमुता। ये हि केचि भवा सब्बधि सब्बत्थताय सब्बे ते भवा अनिच्चा दुक्खा विपरिणामधम्मा' ति।

**''एवमेतं यथाभूतं, सम्मप्पञ्ञाय पस्सतो ।**

**भवतण्हा पहीयति, विभवं नाभिनन्दति ।।**

''सब्बसो तण्हानं खया, असेसविरागनिरोधो निब्बानं।

तस्स निब्बुतस्स भिक्खुनो, अनुपादा पुनब्भवो न होति।

अभिभूतो मारो विजितसङ्गामो, उपच्चगा सब्बभवानि तादी'' ति ।।

**(उदान-नन्दवग्गो)**

## शब्दार्थ

**विहरति (क्रि)** – विहार करतो

**वोलोकेन्तो (क्रि)** – अवलोकन करतांना

**दोसजेहिपि (वि)** – दोषाला जिंकून सुद्धा

**फस्सपरेतो (वि)** – स्पर्शयुक्त

**भायति (क्रि)** – घाबरतो

**भवतण्हा (स्त्री.)** – मानवी आसक्ती

**तण्हानं (स्त्री.)** – तृष्णेला

**पुनब्भवो (पु)** – पुर्नजन्म

**उपच्चगा (क्रि)** – पार झाला, ओलांडून गेला.

**एकपल्लंकेन (क्रि)** – मांडी घालून बसल्याने

**रागजेहिपि (वि)** – रागाला जिंकून सुद्धा

**मोहजेहिपि (वि)** – मोहाला जिंकून सुद्धा

**मञ्ञति (नपुं)** – संकल्प, विचार करणे

**यथाभूतं (वि)** – यथार्थ

**नाभिनन्दति (क्रि)** – अभिनंदन करीत नाही

**असेसविरागनिरोधो** – संपूर्ण अनासक्त

**विजितधम्मो (वि)** – विजयी

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) तथागत कोठे विहार करत होते?

२) तथागतांना जगातील लोक कोणत्या दुक्खाने त्रस्त दिसले?

३) तथागतांच्या मुखातून कोणते उद्‌गार निघाले?

४) 'संसारापासून कोण मुक्त झालेले नसतात' असे तथागत म्हणतात.

५) उपादानाचा नाश झाल्याने काय उत्पन्न होत नाही?

६) जगातील सर्व वस्तू कशा आहेत?

७) सत्याला प्रज्ञेने पाहून कोणत्या दोन गोष्टींचा त्याग केला पाहिजे?

**२. सत्य / असत्य लिहा.**

१) एकं समयं भगवा उरूवेलायं विहरति।

२) सब्बे ते अविप्पमुत्ता भवस्मा' ति वदाम।

३) तेन खो पन समयेन भगवा सत्ताहं पल्लङ्केन निसिन्नो होति।

३. जोड्या लावा.

| ‘अ’गट | | ‘ब’ गट | |
|---|---|---|---|
| १) | येन येन हि मञ्ञति | अ) | विभवं नाभिनन्दति |
| २) | भवतण्हा पहीयति | ब) | यस्स भायति तं दुक्खं |
| ३) | यदभिनन्दति तं भयं | क) | ततो तं होति अञ्ञथा |


४. सूचनेनुसार कृती करा.

१) विहरति
२) सत्ताहस्स
३) वुट्ठहित्वा
४) वदति
५) भायति
६) वदामि

५. योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.

१) यस्स भायति तं......। (दुक्खेन/दुक्खं)
२) सब्बसो .........खया । (तण्हानं/तण्हाय)
३) अनुपादा पुनब्भवो न ........। (होति/होन्ति)

६. जाळरेखाचित्र पूर्ण करा.




☆☆☆


# ७. चूळसेट्ठि जातकं

**प्रस्तावना**

एका गरीब चूळन्तेवासिक नावाच्या कुलपुत्राने मरून पडलेल्या उंदराला विकून अत्यंत उपाय कौशल्याने (व्यवहार चातुर्याने) अतिशय कमी अवधीत भरपूर धन कमावले, याचे या कथेत सुंदर रितीने वर्णन केले आहे. व्यक्तीने व्यवहार कौशल्याचा वापर कसा करावा काळचातुर्य कसे वापरावे? धनाचा वापर कसा करावा? उपाययोजना कशी करावी याचे व्यावहारिक ज्ञान तसेच व्यवसाय, व्यापार करतांना कोणत्याही गोष्टीला क्षुल्लक न समजणे. टाकाऊ वस्तूपासून सुद्धा व्यवहार करता येतो याचे विवेचन या पाठात केले आहे.

अतीते कासिरट्ठे वाराणसियं ब्रह्मदत्ते रज्जं कारेन्ते बोधिसत्तो सेट्ठिकुले निब्बति। तस्स चूळसेट्ठि नाम अहोसि। सो पण्डितो ब्यतो सब्बनिमित्तानि जानाति। अञ्ञतरो एको दुग्गतकुलपुत्तो तं चूळसेट्ठिस्स वचनं सुत्वा मतमूसिकं गण्हि। मतमूसिकं गहेत्वा एकस्मिं आपणे बिळालस्सत्थाय विक्किणि। विक्किणित्वा काकणिकं लभि। काकणिकं लभित्वा ताय काकणिकाय फाणितं गहेत्वा एकेन घटेन पानीयं गण्हि। सो अरञ्ञतो आगच्छन्ते मालाकारे दिस्वा थोकं थोकं फाणितखण्डं दत्वा उळुङ्केन पानीयं अदासि, ते चस्स एकेकं पुप्फमुट्ठिं अदंसु। तं पुप्फमुट्ठिं गहेत्वा एकस्मिं आपणे विक्किणि। सो न चिरस्सेव इमिना उपायेन अट्ठ कहापणे लभि। पुन एकस्मिं वातवुट्ठिदिवसे राजुय्याने बहू सुक्खदण्डका च साखा च पालासञ्च वातेन पातितं होति। ततो परं सब्बानि दारुपण्णानि नीहरापेत्वा उय्यानद्वारे रासिं कारेसि। तं दारुपण्णानि गहेत्वा राजकुम्भकारस्स राजकुले भाजनानं पचनत्थाय विक्किणि। सो इमिना उपायेन सोळस कहापणे लभि।

सो चतुवीसतिया कहापणेसु जातेसु, ''अत्थि अयं उपायो मय्हन'' ति नगरद्वारतो अविदूरे ठाने एकं पानीयचाटिं ठपेत्वा पञ्चसते तिणहारके पानीयेन उपट्ठहि। ते आहंसु ''सब्ब, त्वं अम्हाकं बहूपकारो, किं ते करोमा'' ति? सो ''मय्हं किच्चे उप्पन्ने करिस्सथा'' ति वत्वा इतो चितो च विचरन्तो थलपथकम्मिकेन च जलपथकम्मिकेन च सद्धिं मित्तसन्थवं अकासि। तस्स थलपथकम्मिको ''सर्व इमं नगरं अस्सवाणिजको पञ्च अस्ससतानि गहेत्वा आगमिस्सती'' ति आचिक्खि। सो तस्स वचनं सुत्वा तिणहारके आह ''अज्ज मय्हं एकेकं तिणकलापं देथ, मया च तिणे अविक्किणिते अत्तनो तिणं मा विक्किणथा'' ति। ते ''साधू'' ति सम्पटिच्छित्वा पञ्च तिणकलापसतानि आहरित्वा तस्स घरे पापयिंसु। अस्सवाणिजो सकलनगरे अस्सानं गोचरं अलभित्वा तस्स सहस्सं दत्वा तं तिणं गण्हि।



ततो कतिपाहच्चयेनस्स जलपथकम्मिको सहायको आरोचेसि ''पट्टनम्हि महानावा आगता'' ति। सो ''अत्थि अयं उपायो'' ति अट्ठहि कहापणेहि सब्बपरिवारसम्पन्नं तावकालिकं रथं गहेत्वा महन्तेन यसेन नावापट्टनं गन्त्वा

एकं अङ्गुलिमुद्दिकं नाविकस्स सच्चकारं दत्वा अविदूरे ठाने साणिया परिक्खिपापेत्वा निसिन्नो पुरिसे आणापेसि ‘‘बाहिरतो वाणिजेसु आगतेसु ततियेन पटिहारेन मं आरोचेथा’’ ति। ‘‘नावा आगता’’ ति सुत्वा वाराणसितो सतमत्ता वाणिजा ‘‘भण्डं गण्हामा’’ ति आगमिंसु। भण्डं तुम्हे न लभिस्सथ, असुकट्ठाने नाम महावाणिजेन सच्चकारो दिन्नोति। ते तं सुत्वा तस्स सन्तिकं आगता। पादमूलिकपुरिसा पुरिमसञ्ञावसेन ततियेन पटिहारेन तेसं आगतभावं आरोचेसुं। ते सतमत्ता वाणिजा एकेकं सहस्सं दत्वा तेन सद्धिं नावाय पत्तिका हुत्वा पुन एकेकं सहस्सं दत्वा पत्तिं विस्सज्जापेत्वा भण्डं अत्तनो सन्तकमकंसु।

चूळन्तेवासिको द्वे सतसहस्सानि गण्हित्वा वाराणसियं आगन्त्वा ‘‘कतञ्ञुत मे भवितुं वट्टती’’ ति एकं सतसहस्सं गाहापेत्वा चूळसेट्ठिस्स समीपं गतो। अथ नं सेट्ठि ‘‘किं ते, तात, कत्वा इदं धनं लद्धं’’ ति पुच्छि। सो ‘‘तुम्हेहि कथितुपाये ठत्वा चतुमासम्भन्तरेयेव लद्धं’’ ति मतमूसिकं आदिं कत्वा सब्बं वत्थुं कथेसि। चूळसेट्ठि तस्स वचनं सुत्वा ‘‘इदानि एवरूपं दारकं मम सन्तकं कातुं वट्टती’’ ति वयप्पत्तं अत्तनो धीतरं दत्वा सकलकुटुम्बस्सं सामिकं अकासि। सो सेट्ठिनो अच्चयेन तस्मिं नगरे सेट्ठिट्ठानं लभि। बोधिसत्तोपि यथाकम्मं अगमासि।

**(जातककथा)**

## शब्दार्थ

**ब्यत्तो (वि.)** – व्यवहार चतुर

**मतमूसिकं (पु.)** – मेलेला उंदीर

**बिळालस्सत्थाय (पु.)** – मांजरासाठी

**काकणिकं (स्त्री.)** – कांकणी

**उळङ्केन (पु.)** – मोठा चमच्या द्वारे

**वातवुट्ठिदिवसे (स्त्री.)** – वादळी पाऊसाच्या दिवशी

**कहापणे (न.पु.)** – सुवर्णमुद्रा, कार्षापणामध्ये

**थलपथकम्मिकेन (पु.)** – भूभागावर काम करणाऱ्या द्वारे, कामगाराद्वारे

**अस्सवणिजको (पु.)** – घोड्यांचा व्यापारी, घोड्याच्या

**नावापट्टनं (स्त्री.)** – काठावरील नावेला, जहाजाला

**भण्डं (न. पु.)** – साहित्य, सामान्य वस्तू

**दुग्गतकुलपुत्तो (पु.)** – गरीब कुळातील मुलगा

**आपणे (नपुं.)** – बाजार

**विक्किणि (क्रि)** – विकले

**फाणितं (पु.)** – काकवी, गुळाचा पाक

**पुप्फमुट्ठिं (पु.)** – मूठभर फुले

**राजकुम्भकारस्स (पु.)** – राजाच्या कुंभाराचे

**तिणहारके (पु.)** – गवत विकणारा

**मित्तसन्थवं (पु.)** – मैत्रीसंबंध

**सहस्सं (सं.वि. नपुं.)** – हजार

**अङ्गुलिमुद्दिकं (नपु.)** – बोटातील अंगठी

**गण्हामा (क्रि.)** – ग्रहण करतो

## स्वाध्याय

**१. अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) चूळसेट्ठि कोण होता?

२) चूळन्तेवासिक गरीब मुलाने काय ऐकले?

३) मरून पडलेला उंदीर मुलाने कोणाला विकला?

४) उंदीर विकून आलेल्या पैशाचे त्याने काय केले?

५) माळ्यांना गूळपाणी देण्याचा मोबदला मुलाला काय मिळाला?

६) पुष्पगुच्छ विकून त्याला किती फायदा झाला?

७) वादळ आल्याने राज उद्यानात काय झाले?

८) चूळन्तेवासिकाने बागेतील पाचोळा व फाद्यांचा ढीग कसा स्वच्छ केला?

९) गवत विकणाऱ्यांना चूळन्तेवासिकाने काय विनंती केली?

१०) चूळन्तेवासिकाने कृतज्ञतेपोटी चूळसेट्ठिला काय दिले?


## ब) सत्य / असत्य लिहा.

१) मतमूसिकं गहेत्वा एकस्मिं आपणे बिळालस्सत्थाय विक्किणि।

२) ''पट्टनम्हि महानावा आगता'' ति, ''सो नत्थि अयं उपायो'' ति।

३) ''नावा आगता'' ति सुत्वा वाराणसितो सतमत्ता वाणिजा ''भण्डं गण्हामा'' ति।

## क) जाळरेखाचित्र पूर्ण करा.




## २. सूचनेनुसार कृती करा.

### अ) पालि विरुद्धार्थी शब्द लिहा.

१) लभि

२) देथ

३) अत्थि

४) साधू

### ब) पालि समानार्थी शब्द लिहा.

१) काकाणिकं

२) पानीयं

३) आह

४) मा

### क) रूपे ओळखा

१) देथ

२) लभि

३) अत्थि

४) जानाति

### ड) योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.

१) ''इदानि एवरूपं ................मम सन्तकं कातुं वट्टती'' ति। (मम/मम्हं)

२) ''अज्ज मय्हं ........... तिणकलापं देथ। (एकेकं/द्वे)

३) ततो कति पाहच्चयेनस्स जलपथकम्मिको सहायको.......... ''पट्टनम्हि महानावा आगता''ति। (आरोचेसि/रोचेसि)

४) सो इमिना उपायेन ............. कहापणे लभि। (तेरस/सोळस)

## ३. दीर्घोत्तरी प्रश्न

१) चुळन्तेवासिकाने अतिशय कमी वेळात भरपूर धन कसे कमविले?

☆☆☆

# ८. पजाहितदक्ख महारञ्ञो सयाजीरावो

**प्रस्तावना**

भारतामध्ये पूर्वी अनेक राजे-महाराजे होऊन गेलेत त्यामध्ये बडोदा संस्थानाचे सयाजीराव गायकवाड यांचे नाव अग्रस्थानी येते. हा राजा 'प्रजाहितदक्ष' राजा म्हणून नावारूपास आला. एक दत्तकपुत्र असूनही त्यांचा गोरगरिबा विषयी अतिशय करुणाभाव होता. त्यांनी सर्वसामान्य लोकांना विनामूल्य शिक्षण दिले. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे, वाचनालये, चलवाचनालये काढली. तसेच ते विविध कलांसाठी दक्ष राहिले. प्रस्तुत पाठाच्या आधारे त्यांचा विद्यार्थी हित, समाजहित, कला-कौशल्य तसेच अंधश्रद्धा निर्मुलन, अंधरूढी-परंपरा निर्मुलन, मिश्रविवाहाला प्रोत्साहन, विधवा विवाहाला प्रोत्साहन, बालविवाह नष्ट करण्याविषयीचा उपदेश विद्यार्थ्यांच्या जीवनात फलदायी ठरेल.



मज्झिम कालस्मिं भारतवस्से बहुनि रञ्ञो अहोसि। तेन महारञ्ञो सयाजीरावो गायकवाडो गुजराथरट्ठस्मिं वडोदरा सण्ठानस्स रञ्ञो अहोसि। अयं रञ्ञो बहुजन कल्याणत्थाय कम्मं कारेसि।

सयाजीरावो गायकवाडस्स पितु नाम कासिरावो होति। कासिरावो महासयो कसिकम्मं कारेसि। तेन समयेन वडोदरा सण्ठानस्स रञ्ञो खण्डेरावो गायकवाडो अट्ठादससतं सत्तति वस्से (१८७०) कालङ्कतो। कासिरावो गायकवाडस्स तनयो गोपाळरावो होति। सो जच्चं एकादस दिने ततिये मासे अट्ठादससतं तिसट्ठि (दि.११ मार्च १८६३)अहोसि। अयं सत्तवीसति अट्ठादससतं पञ्चसत्तति अट्ठवीसति पंचमो मासे (२८ मे १८७५) दिवसे दत्तको गण्हि। अपरभागे तस्स नामं सयाजीरावो कारेसि। तेन वडोदरा सण्ठानस्स रञ्ञो अधिक्कतो ।

सयाजीरावो गायकवाडस्स रज्जरोहणं समारम्भे अट्ठवीसति दिसम्बर मासे अट्ठादससतं एकासीति दिवसे (२८ डिसेंबर १८८१) अहोसि। तेन चतुसट्ठि वस्से रज्जं अकरि। अयं रञ्ञो वडोदरा सण्ठाने अज्झयनं अगण्हि। अप्पोसमये तेन महरट्ठि भासा आंग्ल भासाय च उरदु भासाय सिक्खा परिपुण्णं अकरि।

पुनं च परं तेन अस्सारोहणं, रज्जदरबारस्स परम्परानुसारेन रज्जकारं कम्मं सयं पापुणिं । वडोदरा सण्ठानस्स रञ्ञस्स दिवान सर टी माधवरावो महासयेन सयाजीराव रज्जकरणस्स सिक्खा परिपुण्णं पापुणिं । अयं रञ्ञो वडोदरा सण्ठानस्मिं बहुलोकोपयोगि कम्मं अकरिं।

सयाजीरावो रञ्ञो अत्तनो रज्जस्मिं दलिद्दो, अप्पभोजनो पजाय तस्स हितरक्खणाय सयं दक्ख अहोसि। तस्स 'पजाहितदक्ख रञ्ञो' अयं उपाधिपत्तं रञ्ञो अहोसि। अयं रञ्ञो अत्तनो सण्ठानस्मिं सिक्खा पसारेन बहुकम्मकारि अहोसि। विस्सेसो बहुजनसमाजस्स च दलिद्दो समाजस्स च सिक्खकरणत्थाय तेन पमुखट्ठानं

अदासि। तेन पाथमिकं सिक्खणं विनामूल्यं च बलेन च करोन्ति। तस्मिं समये अयं रज्ज भारतदेसे पठमं रज्जं वडोदरा सण्ठानं अहोसि। सयाजीरावो गायकवाडरञ्जेन सिक्खा गहणत्थाय विज्जापसारनत्थय मित्तेन वसतिगेहे निम्माणकम्मं कारेसि।

अपि च तेन सन्गीत च, नच्चं च नाट्यं च इमानि कलासु अज्झयनत्थ पोत्साहनं अदासि। तेन वाचनालयं एवं चलवाचनालयं रज्जेस्मिं एवं रज्जेबहिस्मिं अकरिं। तस्मिं समये समाजम्हि विसमवादं, अनिट्ठरुढी च अन्धपथा च अत्तज अत्तजा विवाहं विनट्ठकरणत्थायं पयास कारेसि। अपि च तेन विधवा विवाहं च मिस्सित विवाहं च सयंसासने पतिट्ठापेसि। अयं रञ्ञो समाजपरिवत्तनवादी विचारस्स अहोसि।

महारट्ठरज्जे च पन अञ्ञो रज्जे सयाजीरावेन निरधनं दारकानं विज्जागहणत्थाय सिस्सवुत्ति पदपिं कारेसि। तेनास्मिं पामुक्खो 'महस्सि विट्ठलो रामजी सिन्दे च डाक्टर बाबासाहेब आम्बेडकरो च महासयं लाभ पापुणिं।

सयाजीराव गायकवाडरञ्जेन पुणे विज्जापीठस्मिं ईसा एकूनवीसति द्वादस वस्से (१९१२) पालि भासाय अज्झयनत्थाय विज्जात्थिवग्गस्मिं आरम्भं कारेसि। तेन समयेन पठमे फग्गुसन महाविज्जालयस्मिं पालि भासाय अज्झयनं आरम्भं कारेसि। अयं विज्जागहणं विज्जात्थिवग्गस्मिं पच्चेकमासे पञ्चदस च दस च रूप्पकानि सिस्सवुत्तिं आरम्भिं। अयं सिस्सवुत्तिं तेन छट्ठ वस्से अदासि।

सयाजीराव गायकवाड रञ्ञो अमेरिकारट्ठस्मिं दुतियो जागतिकं सब्बधम्मं परिसदे पमुक्खो अहोसि। तेन अट्ठादस सतं पञ्चसत्तति वस्से (१८७५) सिक्खा सन्था ठापितं अकरि। सयाजीराव गायकवाडरञ्ञो छट्ठ दिवसे फरवरी मासे एकूनवीसतिसतं एकूनचत्ताळीसति (६ फेब्रुवारी १९३९) कालङ्कतो ।

सच्चेन अयं रञ्ञो 'लोकहितदक्खरञ्ञो' अहोसि।

**(स्वरचित)**

संदर्भ -१) लोकपाल सयाजीराव गायकवाड -
बाबा भांड, साकेत प्रकाशन औरंगाबाद.
२) विविध दैनिक वृत्तपत्रे.



**बडोदा संस्थानचे राजे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सुरू केलेले फिरते वाचनालय**

(बडोदा सण्ठानस्स महाराजा सयाजीरावगायकवाडेन आरम्भितं चलितपोट्ठकालयं)

## शब्दार्थ

सण्ठानस्स (सा.ना.) – संस्थानाचे
कल्याणत्थय (क्रि.) – कल्याणाकरिता
कसिकम्मं (ना.) – शेतीकाम
वस्से (सा. नाम.) – साली, वर्षी
अधिक्कतो (क्रि). – अधिकृत करणे
चतुसुट्ठि (स.वि.) – ६४
पापुणि (क्रि.) – प्राप्त केले
पजाहितदक्ख (क्रि.) – प्रजेचे हित बाळगणारा
पाथमिक (सा.ना.) – प्राथमिक
मिस्स (सा. ना.) – मिश्र
पामुखो (सा. ना.) – प्रमुख
रुप्पकानि (सा. ना.) – रूपये
अत्तज (सा.ना.) – मुलगा
विनामूल्य (न.) – मोफत

अहोसि (क्रि.) – होते
कारेसि (क्रि.) – केले
कालङ्कतो (क्रि.) – मृत्यू पावले
तनयो (सा.ना.) – मुलगा
अज्झयन – अध्ययन, अभ्यास
सिक्खा सा.ना.) – शिक्षण
दक्ख (सा. ना.) – दक्ष
विनट्ठकरणत्थाय (क्रि.) – नष्ट करण्याकरिता
सिस्सवुत्ति (सा.ना.) – शिष्यवृत्ती
ट्ठापित (क्रि.) – स्थापन करणे
परिसदे (सा. ना.) – परिषदे मध्ये
अत्तजा (सा.ना.) – मुलगी
जच्च (क्रि.) – जन्म
चलवाचनालय (ना.) – फिरते वाचनालय

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) महाराजा सयाजीराव गायकवाड हे कोणत्या संस्थानचे राजे होऊन गेले.

२) सयाजीराव गायकवाड यांचा राज्यारोहण समारंभ कोणत्या रोजी झाला?

३) सयाजीराव गायकवाड यांना 'प्रजाहितदक्ष राजा' म्हणून का ओळखले जात असे?

४) सयाजीराव गायकवाड यांनी कोणत्या विद्यापीठामध्ये पालि भाषेच्या अध्ययनाची सुरुवात केली?

**२. सत्य / असत्य ओळखा.**

१) सयाजीरावो गायकवाडस्स पितु नाम कासिरावो होति।

२) अयं रञ्ञो सण्ठानस्मिं सिक्खा पसारेन सयाजीराव गायकवाडो बहुकम्मकारि अहोसि।

३) सयाजीराव गायकवाडो अमेरिकारट्ठस्मिं दुतियं जागतिक सब्बधम्म परिसदे पामुखो अहोसि।

**३. योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) अतीते भारतवस्से बहुनि ...... अहोसि। (रञ्ञो/सेट्ठि)

२) सयाजीराव गायकवाडस्स पितु नाम ..... अत्थि। (कासिरावो/गोविंदरावो)

३) कासिराव गायकवाडस्स तनया ............. अत्थि। (गोपाळरावो/ासोको)

४) तेसं '......................' यं उपाधिपत्त रञ्ञो अहोसि। (पजाहित दक्ख/पगाहितो)

५) सयाजीराव गायकवाडेन.................... महाविज्जालयस्मिं पालि भासायं अज्झयनं आरम्भो कारेसि। (फग्गुसन/मिलिन्द)

**४. रूपे ओळखा.**

अहोसि

अगण्हि

करोसि

अकरि

सयाजीरावो

**५. माध्यम भाषेत अर्थ लिहा.**

परिनिब्बुतो

सिक्खा

अज्झयन

पजाहितरक्ख

हितरक्खणाय

महारट्ठं

पमुखो

**६. दीर्घोत्तरी प्रश्न**

१) सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र व कार्य स्पष्ट करा.

२) सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक धोरण स्पष्ट करा.

☆☆☆

## पज्जो विभागो

# १. पुराभेदसुत्तं

**प्रस्तावना**

तिपिटक साहित्यामध्ये सुत्तनिपात या ग्रंथाचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, व्यापारविषयक माहितीच्या दृष्टीने या ग्रंथाचे फार महत्व आहे. या ग्रंथातूनच 'पुराभेद सुत्त' ही कविता अभ्यासाला घेतलेली आहे.

एकदा एका देवतेने तथागताला प्रश्न विचारला, की 'हे गौतम! कोणत्या प्रकारच्या ज्ञानी पुरुषाला आणि कोणत्या प्रकारच्या शीलवान पुरुषाला शांत पुरुष म्हटल्या जाते?' त्या उत्तम पुरुषाच्या बाबतीत सांगा. तेव्हा 'तथागत उत्तम पुरूषाच्या बाबतीत सांगतांना म्हणतात, जो व्यक्ती तृष्णारहित झालेला आहे.' जो विवेकी आहे, राग, ढोंग, कंजुसी, चुगलखोरी पासून अलिप्त आहे.' उत्पत्ती आणि विनाशा (अनित्यतेचा सिद्धांत) प्रति तृष्णारहित झालेला आहे, अशा व्यक्तीला शांत पुरूष म्हणतात.

भारतासह संपूर्ण जगात सुखशांती, समृद्धी व संयमाची गरज असल्यामुळे प्रत्येक राष्ट्रात शांत व संयमी पुरुष असणे काळाजी गरज आहे. (आदर्श नागरिक, कर्तव्य व त्याची जबाबदारी)



कथंदस्सी कथंसीलो, उपसन्तो' ति वुच्चति।
तं मे गोतम पब्रूहि (पब्रूहि), पुच्छितो उत्तमं नरं।।१।।

वीततण्हो पुराभेदा (ति भगवा), पुब्बमन्तं अनिस्सितो।
वेमज्झे नूपसङ्खेय्यो, तस्स नत्थि पुरक्खतं ।।२।।

अक्कोधनो असन्तासी, अविकत्थि अकुक्कुचो ।
मन्तभाणी अनुध्दतो, स वे वाचायतो मुनि ।।३।।

निरासत्ति अनागते, अतीतं नानुसोचति।
विवेकदस्सी फस्सेसु, दिट्ठिसु च न नियति ।।४।।

पतिलिनो अकुहको, अपिहालु अमच्छरी ।
अप्पगब्भो अजेगुच्छो, पेसुणेय्ये च नो युतो।।५।।

सातियेसु अनस्सावी, अतिमाने च नो युतो।
सण्हो च पटिभानवा, न सद्धो न विरज्जति ।।६।।

लाभकम्या न सिक्खति, अलभो च न कुप्पति।
अविरुद्धो च तण्हायं, रसेसु नानुगिज्झति ।।७।।

उपेक्खको सदा सतो, न लोके सञ्ञते समं।
न विसेसी न नीचेय्यो, तस्स नो सन्ति उस्सदा ।।८।।

यस्स निस्सयना नत्थि, ञत्वा धम्मं अनिस्सितो ।
भवाय विभवाय वा, तण्हा यस्स न विज्जति ।।९।।

तं बूमि (ब्रूमि) उपसन्तो ति, कामेसु अनपेक्खिनं ।
गन्था तस्स न विजन्ति, अंतरी सो विसन्तिकं ।।१०।।

**(सुत्तनिपात)**

## शब्दार्थ

**कथंदस्सी (वि.) –** कशाप्रकारचे ज्ञान (कोणत्या प्रकारचे ज्ञान)
**वुच्चति (क्रि.)–** म्हणतात, म्हणतो
**पुच्छितो (क्रि.)–** विचारतो
**अक्कोधनो (वि.)–** क्रोधरहित
**विवेकदस्सि (वि.)–** विवेकी, विवेकदर्शी
**अतिमान (पु.)–** अभिमान
**न सिक्खति (क्रि.)–** अभ्यास करत नाही, शिकत नाही.
**कथंसीलो(वि.)–**कोणत्या प्रकारचे शील असलेला
**उपसंन्तो (क्रि.)–** शांत, परमशांत, अशांत
**वितत‍ण्हो (वि.)–** तृष्णारहित
**नानुसोचति (क्रि.)–** पश्चात्ताप करत नाही
**अजेगुच्छो (वि.)–** घृणारहित
**पटिभावना(पु.) –** प्रतिभावान
**अलाभे (पु.)–** अलाभ होणे

**नानुगिज्झति (क्रि.)–** लिप्त होत नाही
**सतो (वि.)–** स्मृतीमान, सतत जागृत राहणारा
**विभवाय (नपुं.)–** विनाश, नष्ट होणे
**अनपेक्खिनं (वि.)–** उपेक्षावान
**अंतरी (वि.)–** पार करणारा
**उपेक्खको (वि.)–** उपेक्षा करणारा
**भवाय (क्रि.)–** होणे (उत्पन्न होणे)
**कामेसु (क्रि.)–** विषयी, विषयाप्रति
**विज्जन्ति (व.क्रि.)–** विद्यमान आहे
**विसन्तिक (स्त्री.)–** तृष्णा

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) देवतेने तथागतांना कोणता प्रश्न विचारला?
२) कोणत्या पुरुषाला कुठेही आसक्ती राहात नाही?
३) तथागताने कोणत्या पुरूषाला मुनि म्हटलेले आहे?
४) कोणती व्यक्ती मिथ्या दृष्टीच्या फेऱ्यात पडत नाही?

**२. सत्य/ असत्य लिहा.**

१) अप्पगब्भो अजेगुच्छो, पेसुणेय्य च नो युतो।
२) लाभकम्या सिक्खति, अलाभे च न कुप्पति।
३) भवाय विभवाय वा, तण्हा यस्स न विज्जति।

**३. सूचनेनुसार कृती करा.**

१) न सद्धो न विरज्जति। (काळ ओळखा)
२) यस्स निस्सयता..........ञत्वा धम्मं अनिस्सितो (वाक्य पूर्ण करा.)
३) अनच्छरि (माध्यम भाषेत अर्थ लिहा.)
४) लभ (पूर्वकालवाचक अव्यय बनवा)
५) न + अत्थि (संधी करा)
६) उताऱ्यातील संवाद कोणामध्ये आहे?

☆☆☆


# २. सुमनसुत्तं

**प्रस्तावना**

सुमन नावाच्या राजकुमारीने तथागतांना एक प्रश्न विचारला, की जर दोन्ही व्यक्तीची श्रद्धा आणि ज्ञान समान असल्यास आणि त्यांतील एक दान करणारी (दायको) आणि दुसरी दान न करणारी (अदायको) असली तर त्यांच्या आयुष्यात (जीवनात) काही वैशिष्ट्य किंवा वेगळेपण दिसून येत असते का?

त्यावर बुद्धाने हे सुत्त सांगून असे स्पष्ट केलेले आहे की, दायकाकडे (दान देणाऱ्या), अदायका (दान न देणाऱ्या) पेक्षा पाच विशिष्ट गुण दिसून येतात आणि ते पाच गुण म्हणजे आयु, वण्ण (वर्ण), सुख, यश आणि ऐश्वर्य (भोग) असे सांगतात.

थोडक्यात या गाथांमध्ये दान देण्याचे महत्त्व (लोकसहाय्य) सांगितले आहे.



''यथापि चन्दो विमलो, गच्छं आकासधातुया।

सब्बे तारांगणे लोके, आभाय अतिरोचति।।

''तथेव सीलसम्पन्नो, सद्धो पुरिसपुग्गलो।

सब्बे मच्छरिनो लोके, चागेन अतिरोचति।।

''यथा पि मेघो थनयं, विज्जुमाली सतक्ककु।


थलं निन्नंच पूरेति, अभिवस्सं वसुन्धरं।।

''एवं दस्सनसम्पन्नो, सम्मासम्बुद्धसावको।

मच्छरिं अधिगण्हाति, पञ्चठानेहि पण्डितो ।।

''आयुना यससा चेव, वण्णेन च सुखेन च।

स वे भोगपरिब्यूळ्हो, पेच्च सग्गे पमोदती'' ति।।



**(अङ्गुत्तरनिकायो–सुमनवग्गे)**

## शब्दार्थ

**विमलो – (वि.)** निर्मळ, स्वच्छ

**अतिरोचति – (क्रि.)** अधिक तेजस्वी होतो

अधिक तेजाने झळकतो, अधिक चमकतो

**सतक्कु – (वि.)** शंभर टोकांच्या

**थलं निन्नञ्च – (नपुं.)** जमीन, उंचसखल भाग

**मच्छरिं – (ना.)** कंजूष माणूस

**आयुना – (तृ. वि)** आयुष्य

**भोग – (तृ. वि.)** ऐश्वर्य

**पमोदती – (क्रि.)** आनंदीत होतो, फार प्रसन्न होतो

**तारांगणे – (पु.)** तारांगण

**थनयं – (ना.)** – गडगडाट

**विज्जुमाली – (स्त्रि.)** वीज

**अभिवस्सं – (ना.)** वर्षा पाऊस

**अधिगण्हाति – (क्रि.)** पार करतो

**यससा – (तृ. वि.)** यश, यशस्वी

**परिब्युळ्हो –** वाढणे

---

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) चंद्र कसा असतो?

२) चंद्र कुठून जातो?

३) चंद्राचे चांदणे तारकांना काय करते?

४) कंजूष माणसाला कशाने झाकाळून टाकता येते?

५) पाऊस काय करतो?

६) सम्मासम्बुद्धाचे सावक कसे असतात?

७) हुशार व्यक्ती कंजूष माणसापेक्षा कोणत्या गुणानी युक्त असतो?

८) कवितेत कशाच्या उपमा दिल्या आहेत?

९) ‘दान’ या शब्दासाठी कुठला शब्द वापरला आहे?

**२. सत्य / असत्य लिहा.**

१) यथापि चन्दो मलो । गच्छं आकासधातुया।

२) सब्बे तारांगणे लोके, आभाय अतिरोचेति।

३) यथापि मेघो वस्सं, विज्जुमाली सतक्कु।

४) मच्छरिं अधिगण्हाति, छठानेहि पण्डितो ।

५) आयुना यससा चेव, वण्णेन च सुखेन च ।

३. **सूचनेनुसार कृती करा**

१) पमोदति - (काळ ओळखा)
२) अधिगण्हाति - (विग्रह करा)
३) पुरेति - (काळ ओळखा)
४) अतिरोचेति - (विग्रह करा)

४. **रूपे ओळखा.**

१) रोचेति,
२) पुरेति
३) पमोदति
४) गण्हाति

५. **संधी करा/ विग्रह करा.**

१) सम्मासम्बुद्धसावको
२) सीलसम्पन्नो
३) विज्जुमाली
४) पुरिसपुग्गला

६. **वाक्ये पूर्ण करा.**


१) सब्बे तारांगणे........., ............।।
२) ................., सद्धो पुरिसपुग्गलो ।
३) यथापि............ थनयं, .......... सतक्ककु।
४) एवं.........., .........सावको।
५) आयुना........चेव,................।
६) मच्छरिं.........., ......... पण्डितो।।

७. **माध्यम भाषेत अर्थ लिहा.**


१) विमलो
२) मेघो
३) विज्जुमाली
४) मच्छरिं
५) वसुन्धरं

८. **कवितेच्या आधारे रेखाजाळे पूर्ण करा.**

(१)




(२)





☆☆☆

# ३. इन्दियसंवरसील

**प्रस्तावना**

पालि तिपिटकातील अनेक ग्रंथावर विस्तृत पालि भाष्य लिहिणारा भाष्यकार म्हणजे पालि अट्ठकथाकर म्हणून आचार्य बुद्धघोष प्रसिद्ध आहेत. बौद्ध तत्त्वज्ञानाविषयी विसुद्धिमग्ग नावाचा एक उत्कृष्ट स्वतंत्र ग्रंथही त्यांनी लिहिलेला आहे. त्यातूनच प्रस्तुत उतारा घेतला आहे. इंद्रिय संवरसुद्धि अर्थात शारीरिक इंद्रियाचे शुद्धीकरण. जसे मोकळे द्वार असलेले गाव लुटारुंच्या साहाय्याने लुटले जाते, चांगल्या प्रकारे न साकारलेल्या घरात पावसाचे पाणी प्रवेश करते त्याचप्रमाणे असावध मनामध्ये राग, द्वेष, मत्सर इत्यादी वाईट विचार प्रवेश करतात. कुशल विचाराला गती देणे आणि अकुशल विचाराला प्रवेश करू न देणे. जसे पाणी शुद्ध करण्यासाठी तुरटीची गरज असते अगदी त्याप्रमाणे इंद्रियांच्या शुद्धीकरणासाठी लोककल्याणाला प्रोत्साहित करणारी समाजव्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. याविषयीचे वर्णन प्रस्तुत कवितेत आलेले आहे.

रूपेसु सद्देसु अथो रसेसु, गन्धेसु फस्सेसु च रक्ख इन्दियं ।
एते हि द्वारा विवटा अरक्खिता, हनन्ति गामं व परस्स हारिनो ।।१।।



यथा अगारं दुच्छिन्नं, वुट्ठि समतिविज्झति ।
एवं अभावितं चित्तं, रागो समतिविज्झति।।२।।

रुपेसु सद्देसु अथो रसेसु, गन्धेसु फस्सेसु च रक्ख इन्दियं ।
एतेहि द्वारा पिहिता सुसंवुता, न हनन्ति गामंव परस्स हारिनो ।।३।।



यथा अगारं सुच्छिन्नं, वुट्ठि न समतिविज्झति ।
एवं सुभावितं चित्तं, रागो न समतिविज्झति ।।४।।

कामरागेन डय्हामि, चित्तं मे परिडय्हति।
साधु निब्बाणं ब्रूहि, अनुकम्पाय गोतमा ति ।।५।।

सञ्ञाय विपरियेसा, चित्तं ते परिडय्हति ।
निमितं परिवज्जेहि, सुभं रागपसय्हितं।
असुभाय चित्तं भावेहि, एकग्गं सुसमाहितं ।।६।।

संखारे परतो पस्स, दुक्खतो नो च अत्ततो ।
निब्बापेहि महारागं, मा डय्हित्थो पुनप्पुनन्ति ।।७।।

मक्कटोव अरञ्ञम्हि, वने भन्तमिगो विय।
बालो विय च उत्तस्तो, न भवे लोललोचनो ।।८।।

अधो खिपेय्य चक्खुनि, युगमत्तदसो सिया ।
वनमक्कटलोलस्स, न चित्तस्स वसं वजे ।।९।।

कुलपुत्तमानि अञ्ञोपि, पब्बजित्वान सासने।
मिच्चथेरो व तिट्ठेय्य, वरे इन्दिय सवरे ।।१०।।

(विसुध्दिमग्गो)

## शब्दार्थ

**इन्दियं (नपु.)–** इंद्रिय, अवयव (डोळा, कान, नाक, जीभ, त्वचा)
**अरक्खिता (वि.)–** असुरक्षित
**विवटा (कृ.)–** आवरणरहित, उघडा
**अरञ्ञम्हि (पु.)–** अरण्यात, वनामध्ये
**कामरागेन (पु.)–** कामरागाद्वारे
**पिहित (कृ.)–** झाकलेला
**खिप्प (वि.)–** लवकर, ताबडतोब, शीघ्र
**चित्तस्स (नपु.)–** मनाचे
**वुट्ठि – (स्त्री.)** वर्षा, पाऊस
**अगारं – (नपु.)** घर, निवासस्थान
**उय्हामि (क्रि.)–** मी जाळतो
**अनुकम्पाय –** अनुकंपा करण्यासाठी (आज्ञार्थी)
**कुलपुत्तं (पु.)–** कुलपुत्राला
**चक्खु (नपु.)–** डोळा
**निमित्तं (क्रि.)–** निमित्त, कारण

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) घराला दरवाजा नसल्यास काय होते ?
२) घर योग्य प्रकारे लावलेले नसल्यास काय होते ?
३) मनामध्ये राग केव्हा प्रवेश करत नाही ?
४) जिभेचे कार्य कोणते ?
५) मन कशाने जळते ?
६) संस्कारांना कशाप्रकारे समजावे ?
७) व्यक्तीने पुन्हा पुन्हा कशाला प्राप्त करू नये ?
८) बुद्धसासनामध्ये कोणी प्रव्रजींत व्हावे ?

**२. सत्य / असत्य लिहा.**

१) एवं अभावितं चित्तं समतिविज्झति।
२) रूपेसु, सद्देसु अथो रसेसु गन्धेसु फस्सेसु च रक्ख इन्दिय।

३) यथा अगारं सुच्छन्नं वुट्ठि समतिविज्झति।

४) सञ्ञाय विपरियेससा, चित्तं ते परिडय्हति ।

५) वनमक्कटलोलस्स चित्तस्स वसं वजे।

६) मिच्चथेरो व तिठ्ठेय्य वरे इन्दिय सवरे ।

## ३. सूचनेनुसार कृती करा

**१) रूपे ओळखा.**

हनन्ति उय्हामि

पुनप्पुनन्ति पब्बजित्वान

**२) संधी सोडवा.**

पर + अस्स अन + उकम्पाय

चित्त + अस्स

**३) माध्यम भाषेत अर्थ लिहा.**

फस्स मक्कटो

एकग्गं बालो


## ४. वाक्ये पूर्ण करा.

१) कामरागेन उय्हामि, ...........मे परिडय्हति।

२) निमितं परिवज्जेहि, .......... रागपसय्हितं ।

३) कुलपुत्तमानि .........., पब्बजित्वान सासने।

## ५. जाळरेखाचित्र पूर्ण करा.





☆☆☆

# ४. मङ्गलसुत्तं

**प्रस्तावना**

'मङ्गलसुत्तं' हा पद्यपाठ सुत्तपिटकाच्या खुद्दक निकायातील 'खुद्दकपाठ' या पालि ग्रंथातून घेतला आहे. खुद्दकपाठ हा ग्रंथ खुद्दकनिकायामध्ये पहिल्या क्रमांकाचा आहे. या ग्रंथाला सामाजिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचे मानले जाते. 'मङ्गलसुत्तं' यामध्ये जीवन कौशल्यावर आधारित गाथा संग्रहित केलेल्या आहेत. विद्यार्थी हा देशाचा एक आदर्श नागरिक व्हावा आणि त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी हा पद्यपाठ महत्त्वाचा आहे. एकदा तथागत बुद्ध श्रावस्तीमध्ये अनाथपिण्डिकाच्या जेतवन आरामामध्ये विहार करत होते. त्या वेळी अखिल मानवाच्या सुखासाठी आपल्या आयुष्यात उत्तम मंगल काय आहे? मंगल म्हणजे काय? उत्तम मंगल कशात आहे? यावर तथागत बुद्धाने धम्मोपदेश दिलेला आहे.



बहु देवा मनुस्सा च, मङ्गलानि अचिन्तयुं ।
आकंखमाना सोत्थानं, ब्रूहि (बूहि) मङ्गलं उत्तमं ।।१।।

असेवना च बालानं, पण्डितानं च सेवना।
पूजा च पूजनेय्यानं, एतं मङ्गलं उत्तमं ।।२।।

पतिरूपदेसवासो च, पुब्बे च कतपुञ्ञता ।
अत्तसम्मापणिधि च,  एतं मङ्गलं उत्तमं ।।३।।

बाहुसच्चं च सिप्पं च विनयो च सुसिक्खितो ।
सुभासिता च या वाचा, एतं मङ्गलं उत्तमं ।।४।।

मातापितु उपट्ठानं, पुत्तदारस्स सङ्गहो ।
अनाकुला च कम्मन्ता, एतं मङ्गलं उत्तमं ।।५।।

दानं च धम्मचरिया च, ञातकानं च सङ्गहो ।
अनवज्जानि कम्मानि, एतं मङ्गलं उत्तमं ।।६।।

आरती विरती पापा, मज्जपाना च संयमो ।
अप्पमादो च धम्मेसु, एतं मङ्गलं उत्तमं ।।७।।

गारवो च निवातो च, सन्तुट्ठि च कतञ्ञुता ।
कालेन धम्मसवनं, एतं मङ्गलं उत्तमं।।८।।

खन्ती च सोवचस्सता, समणानञ्च दस्सनं।
कालेन धम्मसाकच्छा, एतं मङ्गलं उत्तमं।।९।।

तपो च ब्रह्मचरियञ्च, अरियसच्चान दस्सनं।
निब्बानसच्छिकिरिया च, एतं मङ्गलं उत्तमं।।१०।।

फुट्ठस्स लोकधम्मेहि, चित्तं यस्स न कम्पति।
असोकं विरजं खेमं, एतं मङ्गलं उत्तमं।।११।।

एतादिसानि कत्वान, सब्बत्थंअपराजिता ।
सब्बत्थ सोत्थिं गच्छन्ति, तं तेसं मङ्गलं उत्तमं' ति।।१२।।

**(खुद्दकपाठ)**

## शब्दार्थ

**बहु (वि.)** – अनेक

**अचिन्तयु (क्रि.)** – विचार केला

**सोत्थानं (स्त्री.)**– सुखकारक

**पण्डितं (वि.)**– बुद्धिमान

**एतं (सर्व.)**– हेच

**कतपुञ्ञता** – शुभ, चांगल्या कृत्यांचा संग्रह

**पुब्बे (पु.)**– पूर्वी, सुरुवातीपासून

**सिल्प** – शिल्प, व्यवसाय

**सुसिक्खितं (कृदन्त)** – पूर्णपणे सुशिक्षित असणे

**उपट्ठान (नपुं.)** – सेवा सुश्रूषा

**सङ्गह** – सांभाळ, आदर सत्कार, संग्रह

**ञातक (पुं.)** – नातेसंबंधी

**आरति(स्त्री.)** – निवृत्ती

**पाप (नपुं.)** – वाईट कृत्य

**संयम (नपुं.)** – संयम

**निवात (पु.)** – नम्रता

**कतञ्ञुता (स्त्री.)** – कृतज्ञता

**खन्ति** – सहनशीलता

**दस्सन (नपुं.)** – दर्शन, भेट

**धम्मसाकच्छा (स्त्री.)** – धार्मिक चर्चा

**ब्रह्मचरिय (स्त्री. )** – श्रेष्ठ प्रतीचे जीवन, विशुद्धचर्या

**निब्बाण (नपुं.)** – निर्वाण

**सच्छिकिरिया (स्त्री.)** – प्रत्यक्षात आणणे, सात्क्षाकार करणे

**कम्पति (क्रि.)** – कापणे

**विरज (वि.)** – निर्मळ, शुद्ध

**कत्वान** – करून

**सोत्थि (स्त्री.)** – सुख, कल्याण

**मङ्गल (वि.)** – उत्तम

**आकंखमाना (स्त्री.)**– इच्छिणारे

**असेवना (स्त्री.)** – संगती करू नये

**सेवना (स्त्री.)** – सोबत, संगती

**पतिरुपदेसवासो** – अनुकल प्रदेशात वास्तव्य

**अत्तसम्मापणिधि** – सन्मार्गात गुंन्वणे

**बाहुसच्च (नपुं.)** – अनेक प्रकारे सत्याने वागावे

**विनय (वि)** – विनयशील

**सुभासित** – मधुर वाचा

**पुत्तदारा** – पुत्र व पत्नी

**अनाकुल (वि.)** – संदेहरहित

**अनवज्ज** – प्रशस्त, स्तुत्य

**विरति (स्त्री.)** – संपूर्ण निवृत्ती

**मज्जपान (नपुं.)** – मद्यपान

**गारव (पु.)** – गौरव

**सन्तुट्ठि (स्त्री.)** – संतोष, समाधान

**काल (पु.)** – वेळ

**सोवचस्सता (स्त्री )** – विनम्रता

**धम्मसवणं (नपुं.)** – धम्माचे श्रवण

**तप (पु.)** – तपश्चर्या

**अरियसच्च (नपुं.)** – आर्यसत्य सर्वोत्तम सत्य

**फुट्ठ (कृदन्त)** – स्पर्श करणे

**लोकधम्म** – लोकस्वभाव

**असोक (वि.)** – शोकरहित

**खेमं (वि.)** – शांती, क्षेम, सहनशीलता

**न पराजिता** – पराभव न पावता

## स्वाध्याय

### १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) मंगल म्हणजे काय?

२) उत्तम मंगल कोणते आहे?

३) तथागत बुद्धाने मङ्गलसुत्त कोणत्या विहारात सांगितले आहे?

४) मंगलाची अपेक्षा करण्यासाठी काय करावे लागते?

५) आर्यसत्ये किती आहेत?

६) निब्बाण म्हणजे काय?

७) नम्रता असण्यासाठी कोणत्या गुणाची आवश्यकता आहे?

### २. सत्य/ असत्य लिहा.

१) बहु देवा मनुस्साच मङ्गलानि चिन्तयुं ।

२) पमादो च धम्मेसु, एतं मङ्गलं उत्तमं ।

३) कालेन धम्मसवनं न करोति, एतं मङ्गलं उत्तमं ।

४) अकालेन धम्मसाकच्छा, एतं मङ्गलं उत्तमं।

५) दानं च धम्मचरिया च, ञातकानं च सङ्गहो ।

६) सब्बत्थ सोत्थिं गच्छन्ति, तं तेसं मङ्गलं उत्तमं ।

७) सोकं विरजं खेमं, एतं मङ्गल उत्तमं ।

### ३. रिकाम्या जागा भरा.

१) बहू देवा मनुस्सा च, ........अचिन्तयुं ।

२) माता ............ उपट्ठानं, पुत्तदारस्स सङ्गहो ।

३) कालेन .................,एतं मङ्गलं उत्तमं ।

४) तपो च ब्रह्मचरियं च,....दस्सनं।

५) आरती विरती पापा, ...........च संयमो ।

६) अत्तसम्मापणिधि च, एतं.....।

७) .........सच्छिकिरिया च, एतं मङ्गलं उत्तमं ।

### ४. संधी करा.

१) मङ्गलं + उत्तम


२) लोकधम्म + एहि

३) सब्बत्थं+ अपराजिता

४) गच्छ + अन्ति

५) धम्म + एसु

## ५. जाळरेखाचित्र पूर्ण करा.




## ६. रूपे ओळखा –

१) कम्पति

२) कालेन

३) लोकधम्मेहि

४) फुट्ठस्स

५) कत्वान

६) गच्छन्ति

## ७. विरुद्धार्थी शब्द लिहा –

१) माता

२) पुत्तो

३) बाला

४) पापो

५) मङ्गल

☆☆☆

# ५. अङ्गुलिमाल भिक्खू

**प्रस्तावना**

ही तथागताच्या जीवन काळामध्ये घडलेली ऐतिहासिक घटना आहे. आजही समाजाच्या शांततेसाठी आणि सुव्यवस्थेसाठी, समाजातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी होण्यासाठी हा आदर्श आवश्यक आहे. शस्त्राने किंवा दंडाने गुन्हेगार गुन्हे करण्यापासून परावृत्त होऊ शकत नाही. त्यासाठी गुन्हेगाराचे मन परिवर्तन होणे आवश्यक आहे. तथागत बुद्ध आणि अङ्गुलिमाल यांची भेट या दृष्टीने महत्वाची आहे. बुद्धाच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे मनुष्य जन्माने गुन्हेगार नसतो, वाईट स्वभावाचा नसतो.

भारत सरकारने सुद्धा गुन्हेगारांना अमानुष शिक्षा देण्याच्या पद्धतीत फरक केला आहे. महाराष्ट्र सरकारने 'खुले कारागृह' गुन्हेगारामध्ये सुधारणा करण्यासाठी ही योजना अमलात आणली. बालगुन्हेगारांना सुधारण्यासाठी सरकारने 'सुधारणा शाळा' सुरू केल्या आहेत. त्यामुळे गुन्हेगार नेहमीच गुन्हेगार राहू शकत नाही. जर त्याच्या मनात (वर्तनात) बदल घडून आला तर तो एक आदर्श नागरिकही होऊ शकतो.

कायद्याने सुद्धा सुधारणा होत असते असे नाही. कायदा कमी पडल्यास धम्मानेच काम करावे लागते. अहिंसक नावाचा मेधावी शिष्य केवळ सहपाठी वर्गबंधूच्या आणि गुरूच्या चुकीच्या निर्णयामुळे किती भयंकर अपराधी बनतो, तसेच तथागत बुद्धाच्या प्रभावाने अङ्गुलिमालाच्या जीवनात आमूलाग्र बदल होऊन तो महान अर्हंत भिक्खू कसा होतो या विषयाचे आपले मनोगत तो अङ्गुलिमाल या कवितेत व्यक्त करतो.

म्हणून शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्यासाठी, आतंकवाद नष्ट करण्यासाठी बुद्ध उपदेश देतात.

''गच्छं वदेसि समण ठितोम्हि, ममं च ब्रूसि ठितमट्ठितो' ति।
पुच्छामि तं समणं एतमत्थं, कथं ठितो त्व अहमट्ठितोम्हि'' ।।१।।



‘‘ठितो अहं अङ्गुलिमाल सब्बदा, सब्बसु भूतेसु निधाय दण्डं।
तुवं च पाणेसु असञ्ञतोसि, तस्मा ठितोहं तुवमट्ठितो’सि ।।२।।

‘‘चिरस्सं वत मे महितो महेसि, महावनं समणो पच्चुपादि।
सो’हं चजिस्सामि सहस्सपापं, सुत्वान गाथं तव धम्मयुत्तं ।।३।।

इच्चेव चोरो असिमावुधं च, सोब्भे पपाते नरके अन्वकासि ।
अवन्दि चोरो सुगतस्स पादे, तत्थेव पब्बज्जमयाचि बुद्धं ।।४।।



बुद्धो च खो कारूणिको महेसि, सो सत्था लोकस्स सदेवकस्स ।
तं ‘एहि भिक्खू’ ति तदा अवोच, एसेव तस्स अहु भिक्खुभावो ।।५।।

‘‘यो च पुब्बे पमज्जित्वा, पच्छा सो नप्पमज्जति।
सोमं लोकं पभासेति, अब्भा मुत्तो’ व चन्दिमा ।।६।।

‘‘यस्स पापं कतं कम्मं, कुसलेन पिधीयति ।
सोमं लोकं पभासेति, अब्भा मत्तो’ व चन्दिमा।।७।।

‘‘उदकं हि नयन्ति नेत्तिका, उसुकारा नमयन्ति तेजनं।
दारू नमयन्ति तच्छका, अत्तानं दमयन्ति पण्डिता ।।८।।

‘‘दण्डेन दमयन्ति, अंकुसेहि कसाहि च ।
अदण्डेन असत्थेन, अहं दन्तोम्हि तादिना ।।९।।

“अहिंसको ति मे नामं, हिंसकस्स पुरे सतो ।
अज्जाहं सच्चनामोम्हि, न नं हिंसामि किञ्चनं ।।१०।।

“लोहितपाणि पुरे आसिं, अङ्गुलिमालो’ ति विस्सुतो ।
सरणगमनं पस्स, भवनेत्ति समूहता ।।११।।

“ब्रह्मजच्चो पुरे आसिं, उदिच्चो उभतो अहु।
सोज्ज पुत्तो सुगतस्स, धम्मराजस्स सत्थुनो ।।१२।।

**(थेरगाथा)**

---

## शब्दार्थ

**गच्छं (पु.)** – जाणे, चालताना
**समण (पु.)** – श्रमण
**आयुध (नपुं.)** – हत्यार, शस्त्र
**अवोच** – म्हणाला
**पभासेति (क्रि.)** – प्रकाशित करतो
**मुत्त (कृ.)** – मुक्त, स्वतंत्र, मोकळा
**तच्छका (पु.)** – सुतार, लाकूडकाम करणारा
**अङ्कुस (पु.)** – अंकुश
**विस्सुत (वि.)** – प्रसिद्ध, विख्यात
**सोब्भ (नपुं.)** – खड्डा, जलाशय, तळे
**भूतेसु (पु. नपुं.)** – प्राण्यामध्ये
**पपाते (पु.)** – वरून पडणारा प्रवाह, अधोगती
**पमज्जित्वा (पू. क्रि.)** – प्रमाद करून, बेपर्वाई करून
**पिधीयति (कृ.)** – झाकतो, झाकले जाते
**नेत्तिका (पु.)** – शेतात पाण्याचा पाट करणारा नेतृत्व करणारा, नेणारा
**दमयन्ति (क्रि.)** – दमन करतात
**लोहितपाणि (वि.)** – रक्ताने हात माखलेला.
**समुहता (पु.)** – मूळासह नष्ट करणे

---

## स्वाध्याय

१. **एका वाक्यात उत्तरे लिहा –**

१) अंगुलिमालाने तथागताला काय विचारले?
२) तथागत कोणत्या अर्थाने थांबलेला आहे?
३) अंगुलिमालाने तथागताकडे कशाची मागणी केली?
४) अंगुलिमाल कशाप्रकारे भिक्खू झाला?
५) पंडित आपले दमन कशाप्रकारे करतो?
६) तथागताने अंगुलिमालाचे दमन कशाप्रकारे केले?
७) पूर्वी अंगुलिमाल कसा प्रसिद्ध होता?

२. **खालील वाक्याचे सत्य / असत्य लिहा –**

१) गच्छं वदेसि समण ठितोम्हि ।

२) ठितो त्वं अंगुलिमाल सब्बदा ।

३) सोमं लोकं पभासेति अब्भा मुत्तो' व सुरियो ।

४) अदण्डेन असत्थेन, अहं दन्तोम्हि तादिना।

५) हिंसको' ति मे नामं, हिंसकस्स पुरेसतो ।

३. **खालील प्रश्नांची सूचनेनुसार कृती करून उत्तरे लिहा.**

१) पुच्छामि तं .......... एतमत्थ । (समण/बाह्मण) यापैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.

२) उदकं हि ........... नेत्तिका । (नेति/नयन्ति) यापैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.

३) अहिंसकोति मे नामं ........ पुरेसतो । (हिंसकस्स/हिंसका) यापैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.

४) पभासेति । (माध्यम भाषेत अर्थ लिहा.)


५) तच्छका । (माध्यम भाषेत अर्थ लिहा.)

६) अज्जाहं (संधी विग्रह करा)

७) सोहं (संधी विग्रह करा)

८) पमज्ज (पूर्वकालवाचक अव्यय बनवा)

४. **जाळरेखाचित्र पूर्ण करा.**




५. **दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) अंगुलिमालाचे जीवन चरित्र लिहा.

२) अंगुलिमाल अहिंसक कसा झाला ते लिहा.

☆☆☆


# ६. सिविराजचरियं

**प्रस्तावना**

प्रस्तुत पद्य पाठ सुत्तपिटकाच्या खुद्दक निकायातील चरिया पिटक या ग्रंथातून घेतला आहे. यामध्ये दान, शील, सहनशीलता, प्रज्ञा, विर्य, शांती, सत्य, अधिष्ठान, मैत्री व उपेक्षा या दहा पारमिताचे वर्णन आहे. पारमिता म्हणजेच पूर्णत्व. पारमिता पूर्ण केल्याशिवाय कोणतीही व्यक्ती बुद्धत्व प्राप्त करू शकत नाही.

या ग्रंथाच्या अध्ययनाने पारमिता पूर्ण करण्याची प्रेरणा मिळते. सांसारिक जीवनापासून मुक्त होण्याची भावना जागृत होते. त्याचप्रमाणे कठीण कार्य करण्याचे, संकटांना तोंड देण्याचे, सुख दुक्खात न डगमगता समभाव ठेवण्याचे धैर्य प्राप्त होते.

समाजात दानशूर लोक अनेक असतात. परंतु अंधत्वाची तमा न बाळगता जाणीवपूर्वक नेत्रदान करणाऱ्या सिविराजाचा संकल्प व दृढनिश्चय या पद्यात सांगितलेला आहे.



अरिट्ठसव्हये नगरे, सिविनामासि खत्तियो ।
निसज्ज पासादवरे, एवं चिन्तेस'हं तदा ।।१।।

यं किञ्चि मानुसं दानं, अदिन्नं मे न विज्जति।
यो पि याचेय्य मं चक्खुं, ददेय्य अविकम्पितो ।।२।।

मम सङ्कप्पमञ्ञाय, सक्को देवानमिस्सरो ।
निसिन्नो देवपरिसाय, इदं वचनमब्रवि ।।३।।

निसज्ज पासादवरे, सिविराजा महिद्धिको ।
चिन्तेन्तो विविधं दानं, अदेय्यं सो न पस्सति ।।४।।

पवेधमानो पलित सिरो, वलिगत्तो जरातुरो ।
अन्धवण्णो व हुत्वान, राजानं उपसङ्कमि ।।५।।

याचामि तं महाराज, धम्मिकं रट्ठवड्ढनं।
तव दानरता, कित्ति उग्गता देवमानुसे ।।६।।

उभो पि नेत्ता नयना, अन्धा उपहता मम ।
एकं मे नयनं देहि त्वं' पि एकेन यापथ ।।७।।

इदानाहं चिन्तयित्वा, न पासादतो इधागतो ।
त्वं मम चित्तमञ्ञाय, नेत्तं याचितुं आगतो ।।८।।

अहो मे मानसं सिद्धं, सङ्कप्पो परिपूरतो ।
अदिन्नपुब्बं दानवरं, अज्ज दस्सामि याचके ।।९।।

एहि सीवक उट्ठेहि, मा दन्धहि मा पवेधयि।
उभो पि नयनं देहि, उप्पाटेत्वा वणिब्बके ।।१०।।

ददमानस्स देन्तस्स, दिन्नदानस्स मे सतो ।
चित्तस्स अञ्ञथा नत्थि, बोधियायेव कारणा।।११।।

न मे देस्सा उभो चक्खू, अत्ता न मे न देस्सियो।
सब्बञ्ञुतं पियं मय्हं, तस्मा चक्खुं अदासहं' ति ।।१२।।

**(चरियापिटक)**

---

## शब्दार्थ

**सव्हय (ना.)** – नाव
**अञ्ञाय (अ.)** – जाणून
**मा (ना.)** – नको
**वणिब्बके** – याचकामध्ये
**सब्बञ्ञुता (स्त्री.)**– सर्वज्ञता
**चक्खू (नपु.)** – डोळे
**अन्धवण्ण (पु.)** – आंधळा
**अविकंपित (वि.)** – न थरथरता, न घाबरता
**पवेधमान (वि.)** – कंप पावणारा
**दन्ध (क्रि.)** – घाबरणे
**बोधि** – उत्कृष्ट ज्ञान
**उप्पाटेत्वा (क्रि. पू. अ.)** – काढून, उपटून
**कतंजलि (वि.)** – हात जोडणे
**रट्ठवड्ढनं (वि.)**– राष्ट्रवर्धन

## स्वाध्याय

### १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सिवीराजाच्या नगराचे नाव काय होते?

२) सिविराजाने दानासंबंधी कोणता विचार केला?

३) शुक्राने सिविराजाला कशाचे दान मागितले?

४) सिविराजाने शिवकाला काय सांगितले?

५) दान देत असताना सिवीराजाच्या मनात कोणता विचार उत्पन्न झाला?

६) सिविराजाने पूर्वी न दिलेल्या दानापैकी कोणते दान दिले?

### २. खालील वाक्यांचे सत्य / असत्य लिहा.

१) यं किञ्चि मानुसं दानं दिन्नं मे न विज्जति ।

२) अन्धवण्णो व हुत्वान राजानं उपसङ्कमि ।

३) द्वे मे नयनं देहि त्वम्पि एकेन यापथ।

४) अदिन्नपुब्बं दानवरं अज्ज दस्सामि याचके ।

५) न म देस्सा उभो चक्खू अत्ता न मे न देस्सियो ।

### ३. खालील प्रश्नांची सूचनेनुसार कृती करून उत्तरे लिहा.

१) यो पि याचेय्य मं .........ददेय्यं अविकम्पितो। (चक्खुं/नेत्त) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा

२) एक मे .......... देहि त्वं पि एकेन यापथ । (नयनं/चक्खू) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा

३) पवेधमान (माध्यम भाषेत अर्थ लिहा)

४) वणिब्बके (माध्यम भाषेत अर्थ लिहा)

५) उभोपि (संधी विग्रह करा)

६) इदानाहं (संधी विग्रह करा)

### ४. संधी करा –


१) सो + अपि

२) इदानि + अहं

३) चिन्तेसि + अहं


४) अदासि + अहं

५. **अव्यय लिहा.**





६. **जाळरेखाचित्र पूर्ण करा.**

१)




२)




७. **दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) सिविराजाचे जीवन चरित्र लिहा.

२) सिविराजाने दान पारमिता कशी पूर्ण केली त्याचे वर्णन करा.

☆☆☆

# ७. रोहिणी

**प्रस्तावना**

रोहिणीचा जन्म एका समृद्ध ब्राह्मण कुटुंबात झाला. ती ब्राह्मण धर्म व ब्राह्मण संस्काराने त्रस्त होती. वेद, उपनिषद तसेच इतर ग्रंथाबद्दल तिला कोणतीही आस्था नव्हती. तथागत बुद्धाचा उपदेश ऐकून तिच्या मनात धम्म व भिक्खू संघाप्रति श्रद्धा निर्माण झाली. ती भिक्खू संघाचा अतिशय आदर करत होती.

एके दिवशी ती आपल्या वडिलासोबत चर्चा करत असतांना तिला भिक्खू का प्रिय आहेत हे ती आपल्या वडलांना समजावून सांगते. रोहिणी व तिचे वडील या दोघांचा संवाद या कवितेत विशद केला आहे.

तसेच त्याकाळी सुद्धा लोककल्याणासाठी लोकशाही तत्त्व प्रबळ असून स्त्रियांना देखील अभिव्यक्ती स्वातंत्र्य होते हे यावरून दिसून येते.



'समणा' ति त्व सयसि, समणा' ति पटिबुज्झसि ।
समणानमेव कित्तेसि, समणी नून भविस्ससि ।।१।।

विपुलं अन्नंच पानंच, समणानं पवेच्चसि ।
रोहिणी दानि पुच्छामि, केन ते समणा पिया ।।२।।

अकम्मकामा अलसा, परदत्तूपजीविनो ।
आसंसुका सादुकामा, केन ते समणा पिया ।।३।।

चिरस्सं वत मं तात, समणान परिपुच्छसि ।
तेसं ते कित्तयिस्सामि, पञ्ञासीलपरक्कमं ।।४।।

कम्मकामा अनलसा, कम्मसेट्ठस्स कारका।
रागं दोसं पजहन्ति, तेन मे समणा पिया ।।५।।

कायकम्मं सुचि नेसं, वचीकम्मं च तादिसं।
मनोकम्मं सुचि नेसं, तेन मे समणा पिया ।।६।।

विमला सङ्खमुत्ता व, सुद्धा सन्तरबाहिरा ।
पुण्णा सुक्कानं धम्मानं, तेन मे समणा पिया ।।७।।

बहुस्सुता धम्मधरा, अरिया धम्मजीविनो ।
अत्थं धम्मं च देसेन्ति, तेन मे समणा पिया ।।८।।

दुरङ्गमा सतिमन्तो, मन्तभाणी अनुद्धता ।
दुक्खस्सन्तं पजानन्ति, तेन मे समणा पिया ।।९।।

यम्हा गामा पक्कमन्ति, न विलोकेन्ति किञ्चन।
अनपेक्खा' व गच्छन्ति, तेन मे समणा पिया ।।१०।।

न ते हिरञ्ञं गण्हन्ति, न सुवण्णं न रूपियं ।
पच्चुप्पन्नेन यापेन्ति, तेन मे समणा पिया ।।११।।

नानाकुला पब्बाजिता, नानाजनपदेहि च ।
अञ्ञमञ्ञं पियायन्ति, तेन मे समणा पिया ।।१२।।

अत्थाय वत नो भोति, कुले जातासि रोहिणी ।
सद्धा बुद्धे च धम्मक च, सङ्घे च तिब्बगारवा ।।१३।।

तुवं हेतं पजानासि, पुञ्ञक्खेत्तं अनुत्तरं ।
अहं पि एते समणा, पटिगण्हन्ति दक्खिणं ।।१४।।

उपेहि सरणं बुद्धं, धम्मं सङ्घं च तादिनं ।
समादियाहि सीलानि, तं ते अत्थाय हेही' ति ।।१५।।

**(थेरीगाथा, खुद्दकनिकाय)**

## शब्दार्थ

**कित्त (स्त्री.)**– किर्ती
**पुच्छामि (क्रि.)** – विचारतो
**समणा (नपुं.)**– श्रमण
**आसंसुका (वि.)**– हावरट, लोभी, हावरा
**सुचि (वि.)**– शुद्ध, पवित्र
**अत्थं (पु.)**– फायदा
**अनपेक्खा (वि.)** – अपेक्षारहित
**हिरञ्ञं (ना.)**– सोनेनाणे, हिरे
**विपुलं (वि.)**– भरपूर, पुष्कळ
**केन (क्रि.वि.)**– का
**अलसा (वि.)** – आळशी
**पजहन्ति (क्रि.)**– जाणतात
**बहुस्सुता (वि.)**– बहुश्रुत
**सतिमन्तो (वि.)**– स्मृतिवान
**अञ्ञमञ्ञ (वि.)** – एकमेकांसोबत
**पुञ्ञक्खेत्तं (वि.)**– पुण्यक्षेत्र

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) रोहिणी आपल्या वडिलांस झोपेतून उठवून काय म्हणते?
२) रोहिणीला तिच्या वडिलांनी काय विचारले?
३) भिक्खूचे कोणते कर्म शुद्ध आहेत?
४) भिक्खू अंतर्बाह्य कशाप्रमाणे शुद्ध आहे?
५) भिक्खू परस्परांशी कसे वागतात?
६) भिक्खू कोणत्या काळात रममाण असतात?

**२. खालील वाक्यांचे सत्य / असत्य लिहा.**

१) समणी नुन भविस्ससि ।
२) रोहिणी दानि पुच्छामि केन ते समणा अपिया।
३) रागं दोसं पजहन्ति, तेन मे समणा पिया।
४) यम्हा गामा पक्कमन्ति, विलोकेन्ति किञ्चन।
५) समादियाहि सीलानि, तं ते अत्थाय होहीं' ति ।


**३. खालील प्रश्नांची सूचनेनुसार कृती करून उत्तरे लिहा.**

१) अकम्मकामा.......... परदत्तूपजीविनो । (अलसा/सतिं) यापैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.
२) तेन मे ......... पिया । (समणा/बाह्मणा) यापैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.
३) बहुस्सुता धम्मधरा ........धम्मजीविनो। (अनरिय/अरिया) यापैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.
४) सतिमन्तो (माध्यम भाषेत अर्थ लिहा)
५) सुवण्णं (माध्यम भाषेत अर्थ लिहा)


६)   अनुत्तरं (माध्यम भाषेत अर्थ लिहा)
७)   चिरस्सं (संधी विग्रह करा)
८)   अनुत्तरं (संधी विग्रह करा)

४.   **जाळरेखाचित्र पूर्ण करा.**


१)




२)




३)




५.   **दीर्घोत्तरी प्रश्न.**

रोहिणीला भिक्खू / श्रमण का प्रिय आहे ते लिहा?

☆☆☆

# ८. पकिण्णानि सुभासितानि

**प्रस्तावना**

'सुभासितानि' म्हणजे एखादे महत्वपूर्ण, अर्थपूर्ण वचन मर्यादित शब्दात व्यक्त करणे. सम्यक विचार व्यक्त करण्याचे सामर्थ्य या सुभासितांमध्ये आहे. संपूर्ण पालि साहित्य या सुभासितांनी समृद्ध आहे. तिपिटकातील अनेक ग्रंथात विशेषता धम्मपद, सुत्तनिपात इत्यादी ग्रंथात अशी सुभासिते विपुल प्रमाणात आहेत. वेगवेगळ्या ठिकाणी ते विखुरलेले आहेत, वेगवेगळ्या प्रसंगी तथागतांनी नैतिकतेवर आधारीत जे उपदेश सांगितलेले आहेत, त्या सर्व उपदेशांचे संकलन म्हणजे धम्मपद, सुत्तनिपात इत्यादी मधील सुभासिते होत.

प्रस्तुत सुभासित हे धम्मपदामधील काही गाथांचा संग्रह आहे. या सुभासितांमधून जीवनाला सुसंपन्न बनविणारे धम्मवचन पालि गाथांच्या माध्यमातून अतिशय चांगल्याप्रकारे सांगितल्या गेले आहेत. नैतिक आचरणाच्या दृष्टीने, सर्वांगिण विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने तसेच सत्य धम्माचे पालन करण्याच्या दृष्टीने या सुभासितांमधील गाथा प्रेरक आहेत.



१) अप्पमादो अमतपदं, पमादो मच्चुनोपदं।
अप्पमत्ता न मीयन्ति, ये पमत्ता यथा मता ।। (अप्पमादो वग्गो, गाथा क्र. ०१)

२) मनोपुब्बङ्गमा धम्मा, मनोसेट्ठा मनोमया,
मनसा चे पदुट्ठेन, भासति वा करोति वा।
ततो नं दुक्खमन्वेति, चक्कं व वहतो पदं ।। (यमक वग्गो, गाथा क्रं. ०१)

३) मनोपुब्बङ्गमा धम्मा, मनोसेट्ठा मनोमया,
मनसा च पसन्नेन, भासति वा करोति वा,
ततो नं सुखमन्वेति, छाया व अनपायिनि ।। (यमक वग्गो, गाथा क्रं ०२)

४) फन्दनं चपलं चित्तं, दुरक्खं दुन्निवारयं ।
उजु करोति मेधावी, उसुकारो' व तेजनं ।। (चित्तवग्गो, गाथा क्रं ११)

५) चन्दनं तगरं वापि, उप्पलं अथ वस्सिको।
एतेसं गन्धजातानं, सीलगन्धो अनुत्तरो ।। (पुप्फवग्गो, गाथा क्रं १२)

६) पुत्ता मत्थि धनं मत्थि, इति बालो विहञ्ञति
अत्ता हि अत्तनो नत्थि, कुतो पुत्तो कुतो धनं ।। (बालवग्गो, गाथा क्र. ०३)

७) न भजे पापके मित्ते, न भजे पुरिसाधमे ।
भजेथ मित्ते कल्याणे, भजेथ पुरिसुत्तमे ।। (पण्डितवग्गो, गाथा क्रं ०३)

८) सब्बे तसन्ति दण्डस्स, सब्बे भायन्ति मच्चुनो।
अत्तानं उपमं कत्वा, न हनेय्य न घातये ।। (दण्डवग्गो, गाथा क्रं. ०१)

९) अत्ताहि अत्तनो नाथो, को हि नाथो परो सिया।
अत्तना हि सुदन्तेन नाथं, लभति दुल्लभं।। (अत्तवग्गो गाथा, क्र. ०४)

१०) नत्थि रागसमो अग्गि, नत्थि दोससमो गहो ।
नत्थि मोहसमं जालं, नत्थि तण्हासमा नदि ।। (मलवग्गो, गाथा क्रं १७)

११) सब्बपापस्स अकरणं, कुसलस्स उपसम्पदा।
सचित्त परियोदपणं, एतं बुद्धानसासनं।। (बुद्धवग्गो, गाथा क्रं. ०५)

१२) आरोग्य परमा लाभा, सन्तुट्ठि परमं धनं।
विस्सास परमा ञाति, निब्बाणं परमं सुखं।। (सुखवग्गो, गाथा क्रं ०८)

१३) अक्कोधेन जिने कोधं, असाधु साधुना जिने ।
जिने कदरियं दानेन, सच्चेनालिकवादिनं ।। (कोधवग्गो, गाथा क्रं. ०३)

**(निवडक धम्मपद)**

## शब्दार्थ

**अप्पमाद (वि.)** – अप्रमाद, जागरूकता

**पमादो (नपु.)** – प्रमाद

**न मीयन्ति (वर्त. क्रि.)** – मरत नाहीत

**मनो (मन. प. वि.ए.व.)** – मन

**पदुट्ठेन (कृ.)**– प्रदर्शित वचनाने

**सुखमन्वेति (क्रि.)** – सुख सोबत करते.

**फन्दनं (नपु.)** – क्षणिक, स्पंदन

**दुरक्ख (वि.)** – रक्षण करण्यास कठिण

**उजु (क्रि. वि.)** – सरळ

**ञातक (पु.)** – नातलग, आप्तेष्ट

**चन्दनं (पु.)** – चंदन

**सीलगन्धो (पु.)** – शीलांचा सुगंध, शीलगंध

**न भजे (क्रि.)** – संगती करू नये.

**वस्स (पु. नपु.)** – वर्ष

**असमाहितो** – एकाग्रचित्तरहित

**जीवितं (नपु.)** – जीवन

**सीलवन्तस्स (छ. वि. ए. ठ. )** – शीलवानाचे

**तसन्ति (वर्त. क्रि. प. पु. अ.व.)** – भितात

**सब्ब पापस्स** – कोणत्याही प्रकारचे पाप

**कुसलस्स (छ. वि.)** – कुसलाचा, पुण्याचा संचय करणे

**परियोदपणं (क्रि.)**– परिशुद्ध करणे

**पुरिसा (पु.)** – पुरुष

**राग (पु.)** – आसक्ती

**तपो (पु. नपु.)** – तप करणे

**सन्तुट्ठि (स्त्री.)** – संतुष्टी, संतोष, समाधान

**अमतपदं (नपु.)** – अमृतपद, अमरपद

**मच्चुनो (पु.)** – मृत्यू, मरण

**यथामता(क्रि.)** – मृतवत, मेल्यासारखे

**सेट्ठा (वि.)** – श्रेष्ठ, महान

**भासति वा करोति वा (वर्त.क्रि.ए.व.)**–बोलतो किंवा (काम) करतो.

**चपलं (वि.)** – चंचल

**दुन्निवारयं (वि.)** – थांबवून ठेवणे

**करोति (वर्त. क्रि.)** – करतो

**सेय्यसो** – अधिक हित, चांगले

**वापि (स्त्री.)** – कमळ, पुस्करणी

**अनुत्तरो (नपु. वि.)** – अनुत्तर, सर्वोत्तम

**पुरिसुत्तमे (पु.)** – पुरुषात उत्तम, उत्तमपुरुसात

**दुस्सीलो (वि.)** – दुराचारी, दुस्सील

**एकाहं (नपु.)** – एका दिवसाचे

**सेय्यो (नपु.)** – श्रेष्ठ (अधिक)

**सब्बे (वि.)** – सर्व

**लभति (वर्त. क्रि. प.धु. ए.व.)** – प्राप्त करतो.

**अकरणं (क्रि.)** – न करणे

**उपसम्पदा (स्त्री.)** – संपादित करणे, प्राप्त करणे.

**एतं (सर्व.)** – हा, ही

**यत्थ (क्रि.वि.)** – जिथे कुठे

**देसना (स्त्री.)** – उपदेश

**नत्थि (क्रि.)** – नाही, नसणे

## स्वाध्याय

### १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) प्रमाद न करणे कशाचे साधक आहे?

२) दुक्ख आपला पाठलाग कसे करते? उपमा द्या.

३) सुख आपले अनुसरण कसे करते? उपमा द्या.

४) चित्त कसे आहे?

५) मेधावी मनुष्य त्याला कसे सरळ करतो?

६) पुरिसाधमे म्हणजे काय?

७) पुरिसुत्तमे म्हणजे काय ?

८) सर्वच कशाला भितात?

### २. सत्य / असत्य सांगा.

१) पमादो अमतपदं, अप्पमता मच्चुनो पदं ।

२) मनसा च पदुट्ठेन भासति वा करोति वा, ततो नं दुक्खमन्वेति चक्कं व वहतो पदं ।।

३) फन्दनं चपल चित्तं न दुरूक्ख दुन्निवारयं।

४) अत हि अत्तनो नाथो, को हि नाथो परोसिया ।

५) अत्तानं उपमं कत्वा हनेय्ये घातये ।

### ३. सूचनेनुसार कृती करा.

**अ) संधी विग्रह करा.**

दुक्खमन्वेति, सुखमन्वेति, पुरिसुत्तमे

**आ) पूर्वकाळवाचक क्रिया करा.**

कर, मर

**इ) विभक्ती ओळखा.**

मनो, दण्डस्स

**ई) खालील गाथा पूर्ण करा.**

अ) न तं माता ....................।
........................ नं ततो करे ।।

ब) अत्त हि अत्तनो नाथो ................।
................. लभति दुल्लभं ।।


क) चन्दनं तगरं वापि,...................।
एतेसं गन्धजातानं .................।।

ड) ..........., इति बालो विहञ्ञति ।
अत्ता हि अत्तनो नत्थि, ............।।

४. **खालील पालि गाथांच्या आधारे रेखाजाळे पूर्ण करा.**

‘‘नत्थि रागसमो अग्गि, नत्थि दोससमो गहो।

नत्थि मोहसमं जालं, तण्हासमा नदि।




५. **जोड्या लावा.**

| ‘अ’ गट | ‘ब’गट |
|---|---|
| १) नत्थि रागसमो | १) जालं |
| २) नत्थि दोससमो | २) अग्गि |
| ३) नत्थि मोहसमं | ३) नदि |
| ४) नत्थि तण्हासमा | ४) मल |
| | ५) गहो |

६. **पालि समानार्थी शब्द लिहा.**

अ) अमतपदं

आ) मेधावी

इ) पुत्तो

७. **खालील पालि शब्दांचे पालिमध्ये विरुद्धार्थी शब्द लिहा.**

अ) पमादो

आ) मेधावी

इ) पुरिसाधमे

☆☆☆

## थुलवाचन विभागो

# १. राजोवादजातकं

**प्रस्तावना**

पालि साहित्यामध्ये जातक किंवा जातक कथा फार महत्त्वाच्या आहेत. ह्या पालि जातकांची संख्या ५४७ च्या जवळपास आहे. ह्या जातकामध्ये तथागत बुद्धाचा धम्मोपदेश आहे. राजोवाद जातकामध्ये सुद्धा बुद्धोपदेश आहे. कठीण विचार सोपा करून सांगण्याकरिता जातक कथांचा उपयोग करण्यात आला. समाजात बहुधा 'जशास तसे' किंवा 'बळी तो कान पिळी' हे तत्त्व आढळते. परंतु या कथेमध्ये राजाचे मोठेपण त्याचे राज्य किंवा संपत्तीवर अवलंबून नसून तो किती दान करतो, किती सदाचाराने वागतो आणि मनोविकारावर विजय कसा मिळवितो यावर अवलंबून आहे. या पाठात दोन राजांच्या सारथ्यांचा संवाद आलेला असून त्यांनी आपापल्या राजाचे गुणगौरव यात केलेले आहे. प्रस्तुत पाठ्यघटक लोकशाही न्याय व्यवस्थेसाठी महत्त्वाचा आहे.

अतीते वाराणसियं बह्मदत्ते रज्जं कारेन्ते बोधिसत्तो तस्स अग्गमहेसिया कुच्छिस्मिं पटिसंधि गहेत्वा सोत्थिना अजायि। नामग्गहणदिवसे पनस्स बह्मदत्तेकुमारो त्वेव नामं अकंसु । सो अनुपुब्बेन वयप्पत्तो सोलस्सवस्सकाले तक्कसीलं गन्त्वा सब्बसिप्पेसुनिप्फत्ति पत्वा पितु अच्चयेन रज्जे पतिट्ठाय धम्मेन रज्जं कारेसि। छन्दादिवसेन अगन्त्वा विनिच्छियं अनुसासि। तस्मिं एवं धम्मेन रज्जं कारेन्ते अमच्चापि धम्मेनेव वोहारं विनिच्छिनिंसु । वोहारेसु धम्मेन विनिच्छयमानेसु कुट्ठकारका नाम नाहेसुं । तेसं अभावा अट्ठत्थाय राजङ्गणे उपरवो पच्छिज्जि । अमच्चा दिवसम्पि विनिच्छयट्ठाने निसीदित्वा कञ्चि विविच्छयट्ठानं आगच्छन्त अदिस्वा पक्कमति। विनिच्छयट्ठानं छड्डेतब्बभावं पापुणि। बोधिसत्तो चिन्तेसि, ''मयिधम्मेन रज्जं कारेन्ते विनिच्छयट्ठानं छड्डेतब्बभाव पत्तं। इदानि मया अत्तनो अगुणं परियेसितुं वट्टति। अयं नाम मे अगुणो'ति ञत्वा तं पहाय गुणेसु येव वत्तिस्सामी' ति। ततो पट्ठाय 'अत्थि नु खो मे कोचि अगुणवादी' ति परिगण्हन्तो अन्तोवलज्जकानं अन्तरे कञ्चि अगुणवादि अदिस्वा, अन्तनो गुणकथमेव सुत्वा, एते मय्हं भयेनापि अगुणं अवत्वा गुणमेव वदेय्युं' न्ति बहिवलज्जनके परिगण्हन्तो तत्थापि अदिस्वा अन्तोनगरे परगण्हि। बहिनगरे चतूसू दारेसु द्वारगामके परिगण्हि। तत्थापि कञ्चि अवगुणवादि अदिस्वा अत्तनो गुणकथमेव सुत्वा 'जनपदं परिगण्हिस्सामीति अमच्चे रज्जं पटिच्छापेत्वा रथं आरूय्ह सारथिमेव गहेत्वा अञ्ञातकवसेन नगरा निक्खमित्वा जनपदं परिगण्हमानो याव पच्चन्त भूमिं गन्त्वा कञ्चि अगुणवादिं अदिस्वा अत्तनो गुणकथमेव सुत्वा पच्चन्तसीमन्तो महामग्गेन नगराभिमुखो येव निवत्ति।

तस्मिं पन काले मल्लिको नाम कोसलराजापि धम्मेन रज्ज कारेन्ते अगुणगवेसको हुत्वा अन्तोवलज्जकादिसु अगुणवादिं अदिस्वा अत्तनो गुणकथमेव सुत्वा जनपदं परिगण्हन्तो तं पदेसं अगमासि। ते उभो पि एकस्मिं निन्ने सकटमग्गे अभिमुखा अहेसुं । रथस्स उक्कमट्ठानं नत्थि। ''अथ मल्लिकरञ्ञो सारथि वाराणसिरञ्ञो सारथिं 'तव रथ उक्क मापेही' ति आह। सोपि 'अम्भो सारथि, तव रथं उक्कमापेहि, इमस्मिं रथे वाराणसिरज्जसामिको बरह्मदत्त महाराजा निसिन्नो' ति आह। इतरोपि 'अम्भो सारथि, इमस्मिं रथे कोसलरज्जसामिको मल्लिकमहाराजा निसिन्नो, तव रथं उक्कमापेत्वा अम्हाकं रञ्ञो रथस्स ओकासं देही' ति आह।

वाराणसिरञ्ञो सारथि 'अयम्पि किर राजा येव, किन्नु खो कातब्बं' ति चिन्तेन्तो' अत्थेसु उपायो। वयं पुच्छित्वा दहरतरस्स रथं उक्कमापेत्वा महल्लकस्स ओकासं दापेस्सामी' ति सन्निट्ठानं कत्वा तं सारथि कोसलरञ्ञो वयं पुच्छित्वा परिगण्हन्तो उभिन्नम्पि समानवयभावं ञत्वा,

रज्जपरिमाणं बलं, धनं, यसं, जातिगोत्तकुलपदेसन्ति सब्बं पुच्छित्वा उभोपि तियोजनसतिकस्स रज्जस्स सामिनो समानबलधनयसजातिगोत्तकुलपदेसा' ति ञत्वा 'सीलवन्ततरस्स ओकासं दस्सामी' ति चिंतेत्वा सो सारथि' तुम्हाकं रञ्ञो सीलाचारोकीदिसो' ति पुच्छि'। सो अयञ्च अयञ्च अम्हाकं रञ्ञो सीलाचारो' ति अत्तनो रज्जं अगुणमेव गुणतो पकासेन्तो पठमं गाथमाह –



**दळ्हं दळ्हस्स खिपति, मल्लिका मुदुना मुदुं।**

**साधुम्पि साधुना जेति, असाधुम्पि असाधुना।**

**एतादिसो अयं, राजा मग्गा उय्याहि सारथि।।**

अथं तं वाराणसिरञ्ञो सारथि 'अम्भो, किं पन तया अत्तनो रञ्ञो गुणा कथिता' ति वत्वा 'आमा' ति वुत्ते यदि एते गुणा अगुणा पन कीदिसा' ति वत्वा, 'एते ताव अगुणा होन्तु, तुम्हाकं पन रञ्ञो कोदिसा गुणा' ति वुत्ते तेन हि सुणाही' ति दुतियं गाथमाह –

**अक्कोधेन जिने कोधं, असाधु साधुना जिने।**

**जिने कदरियं दानेन, सच्चनालिकवादिनं।**

**एतदिसो अयं राजा, मग्गा उय्याहि सारथि' ति।।**

एवं वुत्ते मल्लिकराजा च उभोपि रथा ओतरित्वा अस्सेमोचेत्वा रथं अपनेत्वा वाराणसिरञ्ञो मग्गं अदंसु ।

(जातकअट्ठकथा)

## शब्दार्थ


**छन्दादिवस** – स्वच्छंदपणे, लहरीपणाने
**वोहार (ना.)** – कामकाज, व्यवहार
**विनिच्छयट्ठान (ना.)** – न्यायालय
**सब्बसिप्प (ना.)** – सर्वकला
**नाम गहण दिवस (ना.)** – नांव ठेवण्याचा दिवस
**अन्तोवलज्जक (ना.)** – हद्दीत राहणारा, राजमहालामधील
**अलिकवादी (ना.)** – खोटे बोलणारा
**विनिच्छय (ना.)** – निर्णय, निकाल
**कुटट्ठकारक(ना.)** – वकील, दलाल, बाजू मांडणारा
**दारगामक (ना.)** – उपनगर
**अमच्च (ना.)** – अमात्य, स्वीय सचिव
**जनपद (ना.)** – खेडे विभाग, राज्य
**उक्कमट्ठान (ना.)** – निर्जन स्थान
**दळ्ह (अ.)** – दृढ, मजबूत

## स्वाध्याय


**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) वाराणसीच्या राजाचे नांव काय होते?
२) ब्रह्मदत्त कुमार कोणत्या ठिकाणी शिकण्यासाठी गेले?
३) ब्रह्मदत्त कुमार राजा कशाचा शोध घेण्यासाठी राज्याबाहेर पडले?
४) राजाने राज्यातील लोकांना कोणता प्रश्न विचारला?
५) कोशल देशाच्या राजाचे नांव काय होते?
६) मल्लिकराजाचा सारथी ब्रह्मदत्तच्या सारथ्याला काय म्हणाला?
७) मल्लिकराजाचा सारथी व ब्रह्मदत्त कुमाराचा सारथी यांच्यात रस्ता देण्यासाठी काय ठरले?

**२. पाठातील पाच विशेषणे शोधून लिहा.**



**३. जाळरेखाचित्र पूर्ण करा.**




**४. संवाद पूर्ण करा.**

१) मल्लिक रञ्ञो सारथि – तव रथ उक्कमापे ही' ति?
ब्रह्मदत्त रञ्ञो सारथि ............................।

२) मल्लिक रञ्ञो सारथि – तुम्हाकं रञ्ञो सीलाचारो कीदिसोति?
ब्रह्मदत्त रञ्ञो सारथि ............................।

३) ब्रह्मदत्त रञ्ञो सारथि – तुम्हाक रञ्ञो सीलाचारो कीदिसो' ति ?
मल्लिक रञ्ञो सारथि ............................।

४) ब्रह्मदत्त रञ्ञो सारथि – अम्भो किं पन तया अत्तनो रञ्ञो गुणा कथिता'ति?
मल्लिक रञ्ञो सारथि – ............................।

५) ब्रह्मदत्त रञ्ञो सारथि – यदि एते गुणा अगुणा पन कीदिसा ?
मल्लिक रञ्ञो सारथि – ............................।

६) मल्लिक रञ्ञो सारथि – एते ताव अगुणा होन्तू', तुम्हाकं रञ्ञो सीलाचारो कीदिसा'ति?
ब्रह्मदत्त रञ्ञो सारथि – ............................।

**५. दीर्घोत्तरी प्रश्न.**

राजोवाद जातकाचा बोध स्पष्ट करा.

☆☆☆


# २. वासेट्ठसुत्तं

**प्रस्तावना**

'वासेट्ठसुत्तं' हे तिपिटकातील सुत्तपिटकाच्या अंतर्गत येणाऱ्या सुत्तनिपात या ग्रंथातून घेतले आहे.

एकदा तथागत बुद्ध इच्छानंगल उपवनात विहार करत असतांना तेथे भारद्वाज व वासेट्ठ हे दोन मित्र चर्चा करत असतांना, ब्राह्मण कसा होतो? ब्राह्मण कोणाला म्हणावे? श्रेष्ठत्वाचे लक्षण कोणते? इत्यादीवर वाद निर्माण झाला. ते दोघेही एकमेकांची समजूत घालू शकले नाहीत. तेव्हा ह्या प्रश्नांचे उत्तर मिळविण्यासाठी ते दोन्ही माणवक तथागत बुद्धाकडे आले. त्यांना बुद्धाने दिलेल्या उत्तराचे वर्णन यात आले आहे.

जातिवाद, जातिभेद हा भारतातील एक अतिशय गंभीर प्रश्न मानला जातो. या विषयी भारतातील अनेक महापुरुषांनी आपापले विचार व्यक्त केलेले आहेत. त्या जातिप्रथेच्या विरोधात तथागत बुद्धाने ठिकठिकाणी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. त्यापैकी जातिभेद खंडणाचा व अस्पृश्यता निवारण्याचा हा एक नमुना वासेट्ठ सुत्तात पाहायला मिळतो.



तेसं नो जातिवादस्मिं, विवादो अत्थि गोतमं।
जातिया बाह्मणो (ब्राह्मणो) होति, भारद्वाजो' ति भासति।
अहं च कम्मुना ब्रूमि (बूमि), एवं जानाहि चक्खुमा ।।१।।

तेन  सक्कोम सञ्ञत्तुं, अञ्ञमञ्ञं मयं उभो ।
भगवन्तं पुट्ठूमागमा, सम्बुद्धं इति विस्सुतं ।।२।।

जातिया बाह्मणो (ब्राह्मणो) होति, उदाहु भवति कम्मना।
अजानतं नो पब्रूहि, यथा जानेमु बाह्मणं (ब्राह्मणो)'' ।।३।।

तेसं वो' हं व्याक्खिस्सं (वासेट्ठाति भगवा) अनुपुब्बं यथातथं।
जाति विभं पाणानं, अञ्ञामञ्ञा हि जातियो ।।४।।

तिणरुक्खे' पि जानाथ, न वा पि पटिजानरे।
लिंग जातिमयं तेसं, अञ्ञमञ्ञा हि जातियो ।।५।।

ततो कीटे पतंगेन च, याव कुन्थ किपिल्लिके।
लिंगं जातिमयं तेसं, अञ्ञमञ्ञा हि जातियो ।।६।।

चतुप्पदे' पि जानाथ, खुद्दके च महल्लके ।
लिंगं जातिमयं तेसं, अञ्ञमञ्ञा हि जातियो ।।७।।

ततो मच्छे' पि जानाथ, उदके वारि गोचरे।
लिंगं जातिमयं तेसं, अञ्ञामञ्ञा हि जातियो ।।८।।

ततो पक्खी' पि जानाथ, पत्तयाने विहंगमे।
लिंगं जातिमयं तेसं, अञ्ञामञ्ञा हि जातियो ।।९।।

यथा एतासु जातीसु, लिंगं जातिमयं पुथु।
एवं नत्थि मनुस्सेसु, लिंगं जातिमयं पुथु ।।१०।।

यो हि कोचि मनुस्सेसु, गोरक्खं उपजीवति।
एवं वासेट्ठ जानाहि, कस्सको सो न बाह्मणो (ब्राह्मणो) ।।११।।

यो हि कोचि मनुस्सेस, वोहारं उपजीवति।
एवं वासेट्ठ जानाहि, वाणिजो सो न बाह्मणो (ब्राह्मणो) ।।१२।।

यो हि कोचि मनुस्सेसु, अदिन्न उपजीवति।
एवं वासेट्ठ जानाहि, चोरो एसो न बाह्मणो (ब्राह्मणो) ।।१३।।

यो हि कोचि मनुस्सेसु, इस्सत्थं उपजीवति ।
एवं वासेट्ठ जानाहि, योधाजीवो न बाह्मणो (ब्राह्मणो) ।।१४।।

यो हि कोचि मनुस्सेसु, गामं रट्ठं च भुञ्जति।
एवं वासेट्ठ जानाहि, राजा एसो न बाह्मणो (ब्राह्मणो) ।।१५।।

यो दुक्खस्स पजानाति, इधेव खयमत्तनो ।
पन्नभारं विसंयुत्तं, तमहं बूमि (ब्रूमि) बाह्मणो (ब्राह्मणो) ।।१६।।

यस्स रागो च दोसो च, मानो मक्खो च पातितो।
सासपोरिव आरग्गा, तमहं बूमि (ब्रूमि) बाह्मणं (ब्राह्मणं) ।।१७।।

न जच्चा बाह्मणो(ब्राह्मणो) होति, न जच्चा होति अबाह्मणो (अब्राह्मणो)
कम्मुना बाह्मणो(ब्राह्मणो) होति, कम्मुनाहोति अबाह्मणो (अब्राह्मणो)।।१८।।

कस्सको कम्मुना होति, पेस्सको होति कम्मुना ।
वाणिजो कम्मुना होति, पेस्सको होति कम्मुना।।१९।।

तपेन ब्रह्मचरियेन (विसुद्धाचरियेन), संयमेन दमेन च ।
एतेन बाह्मणो(ब्राह्मणो) होति, एवं बाह्मणमुत्तमं(ब्राह्मणमुत्तमं) ।।२०।।

**(सुत्तनिपात – आवश्यक फेरफार करून)**

---


## शब्दार्थ

**विवाद (वि. पुलि.)** – भांडण, कलह, झगडा, विवाद
**जाति (स्त्री.)** – जन्म
**भासति (क्रि.)** – बोलतो, चमकतो
**कम्मुना (वि.)** – कर्माने
**चक्खुमा (वि.)** – डोळस, जाणकार
**अञ्ञमञ्ञ (वि.)** – परस्पर, एकदुसऱ्याशी
**सञ्ञत्तुं (कृ.)** – प्रेरित, सूचित
**पट्ठुमागमा (कृ.)** – प्रश्न विचारण्यासाठी आले
**अजानतं (नपू.)** – न जाणता
**व्याक्खिस्स (क्रि.)** – सांगितले
**तिण (नपू.)** – गवत, तृण
**पतंगेन (पू.)** – (पक्षी) पक्ष्याने
**किपिल्लिके (स्त्री.)** – जन्म
**चतुप्पदे (पू.)** – चार पायांचा (पशु)
**मच्छ (पू.)** – मासा
**पक्खी (पू.)** – पक्षी
**पुथु (अ.)** – वेगवेगळा, पृथक
**गोरक्ख (पू.)** – गुराखी
**उपजीवति (क्रि.)** – परोपजिवी, परावलंबी
**अदिन्न (वि.)** – न दिलेले
**योधाजीवो (पू.)** – सैनिक
**भुञ्जति (वर्त.प.पू.ए.व.)** – खातो
**पजानाति (क्रि.)** – स्पष्टरुपाने जाणतो
**खयमत्तनो (वि.)** – नाश जाणतो
**विसंयुत्तं (कृ.)** – वेगळा केला, जोडला नाही
**आरग्गा (नपूं.)** – सुईचे टोक
**सिप्पिको (पू.)** – शिल्पकार, कलाकार
**पेस्सको (पू.)** – प्रेषक, पाठवणारा, एक जाती
**संयमेन (वि.)** – संयमाने
**दमेन (नपू.)** – दमाने, संयमाने


## स्वाध्याय

१. **खालील गाथांच्या आधारे रेखाजाळे पूर्ण करा.**

न जच्चा बाह्मणो(ब्राह्मणो) होति, न जच्चा होति अबाह्मणो(अब्राह्मणो)।
कम्मुना बाह्मणो(ब्राह्मणो) होति, कम्मुना होति अबाह्मणो(अब्राह्मणो)।।
कस्सको कम्मुना होति, सिप्पिको होति कम्मुना।
वाणिजो कम्मुना होति, पेस्सको होति कम्मुना ।।




२. **पाठातील पाच विशेषणे शोधून लिहा.**




३. **दीर्घोत्तरी प्रश्न.**

वासेट्ठसुत्ताचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

☆☆☆

# परिसिट्ठ

## १.व्याकरण (वेय्याकरण)

### सर च व्यञ्जनस्स वग्गिकरणं

(स्वर आणि व्यंजन वर्गीकरण)

### सर (स्वर)

पालि भाषेमध्ये आठ स्वर आहेत - अ, आ, इ, ई,उ, ऊ, ए, ओ.

स्वरांचे तीन भागांमध्ये वर्गीकरण करण्यात येते.

१) रस्स सरा अर्थात ऱ्हस्व स्वर - अ, इ, उ

२) दीघ सर अर्थात दीर्घ स्वर - आ, ई, ऊ

३) मज्झिम सर अर्थात मध्यम स्वर - ए, ओ

### व्यञ्जन (व्यंजन)

| पकारो | वग्गो | कठोर | मुदु | अनुनासिक |
|---|---|---|---|---|
| १. कण्ठ्य | क - वग्गो | क, ख | ग, घ | ङ (.) |
| २. तालव्य | च - वग्गो | च, छ | ज, झ | ञ (.) |
| ३. मुर्द्धन्य | ट - वग्गो | ट, ठ | ड, ढ | ण (.) |
| ४. दन्त्य | त- वग्गो | त, थ | द, ध | न (.) |
| ५. ओष्ठ्य | प - वग्गो | प, फ | ब, भ | म (.) |
| ६. अन्त | | य, र, ल, व, ळ | | |
| ७. उष्माक्षर | | स | | |
| ८. प्राणध्वनी | | ह | | |
| ९. निग्गहीत | | अं (.) | | |

### वण्णमाला (वर्णमाला)

आपल्या मुखातून जे मूळ ध्वनी बाहेर पडतात त्यांना वण्ण (वर्ण) असे म्हणतात. पालि भाषेमध्ये ८ स्वर आणि ३३ व्यंजने आहेत. असे एकूण ४१ वर्ण आहेत.

### सरपरिवत्तन (स्वर परिवर्तन)

१) मराठीतील किंवा संस्कृतातील ऋ, ॠ, लृ, ऐ, औ, अः हे स्वर पालि भाषेत आढळत नाहीत. 'ऋ' ऐवजी काही ठिकाणी 'अ,' काही ठिकाणी 'इ' आणि काही ठिकाणी 'उ' होतो.

ऋ ऐवजी अ - कृषि -कसि, घृत - घत, मृत - मत, श्रृंखला - संखला इत्यादी

ऋ ऐवजी इ - कृमि - किमी, ऋण- इण, श्रृंग - सिंग, तृण -तिण, इत्यादी

ऋ ऐवजी उ - ऋतु - उतु, ऋषभ - उसभ, मृदु -मुदु, मृषा - मुसा इत्यादी

२) लृ - मराठीत किंवा संस्कृतात फार क्वचितच ठिकाणी आढळतो.
पालि भाषेत त्याचा सर्वथा अभाव आहे.

३) ऐ ऐवजी ए होतो - तैल - तेल, ऐरावत- एरावत, शैल - सेल, वैशाख - वेसाख इत्यादी
ऐ ऐवजी इ होतो - ऐश्वर्य - इस्सरिव, सैन्धव - सिन्धव, वैभव - विभव इत्यादी.

४) औ ऐवजी ओ होतो - औषध - ओसध, गौतम -गोतम, पौर -पोर, औदारिक - ओदारिक इत्यादी
औ ऐवजी अ होतो - सौम्य - सम्म
औ ऐवजी आ होतो - गौरव - गारव
औ ऐवजी उ होतो - मौत्तिक- मुत्तिक, औधत्व - उद्धच्च, औत्सुक्य - उस्सुक्कं

## व्यञ्जन परिवत्तन (व्यंजन परिवर्तन)

१) पालिमध्ये **श** आणि **ष** हे ध्वनी नाहीत. त्याऐवजी 'स' चा उपयोग केला जातो.
(श, ष), स - शेष - सेस, आकाश - आकास, (श, ष, छ) - शावक -छावक, षष्ठ - छट्ठ.

२) पालि भाषेत कोणतेही पद हलन्त अर्थात व्यंजनान्त नसते.
भगवा (न्) - भगवा, गुणवा (न्) - गुणवा, या व (त्) - याव विद्यु(त्)- विज्जु, पश्चा(त्) - पच्छा.

३) पालि भाषेत अन्त्य म च्या स्थानी नेहमी अनुस्वार (.)असतो.
चित्तम् - चित्तं, सत्यम् -सच्चं, तीर्थम् - तित्थं

४) पालिभाषेत विसर्गाचा (:) प्रयोग होत नाही. संस्कृतातील अकारान्त पदाच्या शेवटी जो विसर्ग असतो त्याच्या जागी पालिमध्ये '**ओ**' होतो.
इतर ठिकाणी विसर्गाचा अभाव असतो.
बुद्धः- बुद्धो, कः - को, एष - एसो.

५) विसर्गाच्या पुढे जर स, श, ष असेल तर विसर्गाच्या स्थानी **स** होतो.
दु:सह-दुस्सह, नि:शोक - निस्सोक.

६) पालिभाषेत रेफ अर्थात रफार (र्)चा अभाव आहे. उदा. ब्राह्मण - बाह्मण, ब्रह्म - बह्मा.

अ) सर्व ठिकाणी संयुक्त व्यंजनातील **र** चा लोप होतो व आलेला वर्ण द्‌वित्व पावतो.
कर्म - कम्म, कर्ण -कण्ण, पर्ण - पण्ण, वर्ण - वण्ण, वर्ग -वग्ग, धर्म -धम्म, चक्र - चक्क, सर्व - सब्ब, पर्वत - पब्बतो.

आ) मराठी किंवा संस्कृतमधील शब्दांच्या आरंभी **र** युक्त जोडाक्षर असल्यास पालित त्या र चा लोप होतो. परंतु उरलेला वर्ण द्‌वित्व पावत नाही.
प्रजा - पजा, ग्राम-गाम, प्रिय -पिय, ग्रंथ - गंथ, प्रकार - पकार, प्रपंच - पपंच.

इ) **र्य** बद्दल **रिय** होतो व **र्य** मागील दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो. उदा.
भार्या - भरिया, सूर्य -सुरिय, आर्य - अरिय, कदर्य - कदरिय.

७) अ) दीर्घ स्वराच्या पुढे संयुक्त व्यंजन किंवा अनुस्वार आल्यास दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो. उदा.
तीर्थ- तित्थं, मार्दव -मद्दिवं, ईश्वर - इस्सर, नदीम् - नदिं, शालम् - सालं, कुर्म - कुम्म, पराक्रम - परक्कमं

आ) ऱ्हस्व स्वरावरील अनुस्वाराचा लोप होवून तो ऱ्हस्व स्वर दीर्घ होतो व दीर्घ स्वरावर अनुस्वार आला असेल तर तो दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो. उदा.
सिंह- सीह, विंशति - वीसति, मांस- मंस, पांशु -पांसू.

८) पदातील आदि **क्ष** चा **ख** होतो. उदा. क्षीर-खीर, क्षेम-खेम

९) पदातील मध्य क्ष चा काही ठिकाणी **क्ख** तर काही ठिकाणी **च्छ** होतो.

दक्षिण - दक्खिण, मोक्ष - मोक्ख, पक्ष -पक्ख, अक्षि - अच्छि किंवा अक्खि.

१०) ड, ढ चा अनुक्रमे **ळ** किंवा **ळ्ह** होतो. उदा.

गुड - गुळ, दाडिम - दाळिम, षोडस - सोळस, क्रीडा - कीळा, तडाग-तळाक, आषाढ - आसाळ्ह.

११) जोडाक्षरात शेवटचे व्यंजन म्, न्, य् किंवा व् असेल तर त्याचा लोप होतो व उरलेल्यांचे द्‌वित्व होतो. युग्म-युग्ग, नग्न - नग्ग, सौम्य - सम्म, अध्वा - अद्धा. परंतु म, न, य, व हे वर्ण **ह** शी संयुक्त असतील तर त्याचा लोप होत नाही. पण म, न, य, व बदलते. सह्य - सय्ह, परंतु ब्राह्मण व ब्रह्म याऐवजी बाह्मण, बह्म होतात. ब्राह्मण आणि ब्रह्म हे शब्द पालिमधील नाहीत.

१२) जोडाक्षरातील **व** चा ब होतो व त्याचे द्‌वित्व होते. उदा. सर्व-सब्ब, पर्वत -पब्बत.

**१३) जोडाक्षरांचे पालि शब्दातील इतर काही बद्‌दल पुढील प्रमाणे आहेत.**

| अ.क्र | जोडाक्षर | शब्दारंभी | शब्दामध्ये |
|---|---|---|---|
| १) | त्य, थ्य, द्य, ध्य | च, छ, ज, झ<br>त्याग - चाग<br>युति - जुति<br>ध्यान - झान | च्च, च्छ, ज्ज, ज्झ<br>नृत्य - नच्च<br>मद्य - मज्ज<br>तत्थ - तच्छ |
| २) | स्त, स्थ, ष्ठ | थ, ट, ठ, ट्ठ<br>स्तुति - थुति<br>स्थान - ठान | अष्ठ - अट्ठ<br>गृहस्थ - गहट्ठ<br>काष्ठ - कट्ठ |
| ३) | श्च, प्स, त्स | -- | च्छ,<br>आश्चर्य - अच्छरिय<br>अप्सरा - अच्छरा<br>वत्स - वच्छ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | ष्क, स्क, क्ष | ख<br>स्कन्ध – खन्ध<br>क्षान्ति – खन्ति | क्ख<br>भिक्षू – भिक्खू<br>शुष्क – सुक्ख |
| ५) | क्ष | छ<br>क्षुब्ध – छुद्ध | च्छ<br>इक्षु – उच्छु |
| ६) | स्प, ष्प | फ<br>स्पदन – फंदन | प्फ<br>पुष्प – पुप्फ |
| ७) | न्य, ण्य, ज्ञ | ञ<br>न्याय – ञाय | ञ्ञ<br>कन्या – कञ्ञा<br>प्रज्ञा – पञ्ञा<br>अरण्य – अरञ्ञ |
| ८) | ष्ण | | ण्ह<br>उष्ण – उण्ह |

## काळ प्रत्यय

### वर्तमानकाळ

| पुरुष / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उत्तम पुरिस) | (अहं) मि | (मयं) म |
| द्वितीय पुरुष (मज्झिम पुरिस) | (त्वं) सि | (तुम्हे) थ |
| तृतीय पुरुष (पठम पुरिस) | (सो, सा, तं) ति | (ते, ता, ताणि) अन्ति |

### भूतकाळ

| पुरुष / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) इं | (मयं) इम्ह |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) इ | (तुम्हे) इत्थ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) इ | (ते, ता, ताणि) इंसु, उं |

### भविष्यकाळ

| पुरुष / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) इस्सामि | (मयं) इस्साम |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) इस्ससि | (तुम्हे) इस्सथ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) इस्सति | (ते, ता, ताणि) इस्सन्ति |

| आज्ञार्थ | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) मि | (मयं) म |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) हि | (तुम्हे) थ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) तु | (ते, ता, ताणि) अन्तु |

| विध्यर्थ | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) एय्यामि | (मयं) एय्याम |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) एय्यासि | (तुम्हे) एय्याथ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) ए, एय्य | (ते, ता, ताणि) एय्युं |

| संकेतार्थ | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) इस्सं | (मयं) इस्सम्ह |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) इस्स | (तुम्हे) इस्सथ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) इस्स | (ते, ता, ताणि) इस्संसु |

☆☆☆

## सन्धी

**एकापुढे एक येणारे जवळजवळचे वर्ण एकत्र जोडण्याच्या प्रकारास 'सन्धी' असे म्हणतात.**

पालिमध्ये तीन प्रकारच्या सन्धी आहेत –

१) स्वर सन्धी     २) व्यंजन सन्धी     ३) निग्गहित (अनुस्वार) सन्धी

पालित विसर्ग नसल्यामुळे सन्धी होत नाही.

### १) स्वर सन्धी

दोन स्वर एकापुढे एक असल्यास ते एकमेकात मिळून जातात. पालि भाषेतील स्वरसन्धी विषयाचे काही प्रमुख नियम पुढीलप्रमाणे आहेत.

१) अ पासून ऊ पर्यंत स्वरापुढे सजातीय (म्हणजे त्याच प्रकारचा) स्वर आल्यास त्या दोहोंबद्दल एक दीर्घ स्वर होतो.

| प्रकार | उदाहरणे | सन्धी | प्रकार | उदाहरणे | सन्धी |
|---|---|---|---|---|---|
| अ + अ | पन + अयं | पनायं | आ + अ | पाद + अपि | पादापि |
| आ + आ | तण्हा + आकुला | तण्हाकुला | इ + इ | उपद्दहन्ति + इति | उपद्दहन्तीति |
| इ + ई | नहि + ईदिसो | नहीदिसो | | | |
| उ + ऊ | बहु + ऊसहन | बहूसहन | उ + उ | बहु + उपकारो | बहूपकारो |

२) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदांची सन्धी होताना क्वचित पहिल्या स्वराचा लोप होतो.

पुरिस + उत्तमो ( = अ+उ) = पुरिसुत्तमो

निलानि + एकानि ( = इ + ए) = निलानेकानि

तत्र+ इमे (अ +इ) = तत्रिमे

तत्थ + इमे (अ + इ) = तत्थिमे

अज्ज + उपोसथो ( = अ + उ) = अज्जुपोसथो

एसो + आवुसो (= ओ + आ) = एसावुसो

३) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदांचा सन्धी होत असता क्वचित पुढच्या स्वराचा लोप होतो.

रूक्खो + अपि (=ओ + अ) = रूक्खोपि

देवो + अम्हि ( = ओ + अ) = देवोम्हि

सो + अहं (=ओ + अ) = सोपि

सो + अपि ( = ओ + अ) = सोहं

चत्तारो + इमे (= ओ + इ) = चत्तारोमे

४) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदाचा सन्धी होत असता कधी कधी दोहोंपैकी एकाही स्वराचा लोप होत नाही.

कञ्ञा + इव (= आ + इ) = कञ्ञाइव

लता + इव (= आ + इ) = लताइव

५) लोप झालेल्या स्वरापुढे 'इ' असेल तर त्याऐवजी 'ए' होतो आणि 'उ' असेल तर त्याचा 'ओ' होतो.

तस्स + इदं (= अ +इ) = तस्सेद वात + इरितं (= अ + इ) = वातेरितं;

वाम + उरू (= अ + उ) = वामोरू

वि + उदकं ( = इ + उ) = वोदकं.

६) 'इ' (ऱ्हस्व -दीर्घ) अथवा 'उ' (ऱ्हस्व - दीर्घ) यांच्यापुढ इतर वर्ण आल्यास 'इ' चा 'य' आणि 'उ' चा 'व' होतो.

वि + आकतो (= इ+आ) = व्याकतो

इति + अस्स (= इ + अ) = इत्यस्स

सु + आगतं ( = उ + आ) = स्वागतं

बहु + आबाधो (= उ + आ) = बव्हाबाधो

## २) व्यंजन सन्धी

**जेव्हा एक व्यंजन दुसऱ्या व्यंजनाबरोबर अथवा स्वराबरोबर मिळते तेव्हा त्याला व्यंजन सन्धी म्हणतात.**

१) जेव्हा एखादया स्वरापुढे पर- अक्षर हे जर व्यंजन असेल तर पूर्वी असलेला ऱ्हस्व स्वराचा दीर्घ स्वर होतो आणि दीर्घ स्वराचा ऱ्हस्व स्वर होतो.

सम्म + धम्मो ( =अ + ध + अ) = सम्माधम्मो

खन्ति + परमं ( = इ + प + अ) = खन्ती परमं

जायति + सोको (= इ + स + ओ) = जायतीसोको

मुनि + चरे (= इ + च +अ) = मुनीचरे

२) स्वरापुढे व्यंजन आले असल्यास केव्हा केव्हा त्या व्यंजनाचे द्‌वित्व होते.

वि + गहो (= इ + ग + अ) = विग्गहो

प + गहो (= अ + ग +अ) = पग्गहो

दु +कतं (= उ + क + अ) = दुक्कतं

३) 'ए' आणि 'ओ' च्या नंतर कोणताही वर्ण आल्यास 'ए' आणि 'ओ' चा 'अ' होतो.

याचकं आगते (= ए + आ) = याचकमागते सो + सीलवा (= ओ + स् + ई) = स सीलवा

## ३) निग्गहित (अनुस्वार) सन्धी

**अनुस्वारा (निग्गहिता) बरोबर स्वर अथवा व्यंजन मिळते तेव्हा त्याला निग्गहित सन्धी म्हणतात.**

१) काही वेळा निग्गहिताचा लोप होतो. उदा.

सं + रत्तो = सारत्तो　　सं + रागो = सारागो　　कथं + अहं = कथाहं

गन्तुं + कामो = गन्तुकामो　　बुद्धानं + सासनं = बुद्धानसासनं　　एवं + अहं = एवाहं

२) निग्गहिता (अनुस्वारा) पुढे आलेल्या स्वराचा काही वेळा लोप होतो. उदा.

त्वं + असि = त्वंसि　　किं + इति = किंति

इदं + अपि = इदम्पि　　अलं + इदानि = अलन्दानि

३) जर निग्गहितानंतर 'य', 'एव' तसेच 'हि' हे शब्द आल्यास, निग्गहिताचा काही वेळा 'ञ्ञ' होतो. तसेच 'य' पुढे आल्यास पूर्वीच्या 'स' शब्दावरील निग्गहिताचा 'ञ्ञ' होतो. उदा.

तं + एव = तञ्ञेव　　तं + हि = तञ्हि　　एवं + आह = एवमाह

सं + यतो = सञ्ञतो　　सं + यमो = सञ्ञमो　　एवं + एव = एवमेव

## धातुरुपाविषयी माहिती (काळ)

१) क्रियावाचक शब्दाला 'धातू' म्हणतात. पालिभाषेत हे धातू १) परस्सपद (परस्मैपद) व २) अत्तनोपद (आत्मनेपद) असे दोन पद प्रकारात विभागले गेले आहेत. मूळ धातूला परस्मैपदाचे प्रत्यय लावून क्रियापद बनवता येते. एकंदरीत पालिभाषेत आत्मनेपदी क्रियापदांची रूपे कमी आहेत.

२) प्रामुख्याने पालिमध्ये परस्सपदाचा उपयोग करण्यात येतो. आत्मनेपद कर्मणि प्रयोग व कवितेत उपयोगात येते.

३) पालिभाषेत द्विवचन नसल्याने क्रियापद एकवचनी  किंवा अनेकवचनी असते.

४) पालि व्याकरणात अनुक्रमे तीन पुरुष आहेत. पालि व मराठी व्याकरणातील पुरुषांमध्ये खालील प्रमाणे क्रम आहेत.

| पालि | मराठी | पालि | मराठी | पालि | मराठी |
|---|---|---|---|---|---|
| उत्तम पुरिस | प्रथम पुरुष | मज्झिम पुरिस | द्वितीय पुरुष | पठम पुरिस | तृतीय पुरुष |

५) काळ व अर्थवाचक काही पालि संज्ञा पुढीलप्रमाणे

| पालि | मराठी | पालि | मराठी |
|---|---|---|---|
| १) पच्चुपन्न कालो<br>३) भविस्सन्ती/ अनागत काला | वर्तमानकाळ<br>भविष्यकाळ | २) हीय्यत्तनी / अतीत कालो | भूतकाळ |

## पच्चुपन्न कालो (वर्तमानकाळ)

### वर्तमानकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढीलप्रमाणे

| पुरिस | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | (अहं) मि | (मयं) म |
| मज्झिम पुरिस | (त्वं) सि | (तुम्हे) थ |
| पठम पुरिस | (सो, सा, तं) ति | (ते, ता, ताणि) अन्ति |

### पच = शिजविणे

| पुरिस | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | पचामि | पचाम |
| मज्झिम पुरिस | पचसि | पचथ |
| पठम पुरिस | पचति | पचन्ति |

खाद, नम, गच्छ, पठ, वस, कस इत्यादी धातू 'पच' प्रमाणे चालतात.

## हीय्यत्तनी (भूतकाळ)

### भूतकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढीलप्रमाणे

| पुरिस | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | (अहं) इं | (मयं) इम्ह |
| मज्झिम पुरिस | (त्वं) इ | (तुम्हे) इत्थ |
| पठम पुरिस | (सो, सा, तं) इ | (ते, ता, ताणि) इंसु, उं |

### खाद (खाणे)

| पुरिस | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | खादिं | खादिम्ह |
| मज्झिम पुरिस | खादि | खादित्थ |
| पठम पुरिस | खादि | खादिंसु, खादुं |

कीळ, हस, लभ, नम, वस, गच्छ इत्यादी धातू 'खाद' प्रमाणे चालतात.

### अनागतकालो (भविष्यकाळ)

### भविष्यकाळी परस्मैपदी प्रत्येय पुढीलप्रमाणे

| पुरिस | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | (अहं) इस्सामि | (मयं) इस्साम |
| मज्झिम पुरिस | (त्वं) इस्ससि | (तुम्हे) इस्सथ |
| पठम पुरिस | (सो, सा, तं) इस्सति | (ते, ता, ताणि) इस्सन्ति |

### पठ (शिकणे)

| पुरिस | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिसन | पठिस्सामि | पठिस्साम |
| मज्झिम पुरिस | पठिस्ससि | पठिस्सथ |
| पठम पुरिस | पठिस्सति | पठिस्सन्ति |

लभ, गच्छ, नम, वस, कस इत्यादी धातू 'पठ' प्रमाणे चालतात.

☆☆☆

## समास

**भाषेत जेव्हा दोन किंवा अधिक शब्द एकत्र येऊन व्याकरण दृष्ट्या एक शब्द होतो तेव्हा त्याला समास किंवा सामासिक शब्द असे म्हणतात.** असे समास हे अभिजात भाषांचे वैशिष्ट्य होय. पालि भाषेमध्ये समासांचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत –

| | |
|---|---|
| १) द्वन्द (द्वन्द्व) समास | २) तप्पुरिस (तत्पुरुष) समास |
| ३) बहुब्बीहि (बहुव्रीहि) समास | ४) अव्वयीभाव (अव्ययीभाव) समास |

### १. द्वन्द समास :

दोन अथवा जास्त शब्दातील 'च' (आणि) चा लोप करुन जो समास तयार होतो त्याला 'द्वन्द' (द्वन्द्व) समास असे म्हणतात. यामध्ये सर्व शब्द सारखेच महत्त्वाचे असतात. द्वन्द समास दोन प्रकारे आहेत –

| | |
|---|---|
| अ) समाहार द्वन्द समास | ब) इतरेतर द्वन्द समास |

**अ) समाहार :** दोन संज्ञा समासात येऊन 'च' ने जोडल्यावर अर्थ प्रगट करतात आणि एक समाहाराचा (समूहाचा) बोध करतात तेव्हा तो समाहार द्वन्द समास होतो, हा समास नपुंसकलिंगी असतो. उदा.

| | |
|---|---|
| मुखं च नासिका च – मुखनासिकं | गीतं च वादितं च – गीतवादितं |
| युगं च नङ्गलं च – युगनङ्गलं | डंसो च मकसो च – डंसमकसं |
| दासि च दासो च – दासिदासं | कण्हो च सुक्को च – कण्हसुक्कं |

**ब) इतरेतर :** जेव्हा समासातील दोन्ही पदे प्रधान असतात तेव्हा त्यास 'इतरेतरद्वन्द समास' म्हणतात. हा समास नित्य बहुवचनी असून शेवटच्या पदाचे लिंग हे त्या संपूर्ण समासाचे लिंग असते.

उदा.

| | |
|---|---|
| चन्दिमा च सुरियां च – चन्दिमसुरिया | समणो च ब्राह्मणो च – समणब्राह्मणो |
| माता च पिता च – मातापितरो | पिता च पुत्तो च – पितापुत्ता |

### २. तप्पुरिस (तत्पुरुष) समास :

तत्पुरुष समासाचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) विभत्ति तप्पुरिस | २) कम्मधारय | ३) द्विगु | ४) मज्झिमपदलोपी |
| ५) नञतप्पुरिस | ६) अलुत्ततप्पुरिस | ७) उपपदतप्पुरिसं | |

### १) विभत्तितप्पुरिस (विभक्ती तत्पुरुष) :

**दुतिया तप्पुरिस :**

उदा. गामं गंतो –गामगतो देसं गतो – देसगतो बन्धनं गतो – बन्धगतो

**ततिया तत्पुरिस :**

उदा. बुध्देन भासितं – बुध्दभासितं पितुना सदियो – पितुसदियो

**चतुत्थी तप्पुरिस :**

उदा. सङ्घाय भत्तं – सङ्घभत्तं कुण्डलाय सुवण्णं – कुण्डलसुवण्णं

रजनाय दोणि – रजनदोणि नहानाय जलं – नहानजलं

**पञ्चमी तप्पुरिस :**

उदा. चोरस्सा भयं – चोरभयं पापस्मा मुत्तो – पापमुत्तो

मुसावादा विरति – मुसावादविरति

**छट्ठी तप्पुरिस :**

उदा. रुक्खस्स साखा – रुक्खसाखा धञ्ञस्स रासि – धञ्ञरासि रञ्ञो पुत्तो – राजपुत्तो, रञ्ञोपुत्तो

रञ्ञो पुरिसो – राजपुरिसो मगधानं राजा – मगधराजा

**सत्तमी तप्पुरिस :**

उदा. संसारे दुक्खं – संसारदुक्खं जले कीळा – जलकीळा

आकासे गमनं – आकासगमनं अकाले मेघो – अकालमेघो

**२) कम्मधारय समास (कर्मधारय समास):** जेव्हा समासातील दोन्ही घटक एकाच विभक्तीत असतात. (समानाधिकरण) तेव्हा 'कम्मधारय समास' होतो.

उदा. महन्तो पुरिसो – महापुरिसो मुखं चन्दो विय – मुखचन्दो

पञ्ञा सुरियो विय – पञ्ञासुरियो विज्जा एव धन – विज्जाधनं

बुध्दघोसो येव आचरियो –बुद्धघोसाचरियो

**३) द्‌विगु :** जेव्हा कम्मधारय समासाचे पहिले पद संख्यावाचक असते तेव्हा द्‌विगु समास होतो.

उदा. दस सीलानि – दससीलानि एको पहारो – एकप्पहारो

**४) मज्झिपदलोपि :** कर्मधारय समासात दोन पदांना जोडणारे पद जेव्हा गाळले जाते तेव्हा मज्झिपदलोपि समास होतो.

उदा. गन्धेन मिस्सित तेलं – गन्धतेलंपिट्ठिया उग्गतो पासाणो – पिट्ठिपासो

**५) नञतप्पुरिस :** जेव्हा नकारवाचक किंवा निषेधवाचक अव्ययाचा नामाशी समास होतो तेव्हा त्याला नञतप्पुरिस समास म्हणतात.

उदा. न मनुस्सो – अमनुस्सो

न कालो – अकालो

न पण्डितो – अपण्डितो

न वसलो – अवसलो

न बाह्मणो – अबाह्मणो

धम्मस्स विरुद्धो – अधम्मो

संसयस्स अभावो – असंसयो

**६) अलुत्त तप्पुरिस :** या प्रकारात पहिल्या पदाचा विभक्ती प्रत्यय-तसाच राहतो, त्याचा लोप होत नाही.
उदा. परस्स पदं – परस्सपदं अन्ते वसति – अन्तेवासी, उदके चरन्ति – उदकेचरा

**७) उपपद तत्पुरिस :** जेव्हा समासाचे दुसरे पद धातुसाधित असते आणि ते स्वतंत्रपणे वापरता येत नाही तसेच समासाचा विग्रह केला असता त्या धातुसाधित पदाचे क्रियापदात रुपांतर होते. तेव्हा उपपद तप्पुरिस समास होतो.

उदा. फले जायति इति – फलजं

कुम्भं करोति इति – कुम्भकारो

धनं ददाति इति – धनदो

धम्मं जानाति इति – धम्मञ्ञू

## ३. बहुब्बीहि समास :

ज्यावेळी दोन किंवा अधिक पदांचा समास तयार तो संपूर्ण समास दुसऱ्याच एखाद्या नामाचे किंवा अर्थाचे विशेषण होतो व त्याविषयी माहिती सांगतो त्यावेळी 'बहुब्बीहि (बहुव्रीहि) समास' म्हणतात.

उदा. बहूनि धनानि यस्स सो बहुधनो.

जितानि इन्दियानि यस्स सो जितिन्द्रियो.

लम्बा कण्णा यस्स सो लम्बकण्णो.

समानं उदरं यस्स सो सोदरियो.

मना सेट्ठा एतेसं इति मनोसेट्ठा.

उदक पीयते अस्मिं इति उदपान.

## ४. अव्ययीभाव :

जेव्हा समासाचे पहिले पद अव्यय आणि दुसरे नाम असते तेव्हा संपूर्ण समास अव्यय होतो म्हणून त्याला 'अव्ययीभाव समास' म्हणतात.

उदा. दिन दिने – पटिदिनं

वस्स वस्से – अनुवस्सं

नगरा बहि – बहिनगरे

कम्मं अनतिकम्मं-यथाकम्मं

गङ्गाय समीप – उपगङ्गं

## अव्यय

१. **हेत्वर्थक अव्यय :** 'हे करण्याकरिता' या अर्थी हेत्वर्थक अव्यय उपयोगात आणले जाते.

धातूला 'तुं' 'ताये' आणि 'तवे' हे प्रत्यय लावून हेत्वर्थक अव्यय तयार होतात. उदा.

सो भोतुं गच्छति । (तो जेवण्याकरिता जातो.)

कातुं गच्छति। (करण्याकरिता जातो.)

कातवे गच्छति । (करण्याकरिता जातो.)

२. **पूर्वकालवाचक अव्यय :** 'हे काम करून' या अर्थी पूर्वकालवाचक अव्यय उपयोगात आणले जाते. धातूला 'त्वा', 'त्वान', 'तून' हे प्रत्यय लावून पूर्वकालवाचक अव्यय तयार होतात. उदा.

सो विहारं गन्त्वा बुद्धं वन्दति।

(तो विहारात जावून बुद्धाला वंदन करतो.)

सो सुत्वा याति ।

सो सुत्वान याति ।

सो सोतून याति ।

(तो ऐकून येतो)

☆☆☆

## २. सुलभ पालि (सुलभो पालि)

### अंक व अंकवाचक शब्द

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | – | एक | २६ | – | छब्बीसति |
| २ | – | व्दि, व्दे | २७ | – | सत्तवीसति |
| ३ | – | ति | २८ | – | अट्ठवीसति |
| ४ | – | चतु | २९ | – | एकूनतिंसति |
| ५ | – | पञ्च | ३० | – | तिंसति |
| ६ | – | छ | ३१ | – | एकतिंसति |
| ७ | – | सत्त | ३२ | – | बत्तिंसति |
| ८ | – | अट्ठ | ३३ | – | तेतिंसति |
| ९ | – | नव | ३४ | – | चतुतिंसति |
| १० | – | दस | ३५ | – | पञ्चतिंसति |
| ११ | – | एकादस | ३६ | – | छतिंसति |
| १२ | – | व्दादस, बारस | ३७ | – | सत्ततिंसति |
| १३ | – | तेरस – तेळस | ३८ | – | अट्ठतिंसति |
| १४ | – | चतुद्दस, चुद्दस | ३९ | – | एकूनचत्तालीसति |
| १५ | – | पञ्चदस, पण्णरस | ४० | – | चत्तालीसति |
| १६ | – | सोलस | ४१ | – | एकचत्तालीसति |
| १७ | – | सत्तरस, सत्तदस | ४२ | – | व्देचत्तालीसति |
| १८ | – | अट्ठारस, अट्ठदस | ४३ | – | तिचत्तालीसति |
| १९ | – | एकूनवीसति | ४४ | – | चतुचत्तालीसति |
| २० | – | वीसति | ४५ | – | पञ्चचत्तालीसति |
| २१ | – | एकवीसति | ४६ | – | छचत्तालीसति |
| २२ | – | व्देवीसति, व्दावीसति, बावीसति | ४७ | – | सत्तचत्तालीसति |
| २३ | – | तेवीसति | ४८ | – | अट्ठचत्तालीसति |
| २४ | – | चतुवीसति | ४९ | – | एकूनपञ्ञासति |
| २५ | – | पञ्चवीसति | ५० | – | पञ्ञासति, पण्णास |

| वार | वारो |
|---|---|
| सोमवार | **चन्दवारो** |
| मंगळवार | **कुजवारो** |
| बुधवार | **बुधवारो** |
| गुरूवार | **गुरुवारो** |
| शुक्रवार | **सुक्कवारो** |
| शनिवार | **सनिवारो** |
| रविवार | **रविवारो** |

**काळ (ऋतु-उतु)** ९)

| | | | |
|---|---|---|---|
| १) | उन्हाळा | - | **निदाघ (पु)** |
| २) | पावसाळा | - | **वस्सकालो, वस्सान** |
| ३) | हिवाळा | - | **सीतकालो सिसिर** |

**मासं (महिने)**

| | | |
|---|---|---|
| १) | जानेवारी | **फुस्सो** |
| २) | फेब्रुवारी | **माघो** |
| ३) | मार्च | **फगुणो** |
| ४) | एप्रिल | **चित्तमासो** |
| ५) | मे | **वेसाखो** |
| ६) | जून | **जेट्ठमासो** |
| ७) | जुलै | **आसाळ्हो** |
| ८) | ऑगस्ट | **सावणो** |
| | सप्टेंबर | **पोट्ठपादो** |
| १०) | ऑक्टोबर | **अस्सयुजो** |
| ११) | नोव्हेंबर | **कत्तिको** |
| १२) | डिसेंबर | **मागसिरो** |

**नातेसंबंध**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आई | - | **माता, मातु, अम्मा** | पिता, वडील | - | **पितु, पिता** |
| पुत्र, मुलगा | - | **पुत्तो, दारको** | मुलगी | - | **धीता, दारका** |
| बहिण | - | **भगिनी** | मोठी बहिण | - | **जेट्ठ भगिनी** |
| लहान बहिण | - | **कनिट्ठ भगिनी** | पतीचा भाऊ | - | **देवरो** |
| पतीची बहिण | - | **ननन्दा** | भाऊ | - | **भाता** |
| मोठा भाऊ | - | **जेट्ठभाता** | लहान भाऊ | - | **कनिट्ठभाता** |
| मामा | - | **मातुलो** | मामी | - | **मातुलानी, चुळ्ळमाता** |
| आजी | - | **अय्यिका, मातामही** | आजोबा | - | **अय्यको, पितामहो** |
| पत्नी | - | **भरिया** | पती | - | **पति, भत्ता** |
| आईची बहिण (मावशी) | - | **मातुच्छा** | सासु | - | **सस्सु** |
| सासरा | - | **सस्सुरो** | सुन | - | **सुण्ह, सुनिसा** |
| भाचा | - | **भागिनेय्यो** | पुतण्या | - | **भातुपुत्तो** |
| भाची | - | **भागिनेय्या** | पुतणी | - | **भातुधीता** |
| काका | - | **चुलपिता** | काकी | - | **चुलमाता** |

## कालभेदा (काळ-वेळ)

| | | | |
|---|---|---|---|
| पहाट | अरूणोदय, अरूणवेलाय, पुब्बण्हं | | |
| सकाळ | पातो, पभातो | मध्यान्ह | मज्झण्हो |
| दुपार | अपरण्हो | सायंकाळ | सायण्ह समयं |
| रात्र | रत्ति | मध्यरात्र | निसीथो |
| क्षण | खण | तास | घटिका |
| मिनिट | मुहुत्त | दिवस | दिवसो |
| सप्ताह | सत्ताह | अर्धामहिना | अध्दमासो, पक्खो, अड्ढमासो |
| महिना | मासो | वर्ष | वस्स |
| आज | अज्ज | उद्या | सुवे |
| परवा | परसुवे, परहियो (आजच्या पूर्वीचा दिवस) | काल | हियो |
| एकदा | एकदा | पूर्वी | पुब्बे, पुरे |

## शरीराचे अंग – सरिरावयव

| | | | |
|---|---|---|---|
| शरीर | कायो, सरीरं | डोकं | सीसं |
| केस | केसो | चेहरा | वदन, आनन |
| डोळे | अक्खि, नयनं, चक्खु, नेत्त | नाक | नासिका, घाण, नासा |
| कान | कण्ण, सोतं | तोंड | मुख |
| ओठ | ओट्ठो, दन्तावरण | जबडा | हनुका |
| दात | दन्तो | गाल | कपोलो |
| मान | गीवा | खांधा | अंसकुटो |
| हात | हत्थ, कर, पाणि | पोट | कुच्छि, उदर |
| पाठ | पिट्ठि | छाती | उरो |
| कमर | कटि | जांघ | पङ्गानं, पंघानं |
| पाय | पादो | मांडी | ऊरू |
| हनुवटी | चुबुकं | बोट | अङ्गुलि, अंगुलि |
| नखे | नखो | तळहात | हत्थतलं |
| पायाचे बोटे | पदङ्गुलि, पदंगुलि | अंगठा | अङ्गुट्ठो, अंगुट्ठो |
| त्वचा | तचा, छवी | जिभ | जिव्हा |
| टाच | पण्हि | कोपरा | कप्परो |

## जंगलीप्राणी – तिरच्छान

| | | | |
|---|---|---|---|
| सिंह | **सीहो** | वाघ | **व्यग्घो** |
| बिबट्या | **दिपि** | अस्वल | **अच्छो** |
| कोल्हा | **सिगालो** | गेंडा | **खग्गविसान** |
| हरिण | **मिग** | हत्ती | **आगो, हत्थि, करि** |
| उंट | **ओट्ठो** | लांडगा | **वको** |
| तडस | **तरच्छो** | डुक्कर | **सुकरो, वराह** |
| वराही | **डुकरीण** | माकड | **मक्कटो, वानरो, कपि** |
| बेडूक | **मण्डुको** | गाढव | **गद्रभो, गद्दभो** |
| मुंगूस | **नकुलो** | साप | **सप्पो, अहि** |
| अजगर | **अजगरो** | विंचू | **विच्छिका** |
| साळींदर | **सल्लो** | खेकडो | **कक्कटको, कुळीरो** |

## पाळीव प्राणी

| | | | |
|---|---|---|---|
| कुत्रा | **सुनखो** | मांजर/ बोका | **बिळाळा, मञ्जरो** |
| मांजर | **बीळाली** | बैल | **गोणं** |
| म्हैस | **महिसो** | बकरी | **अज** |
| मेंढी | **एळको** | उंदीर | **आकू, मूसि** |
| गाढव | **गद्रभो, गद्दभो** | कासव | **कुम्मो, कच्छपो** |
| घोडा | **अस्सो** | घोडी | **वळवा** |
| वासरू | **वच्छो** | पिलु | **पोतको** |

## पक्षी

| | | | |
|---|---|---|---|
| मोर | **मयुरो, सिखण्डी** | कोंबडा | **कुक्कुटो** |
| कोंबडी | **कुक्कुटी** | गिधाड | **गिज्जो** |
| पोपट | **सुवो, सुको** | गरूड | **गरूळ्ह** |
| कबुतर | **कपोतो** | चिमणी | **चातको, चटको** |
| कावळा | **काको, बलिपुट्ठ (पु)** | पारवा | **पारावतो** |
| हंस | **हंसो** | घुबड | **उलुको** |
| बदक | **कादम्ब** | बगळा | **बको** |
| वटवाघूळ | **वग्गुलि** | कोकिळा | **कोकिला** |

## जलचर प्राणी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मासा | – | **मच्छो** | मीन | – | अंबुज(पु) |
| मगर | – | **सुसुमार, कुम्भिलो** | खेकडा | – | कक्कटको |
| साप | – | **सप्पो, अहि, नाग, उरगो** | शार्कमासा | – | मकरो |

## आहार

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दूध | – | **खीर** | भात | – | **ओदनो, भत्त** |
| तूप | – | **सप्पि, घत** | मास | – | **मंस** |
| लसून | – | **लसुणं** | तिळ | – | **तिलक** |
| चिंच | – | **चिञ्चा** | मीठ | – | **लवणं, लोणं** |
| दही | – | **दधि** | तेल | – | **तेलं** |
| ताक | – | **तक्क** | काकवी | – | **फणीतं** |
| कांदा | – | **फलन्दु** | भातपेज | – | **यागु** |
| मिरे | – | **कोळकं** | आलु | – | **कन्दो, आलुको** |
| हळद | – | **हळीद्दी** | | | |

## फळे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जांभूळ | – | **जम्बू** | आंबा | – | **अम्बं** |
| फणस | – | **पनसं** | संत्री | – | **जम्बीरं** |
| द्राक्षे | – | **मुद्दिका** | टरबुज | – | **वल्लिभो** |
| अननस | – | **मधुकेतकी, बहुनेत्तफलं** | उस | – | **उच्छु** |
| बोर | – | **बदरं** | उंबर | – | **उदुम्बर** |
| खजुर | – | **खज्जूरी** | केळी | – | **कदलिफलं** |

## संवाद कौशल्य

१) नमस्कार
**नमक्कारो**

२) तुम्ही कसे आहात?
**कथं असि तुम्हे?**

३) तुमचे नाव काय आहे?
**तुय्हं नाम किं?**

४) माझे नाव गौतम आहे.
**मम नामो गोतमो अत्थि।**

५) तू कोठे राहतोस?
**त्वं कुहि वससि?**

६) मी ........... नगरात / गावात राहतो.
**अहं ........... नगरे/गामे वसामि।**

७) तुझे आईवडिल कुठे राहतात?
**तुय्हं मातापितरो कुहिं वसन्ति?**

८) ते सुध्दा.........नगरात/ गावात राहतात.
**ते पि इदानि.........गामे येव वसन्ति।**

९) तू कोणत्या वर्गात शिकतोस?/शिकतेस?
**त्वं किस्मिं वग्गे सिक्खसि?**

१०) मी अकराव्या वर्गात शिकतो./शिकते.
**अहं एकादसमो वग्गे सिक्खामि।**

११) तुला पालि भाषा का आवडते?
**त्वं पालि भासा किं कारणा रोचति?**

१२) पालि भाषा जीवनास दिशा देते म्हणून आवडते.
**पालि भासा जीवनं दीसा देति, तेन मय्हं पालिभासा रोचति।**

१३) तुझ्या शाळेचे नाव काय आहे?
**तव पाठसालाय नाम किं अत्थि?**

१४) माझ्या शाळेचे नाव............ आहे.
**मम पाठसालाय नाम .............अत्थि।**

१५) तुझ्या वर्ग अध्यापकाचे नाव काय आहे?
**तव वग्ग अज्ज्ञापकस्स नामं किं अत्थि?**

## ३. निबंध (निबन्धो)

१) विज्जालयो
२) उपवनं
३) मयुरो
४) अज्झापको
५) परिवारो
६) भारतस्स संविधानस्स उद्देसिका

## ४. अपठित उतारे (अपठीतो)

### १.सम्मासम्बुध्दो

अतीते किर जम्बुदीपे कपिलवत्थु नामं नगरं अहोसि। तत्थ सुध्दोदनो नाम राजा रज्जं करोति। महामाया तस्स अग्गमहेसी अहोसि। कपिलवत्थु नगरं तस्स राजधानी अहोसि। कपिलवत्थु च देवदहं च नगरानं मज्झे लुम्बिनी नामं सालवनं होति। तत्थेव सिध्दत्थकुमारो जातो । सिध्दत्थो राजकुमारो पण्डितो' व पञ्ञावन्तं वयप्पत्तो अहोसि । सो सोलस्स वस्सकाले यसोधरा नाम कञ्जं वारेसि। सा यसोधरा सीलसम्पन्नं अहोसि। सा एकं पुत्तं विजायि । तस्स नामं राहुलकुमारो अहोसि। ततो परं पब्बजितो सिध्दत्थकुमारो सम्मासम्बोधि पाटिलभि ।

**१ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सिध्दार्थाचा जन्म कोठे झाला ?
२) सिध्दार्थाच्या वडिलांचे नाव काय होते ?
३) सिध्दार्थाच्या आईचे नाव काय होते ?
४) राजा शुध्दोदन कोठे राहत होते ?
५) शुध्दोदनाची राजधानी कोणती होती ?
६) सिद्धार्थामध्ये कोणते गुण होते ?
७) सिद्धार्थाच्या पत्नीचे नाव काय होते ?
८) सिद्धार्थाच्या मुलाचे नाव काय होते ?

**२ खालील वाक्य सत्य /असत्य ओळखा.**

१) अतीते किर जम्बुदीपे कपिलवत्थु नामं नगरं अहोसि।
२) तत्थ सुध्दोदनो नामं राजा रज्जं न करोति।
३) कपिलवत्थु नगरं तस्स राजधानी अहोसि।
४) कपिलवत्थु च देवदह च नगरमज्झे लुम्बिनी नामं सालवनं होति।
५) तत्थेव सिध्दत्थोकुमारो जातो।
६) सिद्धत्थो राजकुमारो पण्डितो' व पञ्ञावन्तं न होति।

**३ विशेषणे ओळखा**

अतीते
अग्गमहेसी
सीलसम्पन्न
एकं
मज्झे
सिध्दत्थकुमारो
पण्डितो
पञ्ञावन्तं
वयप्पत्तो

**४ संधी विग्रह करा**

तत्थेव
पण्डितो' व
सम्मासम्बोधि

☆☆☆

## २.नालन्दा विस्सविज्जालयो

पाचीन जम्बुदीपे सोगतमहाविञ्ञायतनेसु अतिपाकट भावप्पत्तम्पन नालन्दा विस्सविज्जायतनंअहोसि। सो पन विस्सविज्जालयो सकलमगधरट्ठे 'धम्मगञ्जा' नामेन विदितो भवि। भारतीय पोत्थकालयान महन्तमो तस्स विस्सविञ्जायतनस्स पोत्थकालयो रतनोदधि नामाही नवभूमकं पासादे पतिट्ठा पितो अहोसि। किट्ठप्पत्तितो पठम सतवच्छरतो पट्ठाय अथवा तस्मिं विस्सविज्जालये आचरियभावेन वुत्यस्स नागज्जुन महाथेरस्स कालतो पट्ठाय याव किट्ठप्पत्तितो अट्ठमसतवच्छर अयं निखिलं सत्थालयो अभिवुध्दिया अनुनो पवत्तित्थ। एतं विस्सविज्जालस्स कालं पठमं सतक तं द्वादस सतकं होति। तत्थ विवीधानि देसानि एक सहस्स अज्झापको होन्ति । तत्थ दस सहस्स भिक्खू मानवको सज्झायं करोन्ति।

अट्ठमसतसवच्छरे वत्तमाने इमस्स विस्सविज्जायतनस्स नातिदूरट्ठाने ओदन्तपुरियं पालराजुन अनुग्गहेन कारापितो पन विस्सविज्जालयो सेट्ठतरभावं सम्पापुणिं । सत्तमसतवच्छरस्स आदिम्हि येव युवाङ्चांग नामो महापरियटको चीनदेसीय महाथेरो एतं नालन्दा विस्सविज्जायतनं पत्वा तत्थ पण्डिता चरियानं सन्तिका पालिभासा बुध्दधम्मं उग्गहेत्वा तस्स विस्सविज्जायतनस्स पवत्तियो च आलोकेत्वा महन्त परियटनवुत्तन्तु चीन भासाय लिखित्वा ठपेसि ।

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) प्राचीन जम्बुदीपामध्ये सर्वात जास्त प्रसिद्ध विद्यापीठ कोणते होते?
२) नालन्दा विद्यापीठ कोणत्या नावाने प्रसिद्ध होते?
३) नालन्दा विद्यापीठाची सुरुवात केव्हा झाली?
४) नालन्दा विद्यापीठाचा कालखंड कोणता होता?
५) नालन्दा विद्यापीठात एकुण किती अध्यापक होते?
६) नालन्दा विद्यापीठात एकूण किती विद्यार्थी शिकत होते?
७) नालन्दा विद्यापीठात कोणता चिनी प्रवाशी आला होता?
८) नालन्दा विद्यापीठातील पुस्तकालय किती विशाल होते?

### २. खालील वाक्ये सत्य /असत्य ओळखा.

१) तस्मिं विस्सविज्जालये आचरियभावेन वुत्यस्स नागज्जुन महाथेरस्स कालतो पट्ठाय ।
२) अट्ठमसतत्वंच्छरे वत्तमाने इमस्स विस्सविज्जायतनस्स नातिदुरट्ठाने ओदन्तपुरियं पालराजुन अनुग्गहेन कारापितो।
३) परियटनवुत्त चीन भासाय लिखित्वा ठपेसि ।
४) दस सहस्स मानवको सज्झायं करोन्ति।

### ३. पूर्वकालवाचक अव्यय

| | |
|---|---|
| १) पत्वा | २) उग्गहेत्वा |
| ३) आलोकेत्वा | ४) लिखित्वा |

### ४. विशेषणे

| | | |
|---|---|---|
| १) पाचिन | २) महन्तमो | ३) नवभुमक |
| ४) अनुनो | ५) सन्तिके | ६) नातिदुर |

☆☆☆

## ३. कस्सको

भूमि येव अम्हाकं भारतीयानं परा देवता ।
कसिकम्मं हि अम्हाकं पधानो आजीवो अत्थि।
वस्साकालस्स पुब्बे येव कस्सका नङ्गलेन कसन्ति भूमि वपन्ति च बिजानि भूमियं ।
ततो च आगच्छति पाऊसकालो ।
आकासे मेघा दिस्वा मोरा हरितेन नच्चन्ति ।
अथ आकासतो मेघा खेत्तेसू वारिं सिञ्चन्ति तेन च वारिना
तुस्सति सा तण्हाकुला भूमि च यथाकालं भूमिया सस्स जायति ।
तेन हरितेन सस्सेन तुस्सन्ति कस्सका ।

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) भारतीय आपल्या भूमिस कसा मान देतात?
२) भारतीयाच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन कोणते आहे?
३) पावसाळ्यापूर्वी शेतकरी काय करतात?
४) आकाशातील मेघांना पाहून मोर काय करतात?
५) तहानलेली भूमि कशी तृप्त होते?
६) उताऱ्याला योग्य शीर्षक लिहा.

**२. रूपे ओळखा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) नच्चन्ति | २) पधानो | ३) कसन्ति | ४) वपन्ति | ५) नच्चन्ति |
| ६) सिञ्चन्ति | ७) तुस्सति | ८) जायति | ९) तुस्सन्ति | १०) आगच्छति |

**३. समानार्थी शब्द लिहा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) वस्साकाल | २) भूमि | ३) वारिं | ४) कालं | ५) कसि |

**४. सत्य / असत्य लिहा.**

१) भूमि येव अम्हाकं भारतीयानं न परा देवता ।
२) कसिकम्मं हि अम्हाकं अपधानो आजीवो अत्थि।
३) वस्साकालस्स पुब्बे येव कस्सका नङ्गलेन कसन्ति भूमि वपन्ति च बिजानि भूमियं ।
४) आकासे मेघा अदिस्वा मोरा हरितेन नच्चन्ति ।
५) तेन हरितेन सस्सेन तुस्सन्ति कस्सका ।

☆☆☆

# ४. सीहो च व्यग्घो च

अतीते एकस्मिं पब्बतपादे सीहो च व्यग्घो च द्वे सहाय्यका। एकिस्सा येव गुहाय वसन्ति। तदा बोधिसत्तो पि तस्मिं येव पब्बतपादे वसति। अथेकदिवसं तेसं सहायकानं सीतं निस्साय विवादो उदपादि । व्यग्घो 'काले येव सीतं होति' ति आह। सीहो 'जुण्हे येवा' ति । ते उभोपि अत्तनो कंख छिन्दितुं असक्कोन्ता बोधिसत्तस्स सन्तिकं गता। ते 'भन्ते, सीतं नाम कस्मिं काले होति च पुच्छिंसु। बोधिसत्तो आह-काले वा यदि वा जुण्हे यदा मालुतो वायति तदा सीतं होति। एवं बोधिसत्तेन तेसं कुलहो छिन्दितो ।

## १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सिंह आणि वाघ कोठे राहत होते ?

२) ते कशासाठी भांडत होते ?

३) थंडीबाबत त्यांचा काय विचार होता ?

४) ते बोधिसत्वाकडे का गेले ?

५) त्यांनी बोधिसत्वाला काय सांगितले ?

६) बोधिसत्वाने त्यांचे भांडण कसे मिटविले ?

## २. सत्य / असत्य लिहा.

१) एकिस्सा येव गुहाय न वसति।

२) अथेकदिवसं तेसं सहायकानं सीतं निस्साय विवादो उदपादि।

३) सिहो 'काले येव सीतं होती' ति आह।

४) एवं बोधिसत्तेन तेसं कलहो छिन्दितो ।

## ३. पालि उताऱ्यातील विशेषणे, हेत्थवर्थक अव्यय शोधून लिहा.

**अ) विशेषणे.**

द्वे सहायका

बोधिसत्तो ।

**ब) हेत्थवर्थक अव्यय.**

१) गुहाय

२) निस्साय

३) छिन्दितुं

☆☆☆

## ५.अनोपमा

उच्चे कुले अहं जाता बहुवित्ते महद्धने ।
वण्णरुपेने सम्पन्न धीता मज्झस्स अनुजा ।।
पेत्थिता राजपुत्तेहि सेटिठपुत्तेहि गिज्झिता ।
पितु मे पेसयि दूतं, देथ मय्हं अनोपम ।
यतकं तुलिया एसा तुय्हं धीता अनोपमा।।
ततो अट्ठगुणं दस्स हिरञ्ञं रतनानि च ।
ततो केसानि छेत्वान पब्बजिं अनगारियं ।
अज्ज मे सत्तमी रत्ति येतो तण्हा विसोसिता ।

### १. एका वाक्यात उत्तरे द्या.

१) अनोपमा कोणाची मुलगी होती?
२) तिला हे नाव का ठेवले?
३) अनोपमाच्या पित्याकडे कोणी दूत पाठविले?
४) अनोपमाकरिता त्यांनी काय देण्याची इच्छा केली?
५) तिने तेव्हा काय केले?

### २. सत्य / असत्य लिहा.

१) माता मे पेसयि दुतं देय मय्हं अनोपमा।
२) उच्चे कुले अहं जाता बहुवित्ते महद्धने ।
३) वण्णरुपेने असम्पन्न धीता मज्झस्स अनुजा ।।
४) ततो केसानि छेत्वान पब्बजिं अनगारिय ।

### ३. सूचनेनुसार कृती करा.

१) पब्बजा (पुर्वकालवाचक अव्यय बनवा)
२) जाता (मराठी अर्थ सांगा)
३) राजपुत्तेहि (पञ्चमि विभक्ती, अनेकवचन, पुलिंग, राजपुत्त)
४) राजपुत्तो (समास ओळखा व विग्रह करा)
५) सेट्ठिपुत्ते (समास ओळखा व विग्रह करा)
६) हिरञ्ञं (मराठी अर्थ सांगा)

### ४. योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) ततो अट्ठ गुणं ..........हिरञ्ञं रतनानि च। (दस्स/ददामि)
२) अज्ज मे .......... रत्ति यतो तण्हा विसोसिता। (पञ्चमी/सत्तमी)
३) उच्चे कुले ........ जाता। (त्वं/अहं)
४) देथ ......... अनोपमा। (तुम्हं/मय्हं)

☆☆☆

# ६. चित्तं

न तं माता पिता कयिरा अञ्ञे वा पि च आतका।
सम्मापणिहितं चित्तं सेय्यसो नं ततो करे ।।
यथा पि भमरो पुप्फं वण्णगन्ध अहेठय्यं ।
पलेति रसमादाय एवं गामे मुनीचरे ।
न परेसं विलोमानि न परेसं कताकतं ।
अत्तनो व अवेक्खेय्य, कतानि अकतानिच ।।
सिप्पं समं धनं नत्थि, सिप्पं चोरा न गण्हरे ।
इथ लोके सिप्पं मित्तं पर लोके सुखावहं ।।

## १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) माणसांचे चांगल्या प्रकारे कोण मंगल करतो ?
२) माणसाचे जास्त नुकसान कोण करते ?
३) भ्रमर फुलांतील रस कसे ग्रहण करतो ?
४) मुनीने गावात कसे वागावे ?
५) दुसऱ्याच्या दोषाकडे लक्ष न देता स्वत: काय करावे ?
६) चोर कोणती वस्तु चोरून नेत नाही ?
७) मित्र कोणाला म्हटले आहे ?
८) वरील पद्य उताऱ्याला योग्य शीर्षक द्या ?

## २. सत्य / असत्य सांगा.

१) सम्मापणिहितं चित्तं सेय्यसो ततो करे ।
२) न परेसं विलोमानि न परेसं कताकतं ।
३) अत्तनो व अवेक्खेय्य, कतानि कतानिच ।
४) इथ लोके सिप्पं मित्तं पर लोके सुखावहं।


## ३. सूचनेनुसार कृती करा.

१) माता च पिता च (समास ओळखा)
२) मुनी+चरे (संधी करा.)
३) सिप्पं समं ........... नत्थि । (धन/वित्त) योग्य पर्याय निवडा.
४) पलेति रसमादाय एवं ........... मुनीचरे। (गामे/नगरे) योग्य पर्याय निवडा.

५) भमरो (माध्यम भाषेत अर्थ लिहा.)

६) सिप्पं (माध्यम भाषेत अर्थ लिहा.)

## ४. जाळरेखाचित्र पूर्ण करा.




☆☆☆

## ७. सोणा

सोणा सावत्थियं कुलगेहे निब्बत्ति ।
वयप्पत्ता पतिकुलं गता सुखसवासं वसति।
दसपुत्तधीतरो लभित्वा बहुपुत्तिका’ ति पञ्ञायित्थ।
अप्परभागे सा सामिके घरावासं पब्बज्जिते।
ततो सा पुत्तधीतरो घरावासे पतिट्ठापेत्वा।
सब्बं धनं पुत्तानं विस्सज्जेत्वा अदासि ।
न किञ्चि अत्तनो ठपेसि ।
पुत्ता च पुत्त भरिया च तं तं परियतं अकंसु ।
कि मय्हं इमेहि परिभवाय तसन्ति या’ ति ।
भिक्खुणियो उपसङ्कमित्वा पब्बज्जं याचि ।

### १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सोणा कोणत्या ठिकाणी जन्मली ?
२) तिला एकूण किती मुले झाली ?
३) तिला लोकांनी काय नाव ठेवले ?
४) तिच्या पतीने प्रव्रज्जा घेतल्यावर तिने काय केले ?
५) मुलांनी आणि सुनांनी काय केले ?
६) त्यामुळे सोणाला कोणता निर्णय घ्यावा लागला ?

### २. सत्य / असत्य लिहा.

१) दसपुत्त धीतरो अलभित्वा।
२) न किञ्चि अत्तनो ठपेसि ।
३) सब्बं धनं पुत्तानं विस्सजेत्वा अदासि ।


### ३. सूचनेनुसार कृती करा.

अ) रूपे ओळखा

| | | |
|---|---|---|
| १) वसति । | २) पञ्ञायित्थ। | ३) अदासि। |
| ४) ठपेसि। | ५) तसन्ति । | ६) सावत्थियं |

४. पुत्ता च पुत्तभरिया च – (समास ओळखा)

५. या उताऱ्यातील अव्यय शोधा.




६. योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) सोणा............... कुलगेहे निब्बति । (वाराणसियं/सावत्थियं)

२) ............ सामिके घरावासं पब्बज्जिते । (सा/सो)

☆☆☆

# ८. किसागोतमी

गोतमी सावत्थियं दुग्गतकुले निब्बति ।
किससरीरताय पन किसागोतमी’ ‘ति वोहरियित्थ।
तं पतिकुलं गतं दुग्गतकुलस्स धीता’ ति परिभविंसु।
सा एकं पुत्तं विजायि । पुत्तलाभेन सा हट्ठ तुट्ठा अहोसि।
सा पन’ स्सा पुत्तो किलनकाले ठितो कालमकासि ।
तेनस्सा सोकुम्मादो उपज्जि।
सोकुम्मदूसस्सेन मतकलेवर आदाय ।
मम पुत्तस्स भेसज्ज देथा’ ति ।
गेहद्वार पटिपाटिया नगरे विचरति ।
सा सत्थु विहारं गन्त्वा पुत्तस्स ।
मे भेसज्ज देथा’ ति आह।

## १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) गोतमी कोठे जन्मली?
२) गोतमी कोणत्या कुळात जन्मली?
३) तिला ‘किसागोतमी’ असे नाव का पडले?
४) पतीगृही तीला कोणत्या प्रकारची वागणूक मिळाली?
५) आपल्या पुत्राच्या मृत्युमुळे तिला काय झाले?
६) मुलाचे प्रेत घेऊन तिने घरोघर काय भिक्षा मागितली?

## २. सत्य / असत्य लिहा.

१) सा एकं धीतरो विजायि ।
२) किससरीरताय पन किसागोतमी’ ति वोहरियीत्थ।
३) गेहद्वार पटिपाटिया विचरति ।

## ३. सूचनेनुसार कृती करा.

**रूपे ओळखा**

१) सावत्थियं
२) परिभविंसु
३) निब्बति
४) वोहरियीत्थ
५) अहोसि
६) गन्त्वा

## ४. योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) पुत्तलाभेन सा ..........अहोसि। (हट्ठतुट्ठ/दुक्खी)
२) तेनस्सा सोकुम्मादो .... ...........। (पज्जि/उपज्जि)

## ५. जोड्या लावा.

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| १) गोतमी सावात्थियं | १) भेसज्ज देथा’ ति । |
| २) तेनस्सा | २) दुग्गतकुले निब्बति । |
| ३) मम पुत्तस्स | ३) सोकुम्मादो उपज्जि । |

☆☆☆

# ५. कथापूर्ती (कथापुत्ति)

## १. बावेरू जातक

अतीते वाराणसियं ....... रज्जं कारेन्ते बोधिसत्तो....... निब्बतित्वा वुद्धि अन्वाय सोभग्गपत्तो......... विचरि। तदा एकच्च वाणिजा ..........गहेत्वा नावाय बावेरुरट्ठं .......। तस्मिं किर काले बावेरूरट्ठे ........ नाम नत्थि । आगतागता......तं कुपग्गे निसिन्नं दिस्वा 'पस्सथिमस्स......... गलपरियोसानं.......मणिगुळसदिसानि अक्खिनी' ति काकमेव.......... ते वाणिजके आहंसु इम अय्यो सकुणं अम्हाकं देथ ।'

(मोरयोनियं, बह्मदत्ते, दिसाकाक, अरञ्ञे, सकुणा, छविवण्णं, रट्ठवासिनो, मुखतुण्डकं पसंसित्वा, अगमंसु)

## २. एक गामं

अम्हाकं गामस्स बहि एको......... वत्तति। तत्थ गामवासिनो नहायितुं........। तळाकस्स समिपे एको ....... अत्थि। अम्बरुक्खस्स साखायं अम्बपकानि.........। तस्स रुक्खस्स छायायं गावो...........।

ये जना विहारत्थ आगच्छन्ति ते ........... ओतरन्ति । जलस्मिं ते उम्मुजन्ति । ते .......मुले निसीदन्ति । खज्जभोज्ज ...........। अनन्तरं ते भोज्जं उपभुञ्जन्ति । ......... तेसं समीपे विचरन्ति । मनुस्सा सुनखानं ........ पक्खिपन्ति । कदाचि दण्डकेहि सुनखे निवारेन्ति ।

(खज्जभागं, विभजन्ति, सुनखा, जलं, रुक्ख, निसीदन्ति, ओलम्बन्ति, गच्छन्ति, अम्बरुक्खो, तळाको.)

## ३. धम्मराजा असोको

जम्बुदीपे बहवा .......... राजानो जाता । पुरा मगधेसु ..... नगरे असोको बिन्दूसाररञ्ञो पुत्तो ।......... विजेतु तेन महन्तं युद्धं कतं। तत्थ ....... जना मता । तेन दुक्खितेन असोको रञ्ञो युद्धं सब्बथा परिच्चजित्वा.......... सरणं गतो । असोकस्स बुद्धधम्मो अतीव.......। ठाने ठाने.......सिलालेखा धम्मलेखा, गुहालेखा, लिखापिता । असोको....... अत्तानं निद्दिसति। असोकत्थम्भे ठिता चत्तारो..........भारत रट्ठस्स राजमुद्दा । असोकत्थम्भे ठितं यं ..........तेन अम्हाकं रट्ठस्स धजो अलङ्कतो ।

(कलिंगदेसं, महन्तो, बहवो, तथागत, पाटलिपुत्ते, सींहा, अभिमतो, लेखेसु, धम्मचक्कं, तेन)

## ४. भद्दा कुण्डलकेसा

भद्दा कुण्डलकेसा राजगहे .........निब्बत्तित्वा महत्ता परिवारेन.......... वयप्पत्ता तस्मिं एव नगरे......... पुत्तं सत्थुक नाम ....... राजाणाय मारेतुं आघातानं नीयमानं.......... दिस्वा पटिबद्ध चित्ता हुत्वा 'सचे तं लभामि जीविस्सामि नो चे ...........' ति सयने अधोमुखा ...........। अथस्स पिता तं पवत्ति सुत्वा.........बलवसिनेहि........... दत्वा चोरं विस्सज्जापेत्वा तस्सा............पेसेसि।

(एकधीताय, पासादं, निपज्जिं, मरिस्सामी, सेट्ठिकुले, पुरोहितस्स, वड्ढमाना, ओलोकेन्ति, चोरं, सहस्सलञ्चनं)

☆☆☆

# पालि भाषेचे महत्त्व

पालि भाषा ही एक प्राचीन भारतीय भाषा आहे. प्राचीन भारतातील ही एक जनभाषा राहिलेली आहे. पालि भाषेला 'मागधी' भाषा सुद्धा म्हटले जाते. मागधी म्हणजे मगध देशामध्ये राहणाऱ्या लोकांच्याद्वारे बोलली जाणारी भाषा होय. जरी पालि भाषेला 'मागधी' या नावाने संबोधले जात असले तरी ही जनभाषा केवळ मगध देशामध्येच बोलली जात होती असे नाही तर त्या काळातील संपूर्ण मध्य देशामधील लोक मागधी भाषा बोलत असत. म्हणजेच या मागधी भाषेचे भाषिक क्षेत्र हे फार मोठे होते. पालि अट्ठकथाकारांनी या मागधी भाषेला 'पालि' या नावाने संबोधले आहे. 'पालि' शब्दाचा सर्वात प्रथम प्रयोग आपल्याला आचार्य बुध्दघोष (इ.स. ४ थे - ५ वे शतक) यांच्या अट्ठकथांमध्ये मिळतो. त्यानंतर श्रीलंकेमध्ये लिहिल्या गेलेल्या 'दीपवंस' ग्रंथामध्ये सुद्धा जी इ.स. चवथ्या शतकातील रचना आहे, पालि शब्दाचा प्रयोग बुध्दवचनांच्या अर्थामध्ये केल्या गेला आहे. 'महावंस' मध्ये सुध्दा पालि शब्दाचा प्रयोग बुध्दवचन किंवा पालि तिपिटकाच्या अर्थामध्ये केला आहे. 'अभिधानप्पदीपिका सुची' मध्ये पालि शब्दाची उत्पत्ती केल्या गेली आहे. 'पा पालेति, रक्खती'ति पालि' अर्थात जी पालन करते, रक्षण करते ती पालि. बुध्दवचनांचे पालन करते, रक्षण करते म्हणून पालि.

पालि तिपिटकामध्ये तथागत बुध्दाच्या त्या काळातील चारिकांचा विस्ताराने उल्लेख आलेला आहे. अंग, मगध, कासी, कोसल, वज्जी, मल्ल, चेदि, वत्स, कुरू, पांचाळ, मत्स, सौरसेन, अस्मक, अवंती, गांधार, आणि कंबोज या सोळाही जनपदांमध्ये तथागतांनी विचरण केल्याचे आणि पालि भाषेमधून उपदेश केल्याचे उल्लेख आपल्याला पालि साहित्यात आढळून येतात, म्हणजे तथागत बुध्द जिथे-जिथे जात तिथे-तिथे ते पालिमध्येच उपदेश देत असत आणि तेथील लोक सुध्दा तथागत बुध्दांच्या उपदेशांना ऐकत असत, समजून घेत असत व ग्रहण करीत असत.

पालि भाषेमधील साहित्यामध्ये तथागत बुद्धाचे उपदेश संग्रहीत आहेत. यामध्ये प्रामुख्याने तिपिटक साहित्य, अनुपिटक साहित्य, अट्ठकथा साहित्य, वंस साहित्य इत्यादीचा समावेश आहे. पालि भाषेमध्ये अंतर्भूत असलेले विचार जगातील अतिशय उत्तम, सर्वोच्च प्रज्ञा असलेल्या तथागतांचे आहेत. त्यामुळे यामध्ये जेवढ्या संकल्पना आलेल्या आहेत, जेवढे विचार आलेले आहेत ते सर्व मानवी समाजाला सुगतीकडे घेऊन जाणारे आहेत. यामध्ये धार्मिक अंधश्रद्धेचा, कर्मकांडाचा आधार कुठेही घेण्यात आलेला नाही. तथागतांनी स्वता पहिल्यांदा आपला बौद्धिक विकास केला, त्यांनी उच्चतम अशा स्वरूपाचे ज्ञान प्राप्त केले, विशुद्ध आचरण केले, त्यांनीआपल्या मनातील सर्व विकारांचा नाश करून संपूर्ण मानवतेप्रति प्रेम, दया, करूणा, मैत्री, मुदिता, उपेक्षा, मानवी संवेदनशिलता निर्माण करून लोकांना दुक्ख मुक्तीचा मार्ग सांगितला. ते आपल्या वयाच्या ३५ व्या वर्षी बुध्दत्वाला प्राप्त करून निरंतर ४५ वर्षांपर्यंत आपल्या धम्म विचारांचा उपदेश लोकांना देत राहिले. त्यांचा तो उपदेश म्हणजेच पालि साहित्य होय, तिपिटक साहित्य होय. यामध्ये सुत्तपिटक , विनयपिटक, अभिधम्मपिटक असे तीन पिटक आहेत. सुत्तपिटकाचे पाच निकाय आहेत. यामध्ये धम्म उपदेशासोबतच तत्कालीन समाज, जीवन, व्यवसाय, वस्त्रालंकार, आभूषणे, कलाकृती याबद्दलची महत्त्वपूर्ण माहिती मिळते.त्यांच्या वेशभूषेतून, राहणीमानातून तत्कालीन जीवनस्तर दिसून येतो. बौद्ध लेण्यांमधील चित्रकलेच्या रूपाने ते आजही समाजमनाला प्रभावित करते. थेर-थेरींच्या जीवनप्रवासातून आपल्याला समानतेचे तत्व स्पष्ट होते. सुनीत, उपाली, अंगुलीमाल, यशकुलपुत्त, मोग्गलायन-सारिपुत्त, आनंद-नंद यांच्या संघ प्रवेशातून धर्म, वंश, जात, लिंग इत्यादी कुठल्याही प्रकारच्या भेदभावास प्रतिबंध असल्याची जाणीव होते. अंगुत्तरनिकायातील केसमुत्तिसुत्तातून मानवी स्वातंत्र्याचा जाहीरनामा दिसून येतो. दीघनिकायामधील सामञ्ञफलसुत्तातून तत्कालीन शिल्पांची, व्यवसायांची माहिती प्राप्त होते. विनयपिटकामध्ये भिक्खू-भिक्खूनी विषयींचे नियम दिलेले आहेत. विनयपिटकाच्या अध्ययनातून जीवनमार्गातील शिस्तपालनाची प्रवृत्ती दिसून येते. विनयपिटकाला बुद्धशासनाचा सारभूत ग्रंथ मानले जाते. अशाप्रकारे भिक्खूंकरिता हा ग्रंथ 'संविधान' स्वरूप ठरला आहे. अभिधम्मपिटक हा गहण बौध्द तत्वज्ञानाचा ग्रंथ

आहे. याला 'तत्त्वज्ञानात्मक मनोविज्ञान' ही समजले जाते. यामध्ये चित्त, चैतसिक, रूप आणि निब्बानविषयी सविस्तर चर्चा केलेली आहे. तसेच कुसल - अकुसलाविषयी चर्चा केलेली आहे.

या तिपिटक साहित्यामुळे पालि भाषेला प्रतिष्ठा प्राप्त झाली. यापूर्वी ती बोलीभाषाच होती. तिपिटकाचा अर्थ 'तीन पेटारे' असा आहे. 'ज्याप्रमाणे एखाद्या पेटीमध्ये वस्तु सुरक्षित ठेवली जाते, त्याचप्रमाणे या पेटीमध्ये बुद्ध वचनांना सुरक्षित ठेवलेले आहे. या पालि भाषेमधील तिपिटक साहित्यामध्येच प्राचीन भारतीय इतिहासाची अमूल्ये अशी सामग्री आहे आणि ही सामग्री वैचारिकतेला प्रोत्साहित करणारी आहे. तथागत बुद्धाचे ऐतिहासिक व्यक्तिमत्व, त्यांचे कारुण्य रूप, त्यांनी आपल्या शिष्यांना दिलेला उपदेश इत्यादींचा स्पष्ट उल्लेख पालि भाषेमधील तिपिटक साहित्यात मिळतो.

बुद्धाचे ज्ञान अनंत होते. भिक्खू आनंदाने म्हटले आहे की, मी ८२,००० धर्मस्कंध (सुत्र) बुद्धाकडून ग्रहण केले आणि २००० सुत्र संघाकडून ग्रहण केले. अशाप्रकारे तथागत बुद्धांच्या उपदेशांचा सर्वात मोठा भाग तिपिटकात संकलित केलेला आहे. यावरून हे स्पष्ट होते की, पालि तिपिटक म्हणजे तथागत बुद्धाच्या मूळ उपदेशांचा संग्रह असून तो पालि भाषेत आहे.

तथागतांच्या उदार शिकवणीसोबतच या अर्थाचा संबंध सुद्धा मिळतो, की सर्वसामान्यांना तथागतांचा धम्म सहजतेने समजणाऱ्या बोलिभाषेमध्येच असावा. 'छन्दस' भाषेमध्ये आपल्या उपदेशांना सांगून त्यांना ते संकूचित बनवू इच्छित नव्हते, म्हणून त्यांनी त्यांच्याकडे आलेल्या यमेळ व तेकूल या ब्राह्मण भिक्खूंना सांगितले की, बुद्धवचनांना 'छन्दस' मध्ये सांगितल्यास 'दुष्कृत्य' अपराध होईल. नंतर ते आदेश देतात की, 'भिक्खूंनो! आप-आपल्या भाषेमध्ये बुद्धवचन शिकण्याची अनुमती देतो.'

तथागतांचा जोर शब्दांवर नव्हता तर अर्थावर होता. कोणतीही भाषा इतर भाषेपेक्षा त्यांच्या दृष्टीने श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नव्हती. ना त्यांना छन्दस विषयी द्वेष होता, ना मागधीविषयी-पालिविषयी मोह. ते केवळ जीवित भाषेमध्ये उपदेश देऊ इच्छित होते, ज्यामुळे लोक त्यांना सहजतेने समजू शकतील कारण पालि भाषा तथागतांच्या पूर्वी दैनंदिन जीवनात बोलली जाणारी जनभाषा होती. जनभाषेत उपदेश देण्याचा उद्देश हाच असावा की, लोकांना तो उपदेश अधिक चांगला आकलन व्हावा.

पालि भाषेचा जर आपल्याला अभ्यास करावयाचा असेल तर तो तीन अंगांनी करता येतो, तो म्हणजे - परियत्ति, पटिपत्ति व पटिवेदन. परियत्ति म्हणजे ऐकून, वाचून, शब्दाचा अर्थ समजून घेणे. पटिपत्ति म्हणजे त्यावर चर्चा, विचार-विमर्ष करणे आणि पटिवेदन म्हणजे त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेणे, पालिमधील शब्दांचे असे तिन्ही अंगांनी जोपर्यंत अनुभूती येत नाही, तोपर्यंत पालि शब्दांचे संपूर्ण ज्ञान होत नाही.

पालि भाषेच्या अध्ययनाच्या दृष्टीने दुसरी महत्त्वाची बाब ही की, इतर भाषांचा अभ्यास हा गद्य, पद्य, नाटक, कथा- कथन इत्यादी पूरताच मर्यादित असतो. परंतु पालि भाषेचा अभ्यास आपण वेगवेगळ्या प्रकारांनी करू शकतो. पालि भाषा ही आपल्याला नऊ अंगांनी शिकता येते, तिला 'नवांगसत्थुसासन' असे सुद्धा म्हणतात. ते म्हणजे - १) सुत्त २) गेय्य, ३) वेय्याकरण ४) गाथा ५) उदान ६) इतिवुत्तक ७) जातक ८) अब्भूतधम्म ९) वेदल्लं (जाणून घेणे).

म्हणून पालि शिकण्याकरिता वेगवेगळी दालने उपलब्ध आहेत, आज पालि साहित्य सुद्धा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

पालि भाषा शिकण्याच्या दृष्टीने व समजण्याच्या दृष्टीने सोपी आहे. मोग्गलायन व्याकरणानुसार पालि भाषेमध्ये अक्षरांची संख्या ४३ आहे व कच्चायन व्याकरणनुसार ४१ आहे. मोग्गलायन व कच्चायन व्याकरणामध्ये अक्षरांच्या संख्येमध्ये हा जो फरक पडलेला आहे. तो पालिमधील व्यंजन संख्येमध्ये नसून पालिमधील स्वरांच्या संख्येमध्ये आहे. या भाषेमध्ये व्याकरण सुत्रांची संख्या सुद्धा ७००/८०० पेक्षा जास्त नाही. म्हणून आधुनिक भाषाशास्त्राच्या दृष्टीने सुद्धा या भाषेला फार महत्त्व आहे.

पालि भाषेचा अभ्यास करतांना पालि भाषा ही मराठी, हिंदीच्या जवळची आहे असे जाणवते. व्याकरणाचा भाग सोडून दिला तर अनेक शब्द मराठी-हिंदी भाषेमध्ये पहायला मिळतात. उदा. सदा, परम, सुकर, अहित, यदा-कदा, अङ्गार, सीत, थूल, अङ्गुली, वेसभूसा, जननी, मुट्ठी, नगर, नुतन इत्यादी. पालि भाषा अधिक सोपी करावयाची असेल तर पालिमधील शब्द आपण मातृभाषेत बोलतांना रूढ केले पाहिजे. उदा. प्रमुख-पमुख, निर्वाण-निब्बान, दुर्लभ - दुल्लभ, वर्ष - वस्स, अग्नि-अग्गि, सर्व-सब्ब,

नित्य-निच्च, पुस्तक-पोत्थक, विद्यालय - विज्झालय, क्लेश-किलेस, औषध-ओसध, मार्ग-मग्ग इत्यादी. म्हणून पालि भाषा शिकतांना सर्वप्रथम ती भाषा काय आहे? ती आपल्याला कशा पद्धतीने बोलता येईल? ती व्यवहारामधील बोलचालची भाषा कशी होईल? यादृष्टीने पालि भाषेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

सर्वसाधारण पालि व्याकरणाच्या अभ्यासाच्या दृष्टीने सुद्धा पालि भाषेची स्वतंत्र व्याकरण परंपरा आहे. प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत बौद्ध संस्कृती, तत्वज्ञान, इतिहास, जीवनमुल्ये समजून घेण्याच्या दृष्टीने पालि भाषेचे फार महत्व आहे. प्राचीन भारताचा इतिहास, राजकारण, अर्थकारण, समाजकारण, भूगोल, सांस्कृतिक देवाण-घेवाण, भूभाग इत्यादींना समजून घेण्याच्या दृष्टीने सुद्धा पालि भाषेच्या अध्ययनाचे महत्व आहे.

मानवी जीवनात निर्माण होणारी दुक्खे ही आपल्या अज्ञानामुळे अविचारामुळे निर्माण होतात. प्रज्ञाबुद्धीने, विवेकबुद्धीने न वागल्यामुळे निर्माण होतात, पालि भाषेमधील हा धम्मविचार इहवादाला स्वीकारणारा आहे, मानवतावाद निर्माण करणारा आहे. या भाषेतील साहित्यामध्ये मोक्ष प्राप्तीचा, स्वर्ग प्राप्तीचा विचार नाही, तर असत्याला असत्य मानून सत्य प्रस्थापित करणारा विचार आहे. या जगातील प्रत्येक मानवाने भ्रामक कल्पनांचा त्याग करून, असत्याचा त्याग करून सत्य स्वीकारल्यास, वास्तविकता जाणल्यास अज्ञानातून आलेल्या, अविचारातून आलेल्या दुक्खातून तो स्वताच स्वताची मुक्तता करून घेऊ शकतो.

पालि हा विषय इयत्ता ८ वी पासून तर पदवी, पदवीव्युत्तर पर्यंत शिकविला जातो. तसेच या विषयात संशोधनही केले जाते. दिवसेंदिवस या विषयाचा अभ्यास करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याचे दिसत आहे. सध्या हा विषय महाराष्ट्रामधील अनेक शाळा, महाविद्यालय व विद्यापीठांमध्ये शिकविला जातो. यामध्ये प्रामुख्याने मुंबई, पुणे, नागपूर, गडचिरोली, अमरावती, औरंगाबाद, सोलापूर, नांदेड इत्यादी विद्यापीठांमध्ये शिकविला जातो. या विद्यापीठांमध्ये सुद्धा विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे जाणवते. याचे कारण हे आहे, की या विषयामध्ये स्वांतत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मूल्ये शिकविल्या जातात, त्यामुळे प्रत्येकाला शिकवितांना किंवा या विषयाचे महत्व सांगतांना हा विषय संविधानिक पद्धतीने सांगता येतो. यामुळे असे म्हणता येईल की, पालि विषयाचे महत्व विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजामध्ये भारतीय संविधानिक मूल्ये रूजविण्याच्या दृष्टीने सुद्धा अतिशय महत्त्वाचा विषय आहे.

पालि विषयाच्या या महत्त्वामुळेच आज हा विषय आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचलेला आहे. भारतातील विविध विभागीय शिक्षण मंडळ (एस.एस. सी, एच. एस. सी.) तसेच अनेक विद्यापीठांमध्ये हा विषय शिकविला तर जातोच, परंतु जगातील अनेक देशांमध्ये सुद्धा हा विषय शिकविला जातो. तिसऱ्या संगितीपासून याची सुरुवात झाली. आज या भाषेचा अतिशय मोठ्या प्रमाणात प्रचार-प्रसार देश-विदेशात होत आहे. यामध्ये प्रामुख्याने श्रीलंका, थाईलंड, चीन, जापान, कंबोडिया, म्यानमार, इत्यादी अशा अनेक देशांचा उल्लेख करता येईल.

आधुनिक भारतामध्ये अनागारिक धम्मपाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धम्मानंद कोसंबी, महापंडित राहुल सांकृत्यायन, डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन, भिक्खू जगदिश कस्सप, भिक्खू धर्मरक्षित इत्यादी विद्वानांच्या प्रयत्नांमुळे पालि भाषेच्या अध्ययनाला फार मोठ्या प्रमाणात गती प्राप्त झालेली आहे. पालि साहित्यातील इतिहास, संस्कृती, मानवी मूल्ये, तत्त्वज्ञान, धम्म, साहित्य, भाषा, व्याकरण इत्यादीवर अध्ययानाची प्रक्रिया फार मोठ्या प्रमाणात सुरू झालेली आहे. कारण स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही जीवनमूल्ये वैज्ञानिक जीवन दृष्टी जोपासण्याचे कार्य या भाषेने केले आहे. यावरून असे म्हणता येईल, की आधुनिक भारतात पालि भाषेच्या अध्ययनाचे क्षेत्र निश्चितच व्यापक होत आहे. प्राचीन भारतातील समाज जीवनाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने नैतिक आचरण सुधारण्याच्या दृष्टीने, सर्वांगीण विकास घडवून येण्याच्या दृष्टिने पालि भाषेच्या अध्ययनाची आवश्यकता आहे. कारण जागतिकीकरणाच्या युगात सर्व जगाला शांतीचा, करूणेचा, समतेचा, मैत्रीचा संदेश देणारे विचार या पालि भाषेमधील साहित्यात आहेत. म्हणूनच आज पालि भाषा मधील विचार जागतिक स्तरावर आपले योगदान देत आहे.

**पालि भाषा समिती**

# तिपिटक ग्रंथ परिचय

## तिपिटक

### सुत्तपिटक

१) दीघनिकाय
२) मज्झिमनिकाय
३) संयुत्तनिकाय
४) अङ्गुत्तरनिकाय
५) खुद्दकनिकाय

- i) खुद्दकपाठ
- ii) धम्मपद
- iii) उदान
- iv) इतिवुत्तक
- v) सुत्तनिपात
- vi) विमानवत्थु
- vii) पेतवत्थु
- viii) थेरगाथा
- ix) थेरीगाथा
- x) जातक
- xi) निद्देस
- xii) पटिसम्भिदामग्ग
- xiii) अपदान
- xiv) बुद्धवंस
- xv) चरियापिटक

### विनयपिटक

- सुत्तविभङ्ग
  - पाराजिक
  - पाचित्तिय
- खन्धक
  - महावग्ग
  - चुल्लवग्ग
- परिवार

### अभिधम्मपिटक

- i) धम्मसङ्गणि
- ii) विभङ्ग
- iii) धातुकथा
- iv) पुग्गलपञ्ञत्ति
- v) कथावत्थु
- vi) यमक
- vii) पट्ठान

धम्मलिपी 𑀥𑀫𑁆𑀫𑀮𑀺𑀧𑀻




𑀧𑀸𑀮𑀺 𑀆𑀮𑁄𑀓𑁄 𑀇𑀬𑀢𑁆𑀢𑀸 𑀅𑀓𑀭𑀸𑀯𑀻

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे - ४११००४

पालि आलोको इ. ११ वी ₹ ९९.००